IRBK 0100048

म ग्रं स वाचनालय शाखा ठाणे
विषय निबंध
दा क्र ४८

IRBK 0100048
IRBK-0100048

# अभिप्राय.

* * पुस्तकाची भाषा शुद्ध व विचार गंभीर आहेत. सध्याच्या काळीं वाचनाचा प्रसार फार होत आहे, अशा स्थितींत हें पुस्तक एक वेळ समग्र वाचणारांस ज्ञानप्राप्तीच्या कामीं याचा फार उपयोग होणार आहे. * *

**' समर्थ '**

* * सारांश, प्रस्तुतचा निबंध हा महत्वाचा असून रा. वावीकर यांनीं तो चांगला वठविला आहे, ह्मणून प्रत्येकानें तो वाचून पहावा व विद्यार्थ्यांच्या हातीं तो अवश्य द्यावा, अशी आह्मी शिफारस करतों. * *

**' सयाजी विजय '**

* * विषय १० आहेत. चांगलें आहे. विद्यार्थ्यांनीं अवश्य वाचावें. * *

**' बालबोध '**

* * यांत वाचन कसें असावें, यावद्दल फारच उत्तम सूचना देऊन शेवटीं एकंदर महाराष्ट्र वाङ्मयाचें थोडक्यांत निरीक्षण केलेलें आहे. हा निबंध प्रत्येक स्त्रीपुरुषानें वाचून मनन करण्यासारखा आहे. * *

**' सुधारक '**

* * रा. वावीकर यांनीं बरेच श्रम करून अनेक ग्रंथांच्या आधारें हा निबंध लिहिला असून तो वाचनीय आहे. × × सर्वत्र सुबोध विवेचन व सरळ भाषा आढळून येते. * * **' सुबोधपत्रिका '**

* ८ यांत वाचन या विषयाचा सर्व दृष्टींनीं सुंदर विचार केला आहे. आणि अनेक विषयांवर मराठींत कोणकोणचीं पुस्तकें वाचण्याजोगीं आहेत, त्यांचाही नामनिर्देश केला आहे. निबंधाची भाषा चांगली असून ग्रंथकाराचें वाचनही बरेंच विस्तृत दिसतें. * *

**' करमणूक '**

* * वाचन ह्या विषयाचा ह्या पुस्तकांत अनेक अंगांनीं सुबोध व सरळ भाषेंत विचार केला आहे. मराठी पुस्तकें ह्या सदराखालीं ह्या निबंधाच्या नवव्या भागांत जी माहिती दिली आहे, तिच्यापासून मान्य वाचकांस महाराष्ट्र वाङ्मयांतील ग्रंथसंपत्तीसंबंधाची बरीच उपयुक्त माहिती मिळेल.

**' ज्ञानप्रकाश. '**

## शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३० | १२ | बाधून | बांधून. |
| ४३ | १२ | करितों | करितों ' |
| ८५ | २२ | पोवाड्यांनीं | पोवाड्यांनीं. |
| ८६ | ४ | भद्दवंशकाव्य | भट्टवंशकाव्य. |
| ,, | १७ | सर्गाच्या | सर्गांच्या. |
| ९८ | ६ | ग्रंथांची | ग्रंथांचीं. |
| १०१ | २ | वळ | वेळ |
| १०२ | १ | वाढवावी | वाढवावी. |

IRBK-0100048
IRBK-0100048

# प्रस्तावना.

वाचन हा विषय फार महत्वाचा असून या विषयावर स्वतंत्र व व्यापक निबंध लिहिला असतां, तो विद्यार्थ्यांस व सामान्य वाचकांस विशेष उपयुक्त होईल असें वाटल्यावरून, प्रस्तुत निबंध लिहिला आहे. वाचनाचें महत्व केवढें आहे, हें यांत सांगितलें असून जेणेंकरून चांगलीं पुस्तकें वाचण्याची लोकांना अभिरुचि लागेल असा प्रयत्न केला आहे. लहान मुलांमुलींच्या हातीं पडला असतां हा निबंध त्यांना समजावा ह्मणून पुस्तकाची भाषा, होतां होईल तों, सुलभ घातली आहे.

घोंकीव उत्तरें तोंडपाठ ह्मणून दाखवितां आलीं किंवा नुसत्या परीक्षा पास झाल्या, ह्मणजे विद्या आली असें नाहीं; तर खऱ्या विद्वत्तेची कसोटी कांहीं निराळी आहे. खरी विद्वत्ता प्राप्त होण्यास वाचनासारखें दुसरें उत्तम साधन नाहीं. वाचनानें मन सुसंस्कृत होतें व विपुल माहिती मिळते; इतकेंच नाहीं तर, त्या योगानें भाषाही चांगली अवगत होते. तुह्मी कोणतीही भाषा शिका—मग ती तुमची जन्मभाषा असो किंवा कोणतीही अन्य भाषा असो—वाचनावांचून तुमची तींत चांगलीशी प्रगति व्हावयाची नाहीं. सारांश, वाचनापासून मनुष्यास उत्कृष्ट विचार उत्कृष्ट भाषेंत व्यक्त करण्याची कला साध्य होते; फार तर काय, वाचन यास विद्येचें जीवन ह्मटलें असतां अतिशयोक्ति होईल, असें आह्मांला वाटत वाटत नाहीं. हल्लींच्या शिक्षणपद्धतींत वाचनाची अभिरुचि उत्पन्न होत नाहीं. ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय ! मुलांस वाचनाची आवड लहानपणीं लागली असतां, पुढें ती आपोआपच वृद्धिंगत होते. येवढ्याकरितां शिक्षकांनीं आईबापांनीं किंवा पालकांनीं चांगलीं चांगलीं पुस्तकें मुलांच्या हातीं पडतील, अशी

व्यवस्था करावी. चांगलीं पुस्तकें वाचण्याची संवय लागली ह्मणजे, वाईट पुस्तकांकडे पुढें तीं ढुंकून सुद्धां पाहणार नाहींत !

येथें शिक्षकांस एक सूचना करावीशी वाटते ती ही कीं,— शाळेंतील क्रमिक पुस्तकांतील विषय मुलांकडून पाठ करवून घेऊन किंवा त्यांतील प्रश्न वारंवार विचारून त्यांना बिनचूक उत्तरें देतां आलीं ह्मणजे शिक्षकांची इतिकर्तव्यता संपली, असा साधारण समज आहे. जो शिक्षक अशा रीतीनें मुलांकडून अभ्यास करून घेईल, व ज्याच्या हाताखालचीं पुष्कळ मुलें परीक्षेंत पास होतील तो शिक्षक चांगला, त्यास शिकविण्याची हातोटी चांगली साधली, असें ह्मणतात. परंतु हें ह्मणणें अगदीं चुकीचें आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, घोकंपट्टीपलीकडे मुलांचें अध्ययन क्वचितच जातें. इतिहास, भूगोल, कविता, अन्वयार्थ, शब्दार्थ, व्याकरण वगैरे सर्व विषय मुलांना मुखोद्गत आले ह्मणजे अभ्यास चांगला झाला असें नव्हे. तर खऱ्या शिक्षणानें मुलें विचारशील व सुशील बनली पाहिजेत. क्रमिक पुस्तकांतील धडे मुलांना शिकवितेवेळीं पुष्कळ माहिती सांगून तो विषय त्यांच्या मनांत चांगला ठसेल, तसेंच अभ्यास करण्यांत त्यांना आनंद व करमणूक वाटून त्यांची जिज्ञासा व विचारशक्ति वाढेल, त्यांच्या ठायीं विद्येविषयीं अभिरुचि उत्पन्न होईल, विषयाचें हृद्गत कळून ते त्यावर स्वतंत्र विचार करूं लागतील, अशी व्यवस्था करावी. शिक्षकांस स्वतः विद्येची व वाचनाची अभिरुचि असल्याशिवाय त्यांना शिक्षणाचें काम चांगलेंसें करतां येईल, असें आह्मांस वाटत नाहीं. तसेंच शिक्षकांनीं खाजगी रीतीनें मुलें एकत्र करून त्यांना उत्तमोत्तम ग्रंथ समजावून देऊन जेणेंकरून विद्यार्थ्यांस विद्येची अभिरुचि लागेल, अशी व्यवस्था करावी. अज्ञ परंतु कोमल अशा मनास सन्मार्गास लावणें, त्यास सुशिक्षित करणें, ह्यासारखें दुसरें स्पृहणीय व पवित्र कर्तव्य असेल, असें आह्मांला वाटत नाहीं. इंग्लंडांत युनिव्हर्सिटी-एक्स्टेनशन नामक उच्च शिक्षणप्रसाराच्या जशा सोयी आहेत, तशा इकडे झाल्यास फार चांगलें होईल, व तेणेंकरून सामान्य लोकांत विद्येचा अधिक प्रसार होईल.

प्रस्तुत निबंध अनेक ग्रंथाधार घेऊन व्यापक रीतीनें लिहिला आहे. यांत ज्या अनेक ग्रंथांतून आधार व उतारे घेतले आहेत, त्यांबद्दल ग्रंथकर्ता त्या ग्रंथकर्त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

हा माझा पहिलाच प्रयत्न असून वाचकांनीं हंसक्षीरन्यायानें यांतील चांगला तेवढाच भाग घ्यावा आणि वाईट तेवढा टाकावा, अशी त्यांना सविनय प्रार्थना आहे.

ता. ५–११–१९०० ग्रंथकर्ता.

---

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

मे. डायरेक्टर साहेब मुंबई इलाखा यांजकडून पहिल्या आवृत्तीचें परीक्षण होऊन ज्या सूचना आल्या, त्याप्रमाणें ही आवृत्ति दुरुस्त केली आहे. प्रसिद्ध ग्रंथकार आणि त्यांचें वाचन हा भाग थोडा वाढविला आहे. मराठी पुस्तकें हा भाग मोठा असल्यामुळें आणि अलिकडे मराठी पुस्तकांत बरीच भर पडल्यामुळें तो सुव्यवस्थित आणि थोडक्यांत लिहिला आहे. या विषयास उपयुक्त होईल अशाच तऱ्हेचा आतां उपसंहार केला आहे. परिशिष्टांत उत्तमोत्तमच पुस्तकें घातलीं आहेत. एकंदरींत पुस्तकाची मांडणी पूर्वीचीच कायम ठेविली आहे. तरुण विद्यार्थ्यांच्या हातीं हें पुस्तक पडावें, त्यांच्याठायीं वाचनाभिरुचि उत्पन्न व्हावी, हाच ग्रंथकर्त्याचा प्रधान हेतु असून त्याकरितां पूर्वीपेक्षां हल्लीं किंमत फारच कमी केली आहे.

मुंबई, ता. १–३–०७ ग्रंथकर्ता.

---

## तिसऱ्या व चवथ्या आवृत्तीची प्रस्तावना.

ठिकठिकाणच्या शाळाखात्यांच्या अधिकाऱ्यांकडून पुस्तकास आश्रय मिळाल्यामुळें दुसरी आवृत्ती संपून तिसऱ्या आवृत्तीचा सुयोग लवकरच आला, ह्याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार ऋणी आहे. दुसऱ्या आवृत्तींत जे दोष राहिले होते, ते काढून टाकून ही तिसरी आवृत्ति विशेष फेरफार न करितां तशीच छापिली आहे. तरी पूर्वीप्रमाणें पुस्तकास आश्रय देऊन मुलांमुलींच्या हातीं जेणेंकरून तें अधिक पडेल अशी व्यवस्था विद्याधिकारी करतील तर विद्यार्थ्यांचेठायीं वाचनाभिरुचि व विद्याभिरुचि उत्पन्न केल्यासारखें होईल. तिसऱ्या आवृत्तिबरहुकूम ही चवथी आवृत्ति छापिली आहे.

मुंबई ता. २४-३-१५ ग्रंथकर्ता.

# अनुक्रमणिका.


| भाग. | विषय. | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | ज्ञानाची महती | ९ |
| २. | ज्ञानार्जनाचीं पांच साधनें | १३ |
| ३. | ग्रंथ | २४ |
| ४. | वाचनाची अभिरुचि | ३२ |
| ५. | वाचावें कसें ? | ४१ |
| ६. | प्रसिद्ध ग्रंथकार आणि त्यांचें वाचन | ५० |
| ७. | स्मरणशक्ति व ती वाढवावी कशी | ५७ |
| ८. | वाङ्मय | ६५ |
| ९. | मराठी पुस्तकें | ८२ |
| १०. | उपसंहार | ९९ |
| | परिशिष्ट | १०५ |

# वाचन.

## ज्ञानाची महती.

### भाग १ ला.

**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते**--भगवद्गीता.

ज्ञानाचा मुख्य उद्देश झटला झणजे सुखाची प्राप्ति व दुःखाचा परिहार करणें हा असून याचकरितां सर्व मनुष्यप्राणी जगांत एकसारखे खपत असलेले आपण पहातों. मनुष्य सुशिक्षित असो वा अशिक्षित असो, तरुण असो वा वृद्ध असो, त्यास जेवढें झणून सुख मिळेल, तेवढें पाहिजे असतें. सुखाची व्याख्या ही निरनिराळ्या मनुष्याच्या कल्पनेप्रमाणें निरनिराळी असते. एकास अमुक एका गोष्टींत सुख वाटत असतें, तर त्याच गोष्टी-विषयीं दुसरा अगदीं उदासीन असतो इतकेंच नाहीं तर, त्याला ती गोष्ट दुःखप्रद होते. कोणास गोड खाण्यापासून, कोणास मद्यादि अमली पदार्थांच्या सेवनापासून, कोणास उत्तम वस्त्रांपासून तर कोणास अलंकारांपासून सुख होत असतें. कवडी कवडीचा संचय करण्यांतच कृपणास मोठी धन्यता वाटते ! परंतु त्याच्या उलट परोपकारी गृहस्थाची वृत्ति असते. परोपकारार्थ आपल्या द्रव्याचा व्यय करण्यांत त्याला मोठें भूषण वाटतें. सारांश, सुखाची कल्पना ही केवळ मानसिक असून ज्या त्या मनुष्याच्या बुद्धीप्रमाणें ती आकुंचित अथवा विस्तृत असते. मनुष्यास जसजसें अधिक ज्ञान

होत जातें, तसतशी त्याची सुखाची कल्पना उदात्त होत जाऊन 'आत्मवत् सर्वभूतानि' या तत्वास अनुसरून मनुष्यमात्रांस तो आपणाप्रमाणें मानूं लागतो.

मोत्याची किंमत त्याच्या पाण्यावर अवलंबून असते. जें मोतीं रुपया दोन रुपयांस मिळतें, तेंच पाणीदार असलें कीं, त्याची किंमत दसपट, वीसपट वाढते ! त्याचप्रमाणें मनुष्याचें आहे. मनुष्याची किंमत त्याच्या ज्ञानावर आहे, कित्येक विद्यार्जन करून ज्ञान संपादन करीत नाहींत, यामुळें जगांत त्यांची किंमतही फारशी वाढत नाहीं. परंतु कित्येक अगाध ज्ञान मिळवून श्रेष्ठता पावतात, लोकांस त्यांचा अभिमान वाटून ते त्यांचे एकसारखे गुणानुवाद गातात. पुष्कळ लोक त्यांच्या धोरणानें वागतात; त्यांचीं भाषणें ऐकण्यास फार आतुर असतात. ते गत झाल्यास सर्व लोक दुःखानें विव्हल होतात ! त्यांचीं स्मारकें करितात. परंतु दुसरे कित्येक लोक—अशांची संख्या हजारांनीं किंवा लाखांनीं असावयाची—केव्हां जन्मतात, कोठें रहातात व केव्हां मरतात, याची कधीं कोणी विचारपूससुद्धां करीत नाहीं ! याचें कारण हेंच कीं, नुसत्या मनुष्याची मुळींच किंमत नसून त्याच्या ज्ञानाची किंमत असते. पशुकोटींत मोजतां येतील इतके कित्येक लोक ज्ञानशून्य असतात, व कित्येक देवकोटींत शोभतील एवढी त्यांची योग्यता असते. कित्येक ज्ञानपर्वताच्या शिखरीं पोंहोचतात व कित्येक अज्ञानपंकांत तसेच लोळत पडतात.

आहार, निद्रा इत्यादि विकार जसे मनुष्यास असतात, तसेच पशूसही असतात. पशूपेक्षां मनुष्यास ज्ञानच काय तें अधिक असतें. पशुपक्ष्यांना परमेश्वरानें जी उपजत बुद्धि दिली आहे, तिच्या योगानें त्यांना आपणांपुरतें ज्ञान असतें. आहार, निद्रा, भय इत्यादि विकार त्यांना कळत असून तेवढ्यापुरती तरतूद

बि. १७५

ते करितात. परंतु त्यांपलीकडे त्यांना ज्ञान नसतें. जग हें काय आहे; त्यांतील वस्तुसंग्रह किती उपयुक्त आहे; ज्ञानभांडार केवढें प्रचंड आहे; मागल्या काळचे लोक कसे होते; वगैरे गोष्टींचें त्यांना कधींच ज्ञान होत नाहीं. परंतु परमेश्वरानें मनुष्याला बुद्धि नामक जी अमोल देणगी दिली आहे, तिच्या योगानें त्यास वरील गोष्टी समजतात इतकेंच नाहीं, तर त्याहीपेक्षां अज्ञात व दुर्बोध अशा अनेक गोष्टींचें ज्ञान त्याला करून घेतां येतें. परमेश्वराच्या खालोखाल मनुष्याची योग्यता मानली जात आहे, याचें कारण फक्त त्याची अमोल बुद्धिच होय.

ज्ञान हें विद्याध्ययनापासून मिळतें. विद्याध्ययनापासून जे अनेक फायदे होतात, त्यांचें **लार्ड बेकन** यानें फार उत्तम रीतीनें वर्णन केलें आहे. तो ह्मणतो कीं, " विद्याध्ययनापासून मनाला आनंद होतो. भाषणाला शोभा येते व बुद्धिही वाढते. एकांत-वासांत व निवांत स्थळीं असतांना, मनाची करमणूक करण्याला विद्या हेंच मुख्य साधन होय. आपलें संभाषण खुलवून देण्याला विद्या ही फार उपयोगी पडते. तसेंच एखाद्या कामाचा विचार करून त्याची जेथल्या तेथें व्यवस्था करितां येण्याला तिचा फार उपयोग होतो.

विद्याध्ययनानें स्वाभाविक गुण पक्क होतात आणि अनुभवानें विद्याध्ययन पक्क होतें. कारण अंगची बुद्धि ही आपोआप उगवलेल्या झाडाप्रमाणें आहे. त्या झाडाची खच्ची केल्यानें तें जसें जोमदार होतें, तसें अंगच्या बुद्धीवर विद्येचें कलम केल्यानें तीही बळकट व वृद्धिंगत होते. कावेबाज लोक विद्येचा धिक्कार करितात, साधेभोळे लोक तिचें कौतुक करितात व शहाणे लोक तिचा उपयोग करितात. "

सोनें जमिनींत सांपडतें. परंतु तें शोधून काढण्यास पुष्कळ परिश्रम करावे लागत असून खर्चही पुष्कळ येतो. जमीन जरी चांगली सुपीक असली, तरी तींत चांगलें पीक येण्यास तिची पुष्कळ मशागत करावी लागते, तरच तिचा विशेष उपयोग होतो. नुसता छानदार संगमरवरी दगड असून पुतळा बनत नाहीं, तर पुतळा बनविण्यास तो दगड मोठ्या कुशलतेनें कोरून काढला पाहिजे, तो घोंटला पाहिजे. त्याचप्रमाणें नुसती बुद्धि उत्तम असली तरी तिचा काय उपयोग? तिजवर विद्येचा संस्कार झाला तरच विद्वत्ता प्राप्त होते. ज्ञान हें एकदम मिळत नसतें. मधमाशी ज्याप्रमाणें महत्प्रयासानें थोडा थोडा मध गोळा करिते, त्याप्रमाणें ज्ञान सदैव थोडें थोडें संपादन करीत गेलें पाहिजे. तें एक दोन दिवसांत मिळत नसतें, तर तें मिळविण्यास वर्षानुवर्षें श्रम करावे लागतात. ज्याचें ज्ञान त्याला; त्याची एकाद्या वस्तूप्रमाणें अदलाबदल किंवा देवघेव करतां येत नाहीं. तसेंच स्वतः परिश्रम केल्याखेरीज तें कधींही मिळत नाहीं. अशी स्थिति आहे ह्मणूनच ज्ञानाची किंमत विशेष आहे, व त्याकरितां मनुष्यकोटी एवढी खटपट करीत आहे.

सिंह, व्याघ्र इत्यादि हिंस्र पशूंना मनुष्यानें अगदीं अंकित करून टाकिलें आहे. हत्ती, घोडे, उंट इत्यादि पशूंना तो गुलामांप्रमाणें आपल्या कामीं राबवून घेत आहे. जमिनीची लागवड करून तींतून आपल्या चरितार्थाकरितां धान्य फळफळावळ निर्माण करीत आहे. खाणींतून मौल्यवान् धातु, दगड इत्यादि अनेक पदार्थ शोधून काढून तो आपल्या गरजा भागवीत आहे. तसेंच हिरे, माणकें इत्यादि रत्नें काढून तो आपलें शरीर सुशोभित करीत आहे. ग्रंथ लिहून क्षणार्धांत नष्ट होणारे विचार अमर करून ठेवीत आहे. जल, अग्नि, वायु, प्रकाश या

तत्वांपासून सुद्धां तो काम करून घेत आहे. विद्युत्, वाफ, ग्यास इत्यादि अज्ञातशक्ति शोधून काढून त्यांच्या साहाय्यानें तो अनेक उपयुक्त कामें करून घेत आहे. आकाशाच्या पोकळींत, पृथ्वीच्या पाठीवर किंवा पोटांत काय आहे, यांविषयीं त्यानें बरीच माहिती मिळविली आहे; व अधिक माहिती मिळविण्याची त्याची खटपट चालू आहे. या व इतर अनेक गोष्टी त्यास साध्य झाल्या आहेत, याचें मुख्य कारण काय ?—तर ज्ञान.

## भाग २ रा.

## ज्ञानार्जनाचीं पांच साधनें.

**विद्यार्थ्यांनीं**–खालीं सांगितलेल्या पांच साधनांच्या द्वारें ज्ञानार्जनाचा प्रयत्न केला असतां वाचनापासून मिळणाऱ्या ज्ञानाची फलप्राप्ति व पूर्णता अधिक होणार आहे. ज्ञान मिळविण्याचीं एकंदर पांच साधनें असून, त्यांपैकींच वाचन हें एक साधन होय. वाचनाविषयीं लिहावयाचें ह्मटलें ह्मणजे तदितर जीं ज्ञानार्जनाचीं चार साधनें आहेत, त्यांविषयीं प्रथम थोडेंसें सांगणें अवश्य आहे. ह्मणजे **वाचन** हें किती सुलभ व उत्तम साधन आहे, हें वाचकांस सहज कळून येईल. शिवाय एकाच वेळीं दुसऱ्या सर्व साधनांचा नेहमीं उपयोग करून घेत गेल्यानें वाचकांस विशेष फायदा होईल. ( १ ) **अवलोकन**, ( २ ) **संवाद**, ( ३ ) **वाचन**, ( ४ ) **भाषण** आणि ( ५ ) **मनन**, हीं ज्ञानार्जनाचीं पांच साधनें होत. या पांच साधनांच्या द्वारें ज्ञान मिळविण्याचा मनुष्यानें सतत प्रयत्न केला पाहिजे.

१. **अवलोकन.**—आपण स्वतःविषयीं, दुसऱ्यांविषयीं किंवा जगांतील कोणत्याही गोष्टीविषयीं जें मनःपूर्वक व बारीक रीतीनें

निरीक्षण करतों, त्यास ‘ अवलोकन ’ असें ह्मणतात. अवलोकन करण्याची संवय सर्वांस असते असें नाहीं. सर्व मनुष्यें रात्रंदिवस एकसारखे कांहीं तरी व्यवहार करीत असतात. परंतु, आपण काय करीत आहों, कशाकरितां करीत आहों, त्यापासून काय परिणाम होईल, हें असेंच कां करावें किंवा कां करूं नये, असे अनेक प्रश्न मनांत आणून आपल्या डोळ्यांपुढें ज्या गोष्टी घडत आहेत, त्यांजकडे विचारपूर्वक व शोधक दृष्टीनें पहाणारे असे फारच थोडे लोक असतात. पुष्कळ लोक डोळ्यांनीं पाहतात व कानांनीं ऐकतात, परंतु नुसत्या पहाण्या–ऐकण्या पलीकडे किंवा काम करण्यापलीकडे ते मुळींच विचार करीत नसतात. अशा लोकांस अंतर्दृष्टि ह्मणजे काय, हें जन्मांतही कळत नाहीं. बाह्यदृष्टीपेक्षां अंतर्दृष्टीची किंमत विशेष असून, तीपासून मनुष्याला यथार्थ व पुष्कळ ज्ञान प्राप्त होतें. मोठमोठे कवि, ग्रंथकार, मुत्सद्दी, तत्वज्ञानी, धर्मसंस्थापक यांना अंतर्दृष्टि विशेष असते; ह्मणूनच सामान्य जनांपेक्षां त्यांना विशेष तत्वज्ञान असतें; याच अंतर्दृष्टीमुळें त्यांचें विशेष तेज पडतें व ते महत्पद पावतात.

सृष्टि ही शिक्षणाची मोठी शाळा आहे. या शाळेंत मनुष्यास जें शिक्षण मिळतें, तें प्रत्यक्ष व अनुभविक असून, मोठमोठ्या पाठशाळेंत मिळालेलें शिक्षण त्यापुढें रद्द होय. मोठमोठे कवि, ग्रंथकार, योद्धे, राजकारणपटु व व्यवहारपटु लोक याच शाळेंत अधिक शिकले आहेत. अवलोकनास आद्यस्थान द्यावयाचें याचें कारण हें कीं, प्रत्यक्ष वस्तु पाहून व स्वतः विचार करून मनुष्य येथें ज्ञान संपादन करतो. तें मिळविण्यांत स्वतः परिश्रम केल्यानें त्याची बुद्धि तीव्र होते व त्याला स्वतंत्र विचार करण्याची हळूहळू संवय लागते. दुसऱ्यांचें उच्छिष्ट ज्ञान संपादन करण्यांत बुद्धीस फारसें घर्षण पडत नसल्यामुळें, ती विशेष

विकासही पावत नाहीं. अवलोकन हें सर्वकाळीं व सर्व स्थळीं करितां येण्यासारखें असल्यामुळें, त्यापासून आपणास सहज पुष्कळ ज्ञान प्राप्त करून घेतां येतें.

अवलोकन करण्याची संवय मुलांना लहानपणापासून लागावी, हाच अवलोकन–शिक्षणपद्धतीचा मुख्य हेतु होय. अवलोकनाची संवय लहानपणापासून लाविली ह्मणजे पुढें ती आपोआप वृद्धिंगत होते. मुलें लहानपणीं फार जिज्ञासु असतात. कोणतीही गोष्ट पाहिली किंवा ऐकिली ह्मणजे तीं तिजविषयीं साहजिक अनेक प्रश्न विचारतात. अशा वेळीं त्यांच्या शोधकबुद्धीस योग्य वळण देऊन, त्यांना अवलोकनाची संवय लावावी. अवलोकनाची संवय लागली ह्मणजे जगांतील ज्ञानभांडार अंशतः तरी त्यांना खुलें झालें असें समजावें. कवि किंवा कादंबरीकार हे ज्या गोष्टी पाहतात, त्यांपासून ते साधारण मनुष्यापेक्षां अधिक ज्ञान संपादन करून घेतात. त्यांतील तत्वें शोधून काढतात आणि त्याचमुळें त्यांचे ग्रंथ एवढे हृद्यंगम व बोधप्रद होतात. आंग्ल कविवर्य शेक्सपियर यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, "अवलोकनशक्ति ही एक दिव्यदृष्टि होय. ती ज्याला असेल, त्याला दगडाधोंड्यांत, झाडापाल्यांत, प्रत्येक वस्तूमध्यें कांहीं कांहीं जें दुसऱ्याला दिसत नाहीं, ऐकूं येत नाहीं, किंवा समजत नाहीं, असें दिसतें." पण तें कोणाला ? जो लक्षपूर्वक अवलोकन करील त्याला. ज्याला अवलोकन ह्मणजे काय, हें जन्मांतही ठाऊक नाहीं, अशाला पदार्थसंग्रहालयांत किंवा नंदनवनांत जरी नेऊन ठेविलें, तरी तो बापडा तेथें काय अधिक शिकणार आहे !

झाडावरून फळें पडतांना पूर्वीं अनेक लोकांनीं पाहिलीं. त्यांत कोणासही विशेष कांहीं वाटलें नाहीं. परंतु असेंच फळ पडतांना,

**सर आयझाक न्यूटन** यानें पाहिलें; तेव्हां त्यानें गुरुत्वाकर्षणाचा अत्यंत महत्वाचा नियम शोधून काढला. चुलीवर पदार्थ शिजत असतांना वाफेनें भांड्यावरील झांकण हालतें, ही गोष्ट दररोज पुष्कळांच्या पाहण्यांत आली होती. परंतु, त्यावरून वाफेच्या यंत्राचा शोध लावून मनुष्यप्राण्यांच्या सुखांत भर घालण्याचें श्रेय **जेम्स वॉट** यानेंच घेतलें. गाईच्या आंचळांवरील देवी पाहून **डॉक्टर जेन्नर** यानें गोस्तनदेवींचा शोध लाविला ! अशा रीतीनें लहान-सहान गोष्टींवरून मोठमोठे शोध लागले आहेत. हें कशाचें फळ ? अर्थात् **अवलोकनाचें** !

**२ संवाद**—ज्ञानानें जे आपल्या बरोबरीचे किंवा आपल्यापेक्षां श्रेष्ठ असतात, अशा लोकांशीं एकाद्या विषयावर बोललें असतांना दोन फायदे होतात. (१) आपलीं मतें चुकीचीं आहेत किंवा बरोबर आहेत, हें कसोटीस लावून पाहतां येतें. (२) आणि आपणांस त्या संवादापासून अधिक ज्ञान प्राप्त होतें. आपल्या प्राचीन ग्रंथांत ठिकठिकाणीं गुरूविषयीं विशेष वर्णन लिहिलेलें आढळून येतें. गुरु हे जिवंत विचारांचें भांडार होत. विद्यार्थ्यांची ग्राहकशक्ति पाहून किंवा त्यांच्या विचारांची मजल कोठवर जात आहे, हें पाहून ते उपदेश करितात. मनुष्यमात्रांस अगदीं एकाच लांबीरुंदीचे कपडे घालूं ह्मटल्यास हें ह्मणणें अगदीं हास्यास्पद होईल; इतकेंच नाहीं, तर तसें करणेंही अशक्य होईल. त्याप्रमाणें सद्बोधाचें आहे. मनुष्याचा अधिकार पाहून त्याप्रमाणें त्यास बोध केला पाहिजे. पाठ सांगतेवेळीं गुरु प्रथम आपल्या शिष्याच्या शंकांचें समाधान करितो, व नंतर त्यास पाठ चांगल्या रीतीनें समजावून सांगतो. त्यामुळें, विद्यार्थ्यांचें शिक्षण अगदीं पायाशुद्ध होतें. **लहानपणीं गुरुमुखाची** फार आवश्यकता असते. गुरुमुखाशिवाय कोणत्याही विषयांत प्रवेश होणें अगदीं अशक्य होय.

प्राचीनकाळीं गुरूस अतिशय मान मिळत असे. * याचें कारण हें कीं, पूर्वीं ग्रंथ फार दुर्मिळ असल्यामुळें विद्वान् लोकांस ते पाठ करावे लागत असत. हल्लींप्रमाणें तेव्हां ग्रंथलेखनाची प्रवृत्ति नसल्यामुळें, नवीन सुचलेले विचार विद्वान् लोक तोंडींच एकमेकांस कळवीत असत. अशा रीतीनें सर्व ज्ञानभांडार तोंडींच असल्यामुळें तें शिकण्यास गुरूचीच आवश्यकता असून गुरुशिष्यपरंपरेनें तें अस्तित्वांत रहात असे. उदाहरणार्थ, वेद हे जगांतील आद्य धर्मग्रंथ असून ते आज शेंकडों वर्षें केवळ ब्राह्मणांच्या जिव्हाग्रीं होते. ‡ गुरुशिष्यपरंपरेमुळेंच ते अस्तित्वांत राहिले आहेत. उपनिषद्ग्रंथ गुरुशिष्यसंवादरूपानें लिहिलेले आहेत. ग्रीक तत्ववेत्ता सॉक्रेटीस हा संवादरूपानें आपल्या शिष्यवर्गास बोध करीत असे. यावरून **गुरुशिष्यसंवादाचें** पूर्वीं केवढें महत्त्व होतें, याची साक्ष आज सहज पटत आहे.

अलीकडे छापण्याची कला निघाल्यापासून ग्रंथांची समृद्धि झाली असून गोरगरिबांससुद्धां ग्रंथ सुलभ झाले आहेत. परंतु त्यामुळें आतां गुरुमुखाची गरज राहिली नाहीं, असें मुळींच नाहीं. विद्यार्थ्यांस शंका आली कीं, तिची निवृत्ति करण्यास व विवेचन करून विषय समजावून सांगण्यास गुरूची आवश्यकता आहेच. एखाद्या किर्र झाडीच्या भयाण जंगलांतून आपणास प्रवास करणें

---

* सद्गुरूविण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं ॥
अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहतचि गेले ॥ १ ॥
सद्गुरूविण जन्म निर्फळ । सद्गुरूविण दुःख सकळ ।
सद्गुरूविण तळमळ । जाणार नाहीं ॥ २ ॥ —रामदास.

‡ ह्यामुळेंच ब्राह्मणांस वेदमूर्ति ह्मणण्याचा प्रघात पडला असावा असें दिसतें.

असून कांहीं वेळपर्यंत वाट चालल्यावर आपण भांबावलों आणि कोणीकडे जावें हें आपणास सुचेनासें झालें तर आपली काय स्थिति होईल ? अशा वेळीं आपणास जर कोणी वाटाड्या भेटला आणि त्यानें उत्तम व सुलभ मार्गानें आपणास त्या जंगलांतून बाहेर काढिलें, तर आपणास केवढा आनंद होईल बरें ! त्या वाटाड्याचे उपकार आपण कधींही विसरणार नाहीं ! तद्वत्च गुरूचें होय. ते जगांतील खांचखळगे वगैरे अनेक अडचणी आपणांस दाखवितात, आणि ज्ञान देऊन सन्मार्गास लावितात.

जे आपले समवयस्क व सहाध्यायी सहृदय मित्र असतील, त्यांशीं वादविवाद केल्यानें कधींकधीं आपली शंकानिवृत्ति होऊन आपणास त्यांच्या ज्ञानाचा लाभ होतो. त्यांचे विचार आपणास कळतात व त्यांनाही आपल्या ज्ञानाचा फायदा मिळतो. आपले विचार नेहमीं खरे आणि बरोबरच असतात असें नाहीं. मित्राबरोबर त्यांविषयीं ऊहापोह केल्यानें त्या विचारांत सत्य भाग किती आणि असत्य किती, हें तेव्हांच कळून येतें, ' वादे वादे जायते तत्वबोधः ' ही ह्मण सर्वत्र प्रसिद्ध आहे.

अवलोकनांत किंवा ग्रंथवाचनांत आपणास ज्या शंका येतात, त्यांचें निरसन गुरूशीं किंवा मित्रांशीं संवाद केल्यानें तेव्हांच होतें. कोणत्याही विषयासंबंधानें आपण विचार करीत असतांना आपणांस अनेक शंका येतात, व आपलें मन अगदीं गोंधळून जातें. एकाद्या प्रचंड खडकाप्रमाणें त्या आपणास दुर्गम वाटून आपले सर्व विचार ठिकच्याठिकाणीं लुटपुटतात, आपली मति कुंठित होते, अशा स्थितींत आपणापेक्षां ज्ञानानें जो श्रेष्ठ अशा मनुष्याजवळ जाऊन त्यास आपले विचार कळवून, त्याजकडून संशयनिवृत्ति करून घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं. याकरितां संवादाचें महत्व विशेष आहे.

नि. १९१८

**३ वाचन.**—गुरूचा समागम होऊन त्याशीं संवाद करण्यास सर्वांस मिळतें असें नाहीं, आणि कदाचित् असा दुर्मिळ योग घडून आला तरी तो फार दिवस टिकत नाहीं. दैववशात् आपणास चांगले व हुशार मित्र मिळाले तरी आपली व त्यांची मैत्री नेहमीं कायम राहील आणि ते व आपण निरंतर एके ठिकाणीं राहूं असें कोणीही सांगू शकणार नाहीं. जशी स्थिति प्राप्त होईल, तीप्रमाणें रहाणें मनुष्यास भाग पडतें. याकरितां सर्व स्थळीं व सर्व प्रसंगीं उपयोगी पडणारें असें ज्ञानाचें उत्तम साधन म्हटलें म्हणजे वाचन होय. मनुष्य श्रीमंत असो वा दरिद्री असो, तो राजवाड्यांत राहो किंवा भिकारड्या झोंपडींत राहो, त्यास मित्र असोत वा नसोत, तो आपल्या वैभवशिखरीं असो किंवा दुःखानें त्याचें काळीज होरपळून गेलेलें असो, त्यास वाचनासारखें मनोरंजक आणि ज्ञानप्राप्तीचें सुलभ असें दुसरें साधन नाहीं.

ज्या गांवांत आपण रहात असूं, तेथील विद्वान् लोकांशीं परिचय करून त्यांपासून आपणास ज्ञान संपादन करून घेतां येईल. परंतु त्या गांवाशिवाय अन्य गांवीं व अन्य देशीं जे विद्वान् लोक रहात असतील त्यांचा व आपला परिचय कसा होणार ? तसेंच आपले चार पांच मित्र खेरीज करून इतरांशीं वादविवाद करण्यास आपणास कसें सांपडणार ? परंतु वाचनाच्या योगानें आपणास दूरदूरच्या लोकांशीं, आधुनिक व प्राचीन विद्वान् मंडळीशीं सहज परिचय करून घेतां येतो व त्यांच्या उपदेशामृताचा यथेच्छ लाभ घेतां येतो. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका ह्या देशांतील, तसेंच आपल्या देशांत दूर प्रदेशीं राहणाऱ्या ज्ञानसंपन्न मनुष्याच्या ज्ञानाचा फायदा आपणास बसल्या ठिकाणीं करून घेतां येतो; त्याकरितां आपणास फिरावें लागत नाहीं, किंवा देशान्तर करावें लागत नाहीं.

तसेंच जे विद्वान् लोक जगांत पूर्वकाळीं होऊन गेले व विचार रूपानेंच जे आज जगांत हयात आहेत, अशा लोकांच्या ज्ञानाचा फायदा आपणास वाचनाच्या योगानें सहज करून घेतां येतो. **होमर, व्हर्जिल, शेक्स्पियर, कालिदास** या अलौकिक बुद्धीच्या पुरुषश्रेष्ठांस हें जग सोडून कित्येक शतकें झालीं, त्यांचीं मृतशरीरें मातीशीं मिळून गेलीं, तरी ते विचाररूपानें जिवंत असून आपणांबरोबर बोलण्यास, हांसण्यास, आपणांस उपदेश करण्यास सदा तत्पर आहेत. त्यांनीं आपले उत्तमोत्तम विचार आपल्या ग्रंथांत लिहून ठेविले आहेत. मात्र आपण त्यांचे ग्रंथ वाचले म्हणजे झालें.

पूर्वीं ग्रंथ फार दुर्मिळ असत. मोठमोठ्या ग्रंथसंग्रहालयांत दोनशें अडीचशेंपेक्षां अधिक ग्रंथ क्वचित् असत. सर्व ग्रंथ हातानें लिहून काढावे लागत असल्यामुळें, ग्रंथ पहाण्याससुद्धां मिळत नसत. आणि याकरितां ते समग्र पाठ करावे लागत असत. अशी स्थिति असल्यामुळें गुरुमुख व संवाद हीं त्या काळीं ज्ञान मिळविण्याचीं मुख्य दोन साधनें असून, त्यांची योग्यता सर्वत्र विशेष समजली जात असे. परंतु **गाटेनबर्ग** यानें छापण्याच्या कलेचा शोध लाविल्यापासून पूर्वींची सर्व स्थिति बदलली. जे ग्रंथ पूर्वीं पाहण्यास सुद्धां मिळत नसत, ते अति स्वल्प किंमतींत सर्वांस मिळूं लागले. नवीन ग्रंथ छापून भराभर निघूं लागले. यामुळें वाचनाची अभिरुचि वाढून वाचन हें ज्ञान प्राप्त करून घेण्याचें मुख्य साधन झालें. ज्ञानसंपन्न लोकांत वाचनाची अभिरुचि वाढली. वाचन हा विषय फार मोठा असल्यामुळें व याच विषयाचें या निबंधांत विवेचन करावयाचें असल्यामुळें, या विषयांतर्गत सर्व गोष्टींचें यथानुक्रमें विवेचन होईल. प्रस्तुत आपणास ज्ञानाचें जें चवथें साधन **भाषण** त्याकडे वळलें पाहिजे.

**४. भाषण** अथवा **व्याख्यान.**—एकच मनुष्य ह्मणेल कीं, मी वनस्पतिशास्त्र, भूगर्भशास्त्र, पश्वादिप्राणिशास्त्र, रसायनशास्त्र, खगोलशास्त्र इत्यादि अनेक शास्त्रें शिकेन, तर तें त्याचें ह्मणणें अगदीं वेडेपणाचें होईल. जगांतील ज्ञानसंचय इतका वाढला आहे कीं, फक्त एकच शास्त्र घेऊन त्याचा अभ्यास करण्यास वर्षानुवर्षे घालवावीं लागतात, तेव्हां कोठें त्या शास्त्रांत प्रविणता प्राप्त होते. नंतर पुढें त्या शास्त्रासंबंधीं नवीन ग्रंथ लिहिण्याइतकी किंवा नवीन शोध करण्याइतकी विद्वत्ता अंगीं येते. असे जे ज्ञानसंपन्न लोक असतात, ते आपल्या आवडत्या विषयासंबंधानें व्याख्यानें देतात.* त्या शास्त्रासंबंधानें प्राचीन किंवा अर्वाचीन ग्रंथकारांचीं मतें चुकीचीं दिसल्यास किंवा त्या शास्त्राविषयीं नवीन शोध लागले असल्यास ते जनसमूहापुढें मांडण्यास भाषणासारखें दुसरें उत्तम साधन नाहीं. कधीं कधी अशा भाषणास उत्तरादाखल दुसरींही भाषणें होतात. आणि मग वर्तमानपत्रांत वादविवाद चालू होऊन कांहीं काळानें सत्य तेवढ्या गोष्टी लोकांस कळतात आणि पुढें पुस्तकरूपानें त्यांना कायमचें स्वरूप मिळतें.

कोणताही एकादा विषय घेऊन त्यावर कांहीं लोक आपल्या मंडळीमध्यें व्याख्यानें देतात. लहान लहान व उपयुक्त विषय घेऊन शिक्षक विद्यार्थ्यांस भाषणद्वारा त्या विषयासंबंधीं माहिती करून देतात. धर्मोपदेशक भाषणद्वारा धर्मोपदेश करितात. कोणी एखादें सुरम्य स्थळ पाहिलें असतां किंवा कोणी अन्य देशांत जाऊन तिकडील लोकांच्या चालीरीति पाहून आला असतां त्या मनुष्याचीं व्याख्यानें होतात, व त्यांपासून श्रोतृवृंदास अनायासें,

---

* आपण यथेष्ट जेवणें । उरलें अन्न तें वांटणें ॥
परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे ॥ १ ॥
तैसें ज्ञानीं तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जगासीं सांगावें ।
तरतें बुडों न द्यावें । बुडत्यासी ॥ २ ॥ —रामदास.

पुष्कळ माहिती मिळते. भाषणाची प्रवृत्ति जरी पूर्वापार चालत आली आहे, तरी अलीकडे तिला बरेंच प्रोत्साहन मिळालें आहे. भाषणाच्या शेवटीं व्याख्यात्यास प्रश्न विचारून शंकानिवृत्ति करण्याची चाल पाश्चात्य देशांत आहे. तीपासून विशेष फायदा होतो. कारण, श्रोतृसमाजापैकीं कोणास कांहीं शंका असल्यास अथवा व्याख्यात्यापासून कोणास कांहीं विशेष माहिती पाहिजे असल्यास, ती त्यास सहज मिळवितां येते.

जनसमूहाच्या मनांत कोणतीही गोष्ट भरवून देण्यास व तीसंबंधानें लोकांत चळवळ सुरू करण्यास व्याख्यानासारखें अन्य साधन नाहीं. डिमॉस्थेनिस व सिसरो या प्राचीन महात्म्यांनीं आपल्या अलौकिक वाणीनें ग्रीक व रोमन राष्ट्रांस अगदीं हालवून सोडलें, लोकांस जागृत करून त्यांच्या अंगांत वीरश्री उत्पन्न केली. हिंदुस्थानचा पहिला गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्स याची पार्लमेंट सभेंत चवकशी चालू असतांना एडमंड बर्क यानें जें अस्खलित व आवेशयुक्त भाषण केलें, ते ऐकून खुद्द वॉरन हेस्टिंग्स याच्या डोळ्यांत अश्रुबिंदु आले! सर्व सभा अगदीं थक्क झाली, व बर्क सांगतो तें शब्दशः खरें आहे, असें सर्वांना वाटलें! केवढा हा भाषणाचा प्रभाव! फ्रान्स देशांत राज्यक्रांति होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं, तेव्हां सर्व युरोपखंडांत विद्वान् व राज्यकारणी मंडळांत मोठी चर्चा होऊन विलक्षण चळवळ झाली, ती बर्क यास न आवडून तिच्याविरुद्ध त्यानें पार्लमेंटांत मोठ्या आवेशाचीं भाषणें केलीं. परंतु भाषणाचा प्रभाव नियमित स्थळीं व नियमित प्रेक्षकांवरच काय तो पडणार व तो त्या प्रसंगाच्या मानानें अगदीं अल्प आहे, असें त्यास कळून आलें, तेव्हां त्यानें लागलीच अक्षरजननी उचलली व असा उत्कृष्ट निबंध लिहिला कीं, त्याचा प्रसार सर्व यूरोपखंडभर होऊन तेणेंकरून राज्यक्रांतीची लाट जी सर्व राष्ट्रांवर लवकरच उसळणार होती, ती ठिकाणच्याठिकाणीं विराम पावली. **व्होल्टेर** आणि **रासो** या फ्रेंच ग्रंथकारांच्या लिहिण्याचा एवढा प्रभाव

झाला कीं, सर्व राष्ट्र क्षुब्ध होऊन फ्रान्सांत राज्यक्रांति झाली. **व्होलटेर** याच्या लेखणीचा प्रभाव एवढा मोठा होता कीं, जर्मन बादशहा **फ्रेडरिक धि ग्रेट** हा त्याशीं मैत्री करून असे. यावरून वक्तृत्वापेक्षां प्रसंगविशेषीं लेखनाचा प्रभाव फार मोठा असतो, हें उघड आहे.

**५ मनन.**—पचनशक्तीच जर अंगांत नाहीं तर पौष्टिक पदार्थ खाण्यापासून काय उपयोग ? ती अंगीं असली ह्मणजे पौष्टिक पदार्थ पचवून त्यांतील सत्व आपलेंसें करून घेतां येतें. तसेंच दुसऱ्यांचे विचार आपलेसे करून घेण्यास अगोदर ते ऐकिले पाहिजेत किंवा वाचले पाहिजेत, आणि नंतर त्यांविषयीं मनन केलें पाहिजे, ह्मणजे ते विचार अगदीं आपलेसे होतात. नुसतें अवलोकन करून, वाचून, व्याख्यानें ऐकून किंवा वादविवाद करून कधींही भागावयाचें नाहीं. तीं ध्यानांत राहण्यास किंवा त्यांतील सत्यासत्य समजण्यास आपणास त्यांविषयीं विचार केला पाहिजे; तरच तीं आपल्या मनांत उतरतील, ध्यानांत राहतील; नाहींतर हजारों व्याख्यानें ऐकिलीं किंवा भारेच्याभारे पुस्तकें वाचलीं तरी, त्यांपासून काडीएवढाही फायदा होणार नाहीं. *

कोणत्याही गोष्टींचा आपण जोंपर्यंत विचार करीत नाहीं, तोंपर्यंत त्या आपणास कळत नाहींत. परंतु एकदां विचार करूं लागलों कीं, मग त्या गोष्टी आपणास सहज कळूं लागतात. तसेंच ज्या गोष्टी दुर्बोध वाटून आपले विचार कुंठित होतात, त्यांचाही विचाराच्या साहाय्यानें उलगडा होतो. बैलाची मान, घोड्याची

---

* चिंतनासि नलगे वेळ । सर्वकाळ करावें—तुकाराम.
सेविलेंचि सेवावें अन्न । घेतिलेंचि घ्यावें जीवन ।
तैसें श्रवण मनन । केलेंचि पाहिजे ॥ १ ॥
सकळांमध्यें विशेष श्रवण । श्रवणाहून थोर मनन ।
मननें होय समाधान । बहुत जनाचें ॥ २ ॥—रामदास.

छाती, लोहाराचा हात, तालीमबाजाचें शरीर, हीं सहवासानें अथवा संवयीनें जशीं घट्ट होतात, तशी विचार करण्याची संवय असली ह्मणजे विचारशक्ति वृद्धिंगत होते.

जगांत अनेक धर्म, अनेक पंथ, अनेक मतें प्रचलित आहेत, तसेंच सत्य आणि असत्य यांची अगदीं भेसळ झालेली आहे. त्यांतून आपणांस सत्य शोधून काढून सत्यावलंबन करावयाचें आहे. तरी आपणांस आपली विचारशक्ति वाढविली पाहिजे. विचारशक्ति ही दिव्यज्योति असून हिच्या साहाय्यानें सत्य काय, असत्य काय, हें आपणास कळूं लागतें. अवलोकन करण्यांत, वाचनांत, किंवा वादविवाद करण्यांत आपण जेवढा वेळ घालवितों तेवढाच वेळ आपण त्या गोष्टींचें मनन करण्यांत घालविण्याचा क्रम ठेविला तर, जें ज्ञान किंवा जो अनुभव मिळण्यास इतरांस वर्षेंच्यावर्षें लागतात, तें ज्ञान किंवा तो अनुभव आपणांस अल्पकाळांत साध्य करून घेतां येईल.

---

# भाग ३ रा.

## ग्रंथ.

जेणें धारिष्ट चढे । जेणें परोपकार घडे ।
जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ॥
जेणें होय उपरती । अवगुण अवघे पालटती ।
जेणें चुके अधोगती । त्या नांव ग्रंथ ॥

रामदास.

प्रसिद्ध रोमन वक्ता **सिसरो** यानें लेखनकलेविषयीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, ‘ लेखनकला जर नसती तर, मूळारंभीं जी जगाची स्थिति होती, तिजपेक्षां पुढें पाऊल पडतें ना. ’ हें त्याचें ह्मणणें शब्दशः खरें आहे. अमेरिकेंतील तांबडे

ग्रंथ.



**इंडियन**, आफ्रिकेंतील **झुलु** किंवा ऑस्ट्रेलियांतील **मोराई** ह्या लोकांकडे पाहिलें आणि त्यांच्या स्थितीविषयीं विचार केला असतां **सिसरो**चें हें ह्मणणें अगदीं खरें आहे, असें आपल्या पूर्ण अनुभवास येतें. आज विसावें शतक लागलें आहे, तरी त्यांची स्थिति अगदीं पहिल्याप्रमाणें आहे. आगगाड्या, तारायंत्रें, मुद्रणकला वगैरे अनेक शोध लागल्यामुळें, जगाची उन्नति झपाट्यानें होत आहे. पूर्वीं राजवाड्यांतसुद्धां ज्या वस्तु क्वचित् पाहण्यास मिळत असत, त्या यंत्रांच्या साहाय्यानें अति स्वल्प झाल्यामुळें, झोंपडींत सुद्धां आतां दृष्टीस पडूं लागल्या आहेत. जे ग्रंथ पूर्वीं महान् पंडितांनाही पाहण्यास मिळत नव्हते, ते आतां स्वल्प किंमतींत मिळूं लागल्यामुळें गोरगरिबांससुद्धां संग्रहीं ठेवितां येतात. अशीं सुखवृद्धीचीं अनेक साधनें प्राप्त झालीं असून, **झुलु** किंवा **मोराई** लोक हे रानटी स्थितींत कां? शिकार करून भक्ष्य मिळवावें, आणि गवताची झोंपडी बांधून तींत रहावें, यापलीकडे त्यांना फारसें कां समजूं नये? याचें मुख्य कारण हें कीं, त्यांच्यांत लेखनकला नाहीं. मनुष्याची उत्कर्षाची किंवा उन्नतीची सर्व इमारत लेखनकलेवर उभारलेली आहे.

विचार हे आकाशांतील विद्युल्लतेप्रमाणें चंचल व क्षणिक असतात. ते उद्भवतात आणि क्षणार्धांत नाहींसे होतात. ते उद्भवले ह्मणजे त्यांजविषयीं विचार करून आपला अनुभव, ज्ञान व अवलोकन यांत त्यांना गोंवून टाकलें, तरच ते कांहीं काळ टिकतात. परंतु असें केल्यानेंही ते फारसे टिकण्याचा संभव नाहीं. कारण ज्या मनुष्याच्या डोक्यांत ते असतील त्याचा अंत झाला कीं, त्याबरोबर तेही नष्ट होतात. लेखनकलेच्या योगानें विचारांना स्थिरत्व देतां येतें व ते अमर करितां येतात. लेखनकला नसती तर आपण **होमर**, **व्हर्जिल**, **प्लेटो**, **सिसरो** इत्यादि ग्रीक व रोमन विद्वद्रत्नांच्या; **व्यास**, **वाल्मीकि**, **कालिदास**, **रामदास**, **तुकाराम** या आर्य कविवर्यांच्या; तसेंच **शेक्स्पियर**, **मिल्टन**, **टेनिसन** या

आंग्ल कविश्रेष्ठांच्या सुरस, उत्तमोत्तम व मोलवान् विचारांस काय-मचे मुकलों असतों. त्या अलौकिक पुरुषांचीं मृण्मय शरीरें जरी नष्ट झालीं आहेत, तरी ते विचाररूपानें जगांत अस्तित्वांत आहेत. * फार प्राचीन काळीं खाल्डियन, आसिरियन् आणि इजिप्शियन् हे लोक बरेच सुधारलेले असून, त्यांनीं अनेक नवीन नवीन शोध लाविले होते, परंतु त्या लोकांचे इतिहास बरोबर लिहिले नसल्याकारणानें त्यांजविषयींचें बहुतेक ज्ञान नष्ट झालें आहे. त्यांच्या ज्या कांहीं वस्तु सांपडत आहेत त्यांवरून अनुमानानें त्यांच्याविषयीं शोध चालू आहेत.

**लॉर्ड बेकन** यानें ग्रंथांची जहाजांशीं तुलना केली आहे. नौकांच्या साहाय्यानें जसा या देशांतील माल त्या देशांत आणि त्या देशांतील माल या देशांत आणितां येतो, तद्वत् या ग्रंथनौकांच्या साहाय्यानें अन्य देशांतील ज्ञानभांडार आपल्या देशांत आणून आपल्या देशबांधवांना ज्ञानसंपन्न करितां येतें. इंग्लिश लोकांनीं या ग्रंथनौकांच्या साहाय्यानें देशोदेशांतून ज्ञानभांडार आणून तें आपल्या देशांच्या किनाऱ्यावर उतरून घेतलें व त्याचा आपल्या देशबांधवांना पूर्ण लाभ होईल अशा अनेक सोयी केल्या. दुसरीं राष्ट्रेंही याच कामीं गुंतलेलीं आहेत. जगांत आमचें पाऊल पुढें पडावें अशी जर आपली मनापासून इच्छा असेल तर, विचाररूपी मालानें भरलेल्या या ग्रंथनौका आम्हीं आपल्या देशांत आणून त्यांतील ज्ञानभांडार आपल्या देशबांधवांना अमुप वांटलें पाहिजे.

गुरूची योग्यता सर्व देशांत विशेष मानितात. आम्हीं ह्मणतों, ग्रंथ हे आपणांस गुरुस्थानीं होत. **साक्रेटीस, प्लेटो, मार्कस**

* एका आंग्ल कवीनें ह्मटलें आहे:—

'Tis said that memory is age.
And that though dead, men are alive.
Removed from sorrow, care and strife,
They live because their works survive.

**ऑरेलियस** यांसारखें तत्वज्ञानी; **गौतमबुद्ध, शंकराचार्य** आणि **महंमद** यांसारखे धर्मसंस्थापक; तसेंच **व्यास, वाल्मीकि, शेक्स्पियर, मिल्टन** यांसारखे कविवर्य; यांनीं ज्या कामीं आपलें सर्व आयुष्य वेंचलें, तेंच काम ते जरी आज विद्यमान नाहींत तरी, पूर्वीपेक्षांही अधिक प्रमाणानें करीत आहेत. त्यांच्या विचारांचा किंवा उक्तींचा रिघाव एखाद्या भिकार झोंपड्यापासून तों सुंदर दैदीप्यमान राजवाड्यापर्यंत झाला आहे. त्यांचे उत्तमोत्तम विचार त्यांच्या ग्रंथांत गोंविले असल्यामुळें आपणास वाटेल त्यावेळीं ते वाचण्यास किंवा ऐकण्यास मिळतात. पूर्वीं ते जें कळकळीनें सांगत होते, तेंच आज सांगत आहेत. सद्गुरु मिळणें फार दुर्घट असून त्याचा सहवास घडणें, हें तर फारच दुर्घट होय. परंतु ग्रंथांचें तसें नाहीं. अल्प किंमतींत ते आपणांस मिळतात; वाटेल त्यावेळीं सद्बोध करण्यास किंवा नवीन ज्ञान देण्यास ते सदा तत्पर असतात. ते कधीं कंटाळत नाहींत, कुरकुरत नाहींत, किंवा गुरुदक्षिणा मागत नाहींत, कधीं रुष्ट होत नाहींत, किंवा सद्बोध करण्यास नाकारीत नाहींत. सारांश, ग्रंथांचा गौरव करावा तेवढा थोडाच होणार आहे.

शिकंदर बादशहानें सर्व पृथ्वी पादक्रांत केली. अनेक देशांचे राजे दातीं तृण धरून त्यास शरण आले. त्याच्यासारखें अपार वैभव दुसऱ्या कोणाचेंही नव्हतें. तो एशिया खंडांत विजयध्वज फडकावीत असतां इराणचा बादशहा दारियस याची अति मौल्यवान् रत्नजडित पेटी त्यास मिळाली. तेव्हां त्याच्या मंत्रिमंडळापैकीं एकानें त्यास प्रश्न केला कीं, “ या पेटींत ठेवण्याजोगीं अशी योग्य वस्तु आपणाजवळ कोणती आहे ? ” त्यावर बादशहानें उत्तर दिलें, ‘ हींत ठेवण्यालायक मजजवळ एक वस्तु आहे, ती कोणती म्हणाल तर होमर कवीचे ग्रंथ ! ’ यावरून शिकंदर बादशहा होमर कवीच्या ग्रंथांस किती पूज्य मानीत असे, याची कल्पना आमचे सुज्ञ वाचक सहज करतील.

ग्रंथ हे सन्मित्र होत. या सन्मित्रांचा सहवास केला असतां महान् दुर्मिळ असे सुविचार आपणांस कळतात. त्यामुळें आपले विचार थोर व प्रगल्भ होतात इतकेंच नाहीं, तर आपल्या वर्तनक्रमावर त्यांचा परिणाम झाल्यावांचून रहात नाहीं. **आरिस्टाटल** यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, जे मुलांस जन्म देतात त्यांपेक्षां जे त्यांना शिक्षण देतात, त्या लोकांना अधिक मान दिला पाहिजे. 'स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः' असें कालिदासानें रघुवंशांत म्हटलें आहे. कारण आईबाप नुसतें जीवित्व देतात; परंतु शिक्षक त्यांना सन्मार्गानें वागण्यास शिकवितात. शिकंदर बादशहा ह्मणत असे कीं, '**फिलिपनें** मला जन्म दिला, त्याबद्दल मी त्याचा जितका ऋणी आहें, त्यापेक्षां ज्यानें मला ज्ञानामृत पाजिलें आहे, त्या **आरिस्टाटलाचा** मी अधिक ऋणी आहें.' कालिदास व शिकंदर यांनीं शिक्षकांविषयीं जें लिहिलें आहे, तें ग्रंथांस लाविल्यास अधिक शोभणार आहे. नाहीं काय ?

ग्रंथ हे कल्पतरु होत. कल्पतरु म्हणजे इच्छित कामना पूर्ण करणारा वृक्ष. या कल्पतरूंपाशीं धैर्य मागा, शांति मागा, संपत्ति मागा, युद्धसामर्थ्य मागा, ईश्वरप्राप्तीचा मार्ग मागा, लोकांचीं मनें वळविण्याचें सामर्थ्य मागा, सर्व कांहीं देण्यास ते समर्थ आहेत. त्यास मागील युद्धें, मागील लोकांच्या चालीरीति, त्यांच्या धर्मसमजुती वगैरे अनेक गोष्टी विचारा, ते सर्व सांगतील. तसेंच आकाशाच्या पोकळींत, पृथ्वीच्या पाठीवर, डोंगराच्या शिखरावर, समुद्राच्या तळाशीं काय आहे, हेंही ते सांगतील. शत्रूस पादक्रांत कसें करावें, दुष्टाची खोड कशी मोडावी, सत्संगति कशी जोडावी इत्यादि अनेक गोष्टी ते तुम्हांस समजावून देतील ! एखाद्या प्रेमळ व ज्ञानसंपन्न मित्राप्रमाणें ते तुह्मांला मनोरंजक व बोधपर गोष्टी सांग-

तील. यक्षाप्रमाणें तुह्मांला विविध लोकांत व विविध प्रदेशांत नेऊन तेथील गोष्टी दाखवितील व थक्क करून सोडतील. मात्र अनन्य भावानें तुम्हीं त्यांचा अभ्यास केला पाहिजे. ते जें सांगतात, तें लक्षपूर्वक ऐकिलें पाहिजे, ध्यानांत धरलें पाहिजे व त्यावर विचार केला पाहिजे. ह्मणजे झालें.

जगांतील सर्व वस्तूंचा नाश करण्याचा सपाटा काळानें एक सारखा चालविला आहे. परंतु उत्तम ग्रंथ या काळाच्या तडाख्यांतून वांचले आहेत इतकेंच नाहीं, तर जसजसा काळ जातो, तसतसा त्यांचा कीर्तिपरिमळ अधिकाधिक पसरत आहे. खाल्डियन लोकांचे विटांवर लिहिलेले ग्रंथ हल्लीं उपलब्ध आहेत. रामायण व महाभारत हे ग्रंथ सुमारें चार हजार वर्षांपूर्वीं लिहिले गेले असून ते अद्यापि जसेच्या तसेच आहेत. होमरकवीनें ‘ इलियड ’ नामक ग्रंथ लिहिल्यास अडीच हजार वर्षे होऊन गेलीं असून अद्यापि त्या ग्रंथाचें एक अक्षरही नष्ट झालेलें नाहीं. प्लूटार्क यानें सुमारें एकुणवीसशें वर्षांपूर्वीं जी चरित्रमाला लिहिली आहे, ती अद्यापि जशीच्यातशीच आहे. **साक्रेटीस** व **प्लेटो** या प्राचीन तत्ववेत्त्यांचीं भाषणें अद्यापि आपणांस जशींच्यातशींच वाचावयास मिळतात. या अवधींत कित्येक भव्य व सुंदर राजवाडे, दिव्य मंदिरें, सुरम्य उपवनें पार विलयास जाऊन त्यांचा मागमूसही राहिला नाहीं ! कित्येक पुरुष व राष्ट्रें उदयास आलीं व विनाश पावलीं ! परंतु वर सांगितलेले ग्रंथ अझून जसेच्या तसेच कायम आहेत. इतकेंच नाहीं, तर अनेक भाषांत त्यांचीं भाषांतरें होऊन त्यांचा अधिकाधिक प्रसार होत आहे. त्याचें सत्कार्य वाढत आहे. ह्यावरून सर्वच ग्रंथांस नाश नाहीं असें नाहीं. त्यांचा नाश त्यांच्यांतील विचारांवर अवलंबून असतो. विचार उत्तम असून त्यांत सत्याचा भाग जितका अधिक, तितका तो ग्रंथ अधिक काळपर्यंत टिकतो. कोत्या विचारांच्या ग्रंथांकडे कोणी पाहत नसल्यामुळें ते काळाच्या व वाळ-

वीच्या भक्ष्यस्थानीं पडून लवकरच नाहींसे होतात. पुढें त्यांच्याकडे कोणी ढुंकून सुद्धां पहात नाहींत.

मुद्रणकला निघण्यापूर्वीं ग्रंथ हातानें लिहून काढण्यास फार श्रम लागत असल्यामुळें ते दुर्मिळ असत. पाश्चात्य देशांत धर्मोपदेशकांच्या मठांत किंवा विद्यालयांत हस्तलिखित ग्रंथ असत. त्यांची संख्या शेंदीडशेंवर क्वचित्च असे. गेम्बुलर येथील ऑलबर्ट नामक एका महंतानें जिवापाड श्रम करून व सर्व आयुष्यभर खपून अवघे दीडशें ग्रंथ जमविले होते व तो त्याचा प्रचंड ग्रंथसंग्रह पाहून सर्व लोक आश्चर्यचकित होत असत. इ. स. १३०० पूर्वीं ऑक्सफोर्ड येथील मोठ्या ग्रंथसंग्रहालयांत जीं थोडीं लहानमोठीं पुस्तकें होतीं, तीं पेटींत बंद करून ठेविलीं असून पेटी साखळदंडानें बाधून टाकिली होती. पाश्चात्य देशांत धर्माधिकाऱ्यांच्या मठांत थोडाफार ग्रंथसंग्रह असे. मठांत राहणारे जोगी लोक ग्रंथ लिहून थोडाफार पैसा मिळवीत असत.

पूर्वीं ग्रंथ लिहून काढावे लागत असल्यामुळें त्यांना फार किंमत पडत असे. आपल्या देशांत शास्त्री, पुराणिक यांच्या घरीं ग्रंथांचा संग्रह असून ते बहुधा लोकांस ग्रंथ वाचावयास देत असत. ज्या शास्त्र्याकडे ग्रंथ अधिक, त्याला विशेष मान मिळत असे. तसेंच विद्याभिलाषी राजे महाराजे यांना ग्रंथसंग्रह करण्यांत भूषण वाटे. श्रीमान् लोकही थोडाफार ग्रंथसंग्रह करून गोरगरिबांना ते ग्रंथ वाचावयास देण्यांत विशेष पुण्य समजत असत. कित्येक पुरुष व क्वचित् स्त्रियाही ग्रंथलेखनाचा धंदा करून चरितार्थ चालवीत असत. त्याकाळीं कागद नसल्यामुळें भूर्जपत्र, ताडपत्र ह्या पानांवर ग्रंथ लिहिण्याचा प्रघात असे. ग्रंथांच्या शेवटीं बहुतकरून खालील श्लोक लिहीत असत.

तैलाद्रक्षेज्जलाद्रक्षेद्रक्षेत् शिथिलबंधनात् ।
मूर्खहस्ते न दातव्यमेवं पुस्तकरक्षणम् ॥

यावरून ग्रंथांची काळजी पूर्वीं किती घेतली जात असे, हें व्यक्त होतें. त्रावणकोर, तंजावर, काश्मीर, जयपूर वगैरे अनेक ठिकाणीं पूर्वीं मोठीं संस्कृत ग्रंथसंग्रहालयें होतीं. श्रीनगर येथील राघवदास नामक रामाच्या देवालयांत ४५०० हस्तलिखित ग्रंथांचा संग्रह केलेला आढळून येतो. यावरून आमच्या लोकांस पूर्वींपासून विद्येची अभिरुचि विशेष आहे, हें उघड दिसून येतें.

मुसलमान लोकांचें या देशांत आगमन होण्यापूर्वीं सुधारणेच्या बाबतींत आमचें पाऊल अव्याहत पुढें पडत चाललें होतें. परंतु मुसलमानांचा या देशांत प्रवेश झाल्यापासून आह्मी दुर्दैवाच्या महान् फेऱ्यांत सांपडलों! देशांतील शांतता नष्ट झाल्यामुळें लोकांचीं मनें व्यग्र झालीं. कलाकौशल्यासारख्या बाबतींत शोध करण्याचें टाकून देऊन जो तो आपआपल्या फिकीरींत चूर झाला. अनास्थेमुळें पुष्कळ ग्रंथांचा नाश झाला. ‘ बळी तो कान पिळी ’ ही स्थिति कित्येक शतकेंपर्यंत चालू राहिल्यामुळें आमचें ग्रंथ-भांडार अतएव ज्ञानभांडार नष्ट होऊन आमची अवनति झाली. पोर्तुगिज किंवा फ्रेंच लोकांनीं या बाबतींत मुळींच लक्ष्य घातलें नाहीं. इंग्लिश लोकांचा अंमल सुरू झाल्यापासून सर्वत्र शांतता झाली. ते स्वतः विद्याभिलाषी असल्यामुळें कर्नल **टॉड, ग्रँट डफ, लॉर्ड एल्फिन्स्टन, सर जॉन मालकम, मॉनियर विलियम्स,** प्रो० **मॅक्समुल्लर** इत्यादि आंग्ल ग्रंथकारांनीं हिंदुस्थानाविषयीं इतिहासविषयक व धर्मविषयक अनेक ग्रंथ लिहून आह्मांला अत्यंत ऋणी करून ठेविलें आहे.

लोकशिक्षणाचें काम सरकारनें हातीं घेतलें असून गांवोगांव शाळा स्थापिल्या आहेत. जिल्ह्यांतील मुख्य मुख्य शहरीं इंग्रजी

भाषेच्या अभ्यासाकरितां वरिष्ट प्रतीच्या शाळा स्थापिल्या असून प्रांतोप्रांतीं विद्यापीठें स्थापिलीं आहेत. ब्राह्मणापासून तों तहत् अतिशूद्रापर्यंत सर्व जातींच्या लोकांस सरस्वतीमंदिराचें द्वार खुलें झालें आहे ! शिक्षण मिळतांच एका संस्कृत कवीच्या उक्तीप्रमाणें आमचे डोळे एकदम उघडले.

* अथास्य तत्वेषु कृतेऽवभासे
समुन्मिमीलेव चिराय चक्षुः ।

मराठी भाषेची जी इतके दिवस फार हेळसांड चालली होती, ती नाहींशी होऊन मराठी भाषा ऊर्जितावस्थेस आणण्याकरितां अनेक विद्वान् लोक मोठ्या आस्थेनें झटूं लागले आहेत. मागील चाळीस पन्नास वर्षांत मराठी भाषेंत चांगले ग्रंथ तयार झाले असून दिवसेंदिवस अधिकाधिक होत आहेत. हें आमचें सुदैवच समजलें पाहिजे !

---

## भाग ४ था.

### वाचनाची अभिरुचि.

तुका ह्मणे सर्व सुख त्या संगतीं । घडेल पंगतीं संतांचिया ।
तुकाराम.

सत्समागाचा महिमा वर्णन करितांना साधुवर्य तुकाराम यानें सत्समागापासून जें सुख मिळतें ह्मणून लिहिलें आहे, तें सुख ग्रंथांच्या वाचनापासून मिळतें. खरा रसिक विद्वान् आपल्या पुस्तकालयांत बसून ग्रंथवाचनांत निमग्न झाला असतां, त्याला त्या वेळेस जें सुख होतें, त्यापुढें राज्यवैभवही तुच्छ आहे.

* टीप.—( अर्थ ) ज्याप्रमाणें तत्वांचा बोध होऊन त्याच्या हृदयांत ज्ञानप्रदीप उजळला असतां त्याचे फार दिवस मिटलेले डोळे जणूं काय एकदम उघडले. ( निबंधमाला )

सुप्रसिद्ध आंग्ल इतिहासकार **गिबन** यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, "मला जरी सर्व हिंदुस्थानची संपत्ति कोणीं देऊं केली, तरी मी आपली वाचनाभिरुचि दुसऱ्या कोणासही देणार नाहीं." तसेंच **सर जॉन हर्शेल** याला वाचनाची केवढी गोडी होती, हें त्याच्या एका वाक्यावरून स्पष्ट कळतें. तो ह्मणतो, "ज्या गोष्टीच्या छंदानें सर्व अवस्थांत माझी समाधानवृत्ति राहील, माझ्या सर्व आयुष्यक्रमांत जिच्यायोगानें मला सुख होईल आणि सर्व तापांपासून माझें संरक्षण होईल अशी एखादी गो मेश्वराजवळ मागण्याचा मला प्रसंग आला तर, मी '**वाच** हीच देणगी मागेन. मग मला सर्व गोष्टी प्रतिकूल झ एका सर्व आपलें जरी मजवर फिरलें, तरी मी त्याची पर्वा करणार नाहीं." मोठमोठे कवि, ग्रंथकार, तत्ववेत्ते, हे जबर वाचणारे होऊन गेले. पुष्कळ वाचून व ज्ञान संपादन करून बहुश्रुत झाल्याशिवाय जगांत नांवलौकिक मिळणें दिवसेंदिवस अशक्य झालें आहे.

बुद्धि ही तिजोरीप्रमाणें आहे. तिजोरी असून तींत ठेवण्याकरितां हिरे, माणकें, मोत्यें इत्यादि मौल्यवान् वस्तु पाहिजेत. नुसती तिजोरी असून काय उपयोग ? 'ज्ञानावीण जी जी कळा। ती ती जाणावी अवकळा' असें एका महाराष्ट्र कवीनें ह्मटलें आहे. ह्या बुद्धिरूपी तिजोरींत ज्ञानसंचय अवश्य पाहिजे आहे. बुद्धि ही पडित जमिनीप्रमाणें आहे. जमीन कितीही चांगली असली, तरी तींतील कांटेरी झाडें काढून टाकून तिची मशागत करून तींत चांगल्या झाडांची लागवड केली पाहिजे; ह्मणजे मग तेथें सुंदर उपवन बनतें. जशी जमिनीची, तशीच बुद्धीचीही मशागत केली पाहिजे. मनुष्याची किंमत ही त्याच्या ज्ञानावर असते. जेवढें ज्ञान

अधिक, तेवढी त्याची किंमत अधिक. ज्ञानाच्यायोगानें मनुष्यें देवपण पावलीं आहेत. आपली योग्यता वाढविणें हें प्रत्येक मनुष्याच्या हातीं असतें. स्वकष्टानें मनुष्याची जेवढी योग्यता वाढते, तेवढी दुसऱ्या कशानेंही वाढत नाहीं ! ‘ नर करणी करे सो नरका नारायण हो जाय. ’ ही ह्मण सुप्रसिद्धच आहे; व हिची सत्यता जगांत श्रेष्ठपणा पावलेल्या मनुष्यांचीं चरित्रें वाचलीं असतां सहज कळून येणार आहे.

ज्ञानसंपादन करण्याचें सुलभ व उत्तम साधन वाचन होय. [illegible] ल्याटिन कवीनें वाचनाचा महिमा फारच मोठ्या मार्मिकतेनें चाळ. अस वाक्यांत वर्णन केला आहे. तो ह्मणतो, ‘ वाचन मनुष्याचें वर्तन सुधारतें, त्याला रानटीपणांत राहूं देत नाहीं. ’ वाचनाच्यायोगानें मनुष्यांस अल्प काळांत जेवढें ज्ञान मिळवितां येतें, तेवढें कोणत्याही अन्य साधनाच्यायोगानें मिळवितां येत नाहीं. जें ज्ञान मिळविण्याकरितां पूर्वींच्या लोकांना वर्षानुवर्षें खपावें लागलें, तें आपणांस सहज मिळवितां येतें. तसेंच त्यांना जे ग्रंथ पाहण्याससुद्धां मिळत नसत, असे अमूल्य ग्रंथ सुदैवानें हल्लीं अगदीं सुलभ झाले आहेत. मात्र आपणांस वाचनाची अभिरुचि पाहिजे, ह्मणजे झालें. **सिसरोचीं** भाषणें मिळविण्याकरितां फ्रान्स देशाहून रोम शहरीं वकील पाठविण्यांत आला होता. आत्मज्ञानाविषयीं व पुनर्जन्माविषयीं पौरस्त्य देशांतील मतांचा शोध करण्याकरितां **लायकरगस** आणि **पिथ्यागोरस** यांना इजिप्त, इराण आणि हिंदुस्थान ह्या प्रदेशांत स्वतः फिरावें लागलें. ज्या ज्ञानाविषयीं **सोलन आणि प्लेटो** यांची कीर्ति सर्व देशभर दुमदुमत होती, तें ज्ञान संपादन करण्याकरितां त्यांना इजिप्तची सफर करावी लागली. ऐतिहासिक गोष्टींची

माहिती मिळविण्याकरितां प्रसिद्ध इतिहासकार **स्ट्रॅबो** आणि **हेरोडो-टस** यांना प्रवास करावे लागत असत इतकेंच नाहीं, तर प्रवासांत त्यांना त्या प्रदेशांची भूगोलविषयक माहिती मिळवून टिपून ठेवणें भाग पडे. या गोष्टी वाचल्या ह्मणजे हल्लीं ज्ञानार्जनाच्या ज्या अनेक सोयी झाल्या आहेत, त्यांची वाचकांना सहज अटकळ करितां येईल.

वाचनाच्यायोगानें ग्रंथांतील विचारांचा ठसा आपल्या मनावर उमटतो. त्यामुळें आपल्या विचारांत भर पडून ते बरे किंवा वाईट बनतात, व विचार बदलले ह्मणजे त्याप्रमाणें आपलीं मतें बदलतात. आणि मतांचें पर्यवसान शेवटीं आपल्या वर्तनांत होतें. सारांश, चांगलीं पुस्तकें वाचण्याचा क्रम ठेविला असतां आपलें वर्तन चांगलें होतें. सद्गुणाविषयीं भक्ति व दुर्गुणाविषयीं तिटकारा आपल्या मनांत उत्पन्न होतो. इहलोकींची यात्रा आपणांस सुखकर होऊन परलोकीं सद्गति मिळते.

वाचनाच्यायोगानें मनरंजन होऊन ज्ञानप्राप्ति होते. कोणाची संपत्ति जाऊन तो दरिद्री झाला असेल; कोणाची सुस्वरूप स्त्री अथवा जीवापेक्षांही पलिकडे असा एकुलता एक मुलगा निवर्तला असेल; कोणास व्यंगता आली असेल; कोणास सन्मित्रवियोग झाला असेल; अथवा असाच दुसरा कोणता तरी प्रसंग कोसळून कोणास फार दुःख झालें असेल किंवा आपलें जीवित कंटाळवाणें झालें असेल; अशा वेळीं सर्व दुःखांचा परिहार होण्यास वाचनासारखें उत्तम साधन नाहीं. चिनी धर्मशास्ता **कानफ्यूशीयस** हा स्वतःविषयीं लिहित असतां ह्मणतो कीं, "मी आस्थेनें ज्ञानसंपादन करीत असतांना अन्नपाणी विसरलों होतों. तेंच ज्ञानसंपादन केल्यावर जो मला आनंद झाला, त्यांत मी आपलें दुःख विसरून

गेलों. वृद्धापकाळ मजला गांठीत आहे, याचें मजला भानही राहिलें नाहीं " राज्यवैभव सोडून ज्ञानार्जनाकरितां गौतमबुद्ध एकांतांत राहून मनन करीत असतांना त्यास बोध झाला, तेव्हां त्यास अत्यंत आनंद झाला ! वाचनांत मन व्यापृत असल्यामुळें दुःखावेग कमी होतो, जग क्षणभंगुर असून या भवसागरांत मनुष्यावर अनेक बिकट प्रसंग नेहमीं येतात, असे विचार मनांत येऊन आपणांस दुःखाचा विसर पडतो. इतकेंच नाहीं, तर तें दुःख सहन करण्याइतकें धैर्य आपल्या अंगीं वाचनाच्यायोगानें येतें.

आळस हा मोठा दुर्गुण आहे आणि तो आमच्या लोकांच्या अगदीं हाडींमासीं खिळलेला आहे. 'आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महान् रिपुः ' मनुष्याच्या शरीराला आळस हा महान् रिपु आहे, असें भर्तृहरीनें एके ठिकाणीं ह्मटलें आहे. आळस गुन्हा समजून आळशी लोकांना ग्रीक लोक शिक्षा करीत असत. परंतु आळसानें आह्मांस अगदीं खाऊन टाकिलें आहे. पोटास मिळविलें पाहिजे ह्मणूनच आमचे लोक उद्योग करितात, असें ह्मणावें लागतें. नाहींतर त्यांनीं उद्योगच केला नसता. थोडें फार शिकून एखादी नौकरी मिळवावयाची किंवा घरीं चालत असलेला धंदा तसाच पुढें चालवावयाचा. एवढें केलें ह्मणजे आपली इतिकर्तव्यता आटोपली, असें समजून बाकी राहिलेला वेळ कित्येक नाचतमाशांत किंवा गप्पागोष्टींत, कित्येक झोंपा काढण्यांत व कित्येक आळसांत घालवितात ! पैशापेक्षांही अमोल असा वेळ ते दररोज किती तरी व्यर्थ दवडितात ! परंतु त्या वेळाचा कांहींतरी उपयोग करावा, असें कधींही त्यांच्या मनांत येत नाहीं. शाळेंत जीं काय दहापांच पुस्तकें वाचण्यांत आलीं असतील तेवढींच. शाळा सोडल्यावर पुस्तकां-

कडे ते ढुंकूनसुद्धां बघत नाहींत. पुस्तकें न उघडण्याविषयीं जणूं काय ते शपथच वाहतात. जगांत काय चाललें आहे, हें त्यांना कधींही कळत नाहीं. तसेंच आपल्या भाषेंत इतिहास, काव्य, निबंध, कादंबऱ्या इत्यादि ग्रंथांत चांगले ग्रंथ कोणते, त्यांचीं नांवेंसुद्धां त्यांना माहीत नसतात. नुसतीं नांवेंही जेथें माहीत असण्याची मारामार, तेथें त्या ग्रंथांचें वाचन कसलें ? आमचे सुतार, सोनार, लोहार, तेली, तांबोळी, साळी, माळी, शेतकरी इत्यादि अनेक लोकांकडे पाहिलें ह्मणजे आह्मी ह्मणतों याची सत्यता सहज दिसून येईल. त्या लोकांस नुसतें ट—फच जर येत नाहीं, तर पुस्तकें वाचण्याची गोष्ट दूरच राहिली ! एखाद्या सुंदर राजवाड्यांत किंवा सुरम्य उपवनांत आंधळ्यास नेलें असतां त्यास जसा आनंद व्हावयाचा नाहीं, तद्वत्च या आमच्या निरक्षर बंधूंची स्थिति होय ! पुस्तकांत सांठवून ठेविलेल्या ज्ञानामृताचा अंशतः लाभ झाल्यामुळें विद्वान् लोकांस जो आनंद होतो, तो या बिचाऱ्यांस काय बरें ठाऊक !

ज्यांना लिहिणें वाचणें येत नाहीं किंवा विद्येचा ज्यांना गंध नाहीं, अशा अशिक्षित किंवा अडाणी लोकांची ही स्थिति झाली. आतां सुशिक्षित ह्मणविणाऱ्या लोकांस वाचनाची कितपत आवड असते, हें पाहिलें पाहिजे. विश्वविद्यालयाच्या परीक्षा पास झाल्यावर अथवा एखादी नौकरी मिळवून पोटाचा व्यवसाय करूं लागल्यावर आमचे बहुतेक तरुण लोक पुस्तकांना फारकत देतात. वर्षानुवर्षें ते पुस्तकें उघडीतसुद्धां नाहींत. एकादुसरें शिळें वर्तमानपत्र वाचलें तर वाचलें, नाहीं तर त्याचीही त्यांना मुळींच अपेक्षा नसते. त्यांच्या घरांतील सांदीकोंपऱ्यांत कोठें पूर्वींचीं पांच चार जुनाट पुस्तकें पडून राहिलीं असलीं, तर तींही वाळवीच्या भक्ष्यस्थानीं पडतात. नवीन उपयुक्त पुस्तकें पैसे खर्चून

संग्रहीं ठेवण्याची बुद्धि तर दूरच; परंतु तीं पुस्तकालयांतून किंवा मित्रांकडून आणून वाचावीं, एवढीसुद्धां त्यांना अभिरुचि नसते ! कामधंदा केल्यावर बाकीचा वेळ ते गंजिफा, पत्ते, बुद्धिबळें किंवा ब्रिझिक खेळण्यांत, विड्या फुंकण्यांत किंवा गप्पा मारण्यांत घालवितात ! ! !

ज्यांना विद्येचा गंध नाहीं, अशा लोकांकडून काळाचा अपव्यय होत असल्यास त्यांत त्यांचा फारसा दोष नाहीं. परंतु जे आपणांस सुशिक्षित ह्मणवितात, वेळेची किंमत ज्यांना पूर्ण माहीत आहे, अशा लोकांनीं वेळेचा दुरुपयोग करणें हें खरोखर त्यांना अगदीं लाजिरवाणें होय ! ही शोचनीय स्थिति कधीं नाहींशी होईल ती होवो !

आपला व्यवसाय सांभाळून फुरसदीची वेळ जर आपण ज्ञानार्जनांत—अवलोकन, वाचन, संवाद, मनन इत्यादि गोष्टींत—घालविण्याचा क्रम ठेवला, तर त्यापासून आपणांस सहज पुष्कळ ज्ञानप्राप्ति होईल. विश्वविद्यालयांतून जरी आपणांस पदव्या मिळाल्या नसल्या तरी हरकत नाहीं. परंतु याप्रमाणें आपण जर अत्यंत काळजीपूर्वक परिश्रम करीत आहों, सरस्वतीची उपासना करीत आहों, तर आपणांस केवळ ज्ञानच नव्हे, तर लेखनकला व वक्तृत्वकला या अत्यंत उपयुक्त व स्पृहणीय कलाही साध्य होण्यासारख्या आहेत; आणि हाच ज्ञानार्जनाचा स्वतःचा खरा प्रयत्न होय. अशा प्रयत्नानेंच जॉर्ज वाशिंगटन, ऑब्रहाम लिंकन, अकब्बर बादशहा, शिवाजी ही मंडळी नांवालौकिकास चढली. या प्रकारचीं अनेक उदाहरणें देतां येतील; परंतु तीं देऊन येथें व्यर्थ अधिक जागा अडविण्यांत अर्थ नाहीं.

पाश्चात्य राष्ट्रांत जी जागृति दिसून येते व येवढी झपाट्यानें जी त्यांची प्रगति होत आहे, त्याचें कारण त्यांची वाचनप्रियता होय.

तिकडील लोहार, सुतार, काम करणारे मजूर इत्यादि गरीब लोकही आपला धंदा आटोपून वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें, ऐतिहासिक ग्रंथ, सुरस कादंबऱ्या व धर्मपर व्याख्यानें वाचण्यांत आपला कालक्षेप करितात. आपल्या अल्प मिळकतींतून चांगलीं पुस्तकें विकत घेऊन त्यांचा संग्रह करितात. त्यामुळें ग्रंथकर्त्यांना चांगलें उत्तेजन मिळून ते काळजीपूर्वक अत्यंत परिश्रम घेऊन उत्तम ग्रंथ तयार करितात. **सर जॉन लबॉक** यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, पुढील पिढींत वकील, वैद्य, प्रोफेसर यांच्यापेक्षां कारागीर, शिल्पकार व मजूर हे अधिक वाचणारे निघतील; आणि असें होणें अगदीं इष्ट आहे. वाचनापासून पाश्चात्य लोकांचें पुष्कळ कल्याण झालें आहे आणि त्या बाबतींत आह्मीं त्यांचें अनुकरण करणें, हें अगदीं श्रेयस्कर होणार आहे.

सुप्रसिद्ध निबंधकार **लॉर्ड बेकन** यानें ह्मटलें आहे कीं, "वाचनानें मनुष्य निष्णात होतो; भाषणानें हजरजबाबी होतो आणि लेखनाच्यायोगानें त्याच्या अंगीं टापटीप येते." मनुष्य निष्णात असण्यास तो बहुश्रुत असावा लागतो, आणि वाचनाच्या योगानें बहुश्रुतपणा अंगीं येतो. जगांत दोन प्रकारचे लोक असतात; एक वयोवृद्ध आणि दुसरे ज्ञानवृद्ध. वयोवृद्ध असतात त्यांना कालपरत्वें वृद्धत्व येतें. परंतु जे ज्ञानवृद्ध असतात त्यांचें वय जरी लहान असलें तरी बहुश्रुतपणामुळें त्यांचे विचार प्रगल्भ असतात व त्यांना जगाचा अनुभव विशेष असतो. आर्यधर्मशास्त्रा मनु यानें लिहिलें आहेः—

न तेन वृद्धो भवति येनास्य पलितं शिरः ।
यो वै युवाप्यधीयानस्तं देवाः स्थविरं विदुः ॥ †

---

† **अर्थ.**—नुसते केंस पांढरे झाल्यानें मनुष्यास वृद्धत्व येत नाहीं. जो ज्ञानी तो अल्पवयस्क असला, तरीहि त्याला देवादिक वृद्ध मानितात.

वाचन हें ज्ञान मिळविण्याचें सुलभ व उत्कृष्ट साधन आहे, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. **जॉन स्टुअर्ट मिल** यानें एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, 'मी अगोदर पंचवीस वर्षें जन्मून जितकें ज्ञान मला झालें असतें, तितकें बापाच्या शिक्षेमुळें सहज झालें.' आयुष्याचा अपव्यय होऊं नये, थोड्या काळांत आपणांस पुष्कळ ज्ञान प्राप्त व्हावें, याकरितां लहानपणापासून वाचनाची संवय लागली कीं, आपण निरनिराळे ग्रंथ पाहूं लागतों व नवीन ज्ञानसंपादन करण्याची आपणांस गोडी लागते.

वाचनापासून जे अनेक फायदे आहेत, त्यांतील मुख्य मुख्य येथें सांगणें अवश्य आहे. वाचनापासून मनोरंजन होऊन ज्ञानप्राप्ति होते. पूर्वींच्या लोकांचा अनुभव मिळून त्याचा आपणांस फायदा होतो. मन आळशी न राहतां उद्योगांत गुंतलेलें राहतें. विचारशक्ति जागृत होऊन ज्या गोष्टी पूर्वीं आपणांस कळत नसतात, त्या आपोआप कळूं लागतात. विचारशक्ति वृद्धिंगत होते. दुर्गुणी लोकांविषयीं तिरस्कार उत्पन्न होतो. सत्समागमाचा लाभ होऊन आपलें वर्तन सुधारतें. आपल्या अंगचे दुर्गुण नाहींसे होऊन अंगीं विनयता व नम्रत्व हीं येतात. असत्याचा तिरस्कार व सत्याविषयीं प्रीति उत्पन्न होते. विवेक उत्पन्न होऊन आपणास आपली खरी योग्यता समजते. भूतदया अंगीं येते. इहलोकीं सुख मिळून परलोकींही सद्गति मिळते, इत्यादि अनेक फायदे होतात आणि म्हणूनच विद्वान् लोकांनीं वाचनाचे एवढे पोवाडे गाइले आहेत !

# भाग ५ वा.

## वाचावें कसें ?

मागील भागांत पुस्तकांचें पुष्कळ वर्णन करण्यांत आलें आहे. पुस्तकें वाचावीं कशीं, ही गोष्ट चांगल्या रीतीनें समजावून घेऊन नंतर तीं वाचलीं असतां त्यापासून फायदा होतो. परंतु या गोष्टीकडे बहुधा कोणी फारसें लक्ष देत नाहींत. पुस्तक हातीं पडलें ह्मणजे तें कसें तरी वाचून एकदांचें संपवून टाकलें ह्मणजे झालें. नवीन पुस्तक पाहिलें ह्मणजे तें वाचण्यास प्रथम कित्येकांना फार उत्सुकता वाटते. परंतु ती उत्सुकता लवकरच नाहींशी होऊन पांचपंचवीस पानें वाचलीं ह्मणजे त्यांना अगदीं कंटाळवाणें होतें. अर्धेंच पुस्तक वाचून ते टाकून देतात, किंवा आपणावर हें एक मोठें ओझें येऊन पडलें आहे, असें समजून मोठ्या कष्टानें ते पुस्तक कसेंबसें तरी संपवितात. अशा रीतीनें पुस्तकें वाचण्यापेक्षां तीं न वाचलेलीं बरीं. त्यापासून वाचणारांस फायदा तर होत नाहींच, परंतु उलट वाचनाचे श्रम होऊन जीव मात्र अगदीं कंटाळवाणा होतो. पुस्तकें वाचतेवेळीं मुळींच कंटाळा न येतां मनास करमणूक कशी होईल, भाराभर पुस्तकें न वाचतां थोड्या पुस्तकांपासून अल्पकाळांत आपणास पुष्कळ ज्ञान कसें करून घेतां येईल, हें या भागांत समजून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

अन्न पचन होण्यास तें बेताचेंच खाल्लें पाहिजे; तें सावकाश खाऊन त्याचें चांगलें चर्वण झालें पाहिजे, ह्मणजे तें पचतें. परंतु तेंच अन्न जर जास्त खाल्लें, त्याचें चांगलें चर्वण झालें नाहीं, तर अपचन होईल इतकेंच नाहीं तर, त्यापासून प्रकृति

बिघडून आमांश होईल. त्याचप्रमाणें वाचनाचें आहे. आपलें मन जोंपर्यंत शांत असून वाचनापासून त्याला कंटाळा येत नाहीं, तोंपर्यंतच वाचन चांगलें. परंतु मन व्यग्र होऊन कंटाळवाणें झाल्यावर वाचलें असतां त्यापासून फायदा तर होत नाहींच, परंतु उलट मेंदूस पुष्कळ त्रास मात्र होतो. असाच क्रम कांहीं दिवस चालू असल्यावर मेंदू बिघडून त्याचा स्मरणशक्तीवर अनिष्ट परिणाम होतो ! ‘ खादाडाला चव नाहीं ’ अशी एक म्हण आपणांत आहे; त्याचप्रमाणें अति वाचणाराला शब्दसौष्ठव, विचार-सौंदर्य, शब्दमाधुर्य हीं फारच थोडीं कळतात. भाराभर अति वाचणें चांगलें नसून तें मननपूर्वक बेताचेंच असणें बरें.

हल्लीं शेंकडों पुस्तकें दरवर्षीं छापून प्रसिद्ध होतात. मोठमोठ्या पुस्तकालयांत वाचण्याकरितां हजारों पुस्तकें ठेविलेलीं असतात. शाळा, पाठशाळा, शहरोशहरीं स्थापन होऊन विद्येचा प्रसार मोठ्या झपाट्यानें होत आहे. खरी विद्येची अभिरुचि ज्याला असेल, त्याला पूर्वींपेक्षां हल्लीं कितीतरी अधिक सोयी झाल्या आहेत. अशी स्थिति असून **थ्युसिडायडीस**सारखे इतिहासकार, **होमर, व्हार्जिल यांसारखे** कवि, **आरिस्टाटल व प्लेटो** यांसारखे तत्ववेत्ते हल्लीं कां निपजूं नयेत ? या पूर्वींच्या लोकांना फारशा सोयी नव्हत्या. फार तर काय, त्यांना ग्रंथसुद्धां फारसे अवलोकन करण्यास मिळत नसत ! आणि असें असून ते एवढे विद्वान् कसे ? याचें कारण हेंच कीं, ते मोठ्या आस्थेनें शिकत असत. ग्रंथांचा अभ्यास ते फारच मन लावून करीत असून कोणत्या ग्रंथांत काय लिहिलें आहे हें त्यांस अगदीं मुखोद्गत करणें भाग पडे. हल्लींप्रमाणें त्यांची विद्या केवळ पुस्तकी नव्हती. ते जें कांहीं थोडें शिकत, त्यावर ते पुष्कळ विचार करीत असत. त्यामुळें त्यांच्या बुद्धीचें पोषण होऊन ती विशाल होत

स्थळ नं. नं.

असे. ते स्वयंप्रकाशित असून परप्रकाशाचा त्यांच्या अंगीं फारच थोडा अंश असे. लोहाराचा हात, डाकवाल्याचा दम, कारकुनाची मांडी, हीं जशीं संवयींच्या योगानें वज्र होतात, तसेंच बुद्धीचेंही आहे. विचाराच्या योगानें ती बळकट होऊन तिला सोज्वलता प्राप्त होते.

नुसतीं भाराभर पुस्तकें वाचण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जे भाराभर पुस्तकें वाचतात, त्यांचे विचार अगदीं उथळ असून त्यांची बुद्धि क्वचित्च खोल असते. 'पुढें पाठ आणि मागें सपाट' अशी त्यांची स्थिति होते. एका प्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकारापाशीं फारच थोडा पुस्तकसंग्रह असल्याबद्दल कोणी त्यास हांसलें; तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं, 'जेव्हां पुस्तकाची मला जरूर लागते, तेव्हां मी तें तयार करितों. सर्व हिंदुस्थानांत ज्याच्या विद्वत्तेची ख्याति आहे, अशा एका विद्वान् गृहस्थाच्या घरीं एक लेखक गेला असतां, तेथें त्यांस सरासरी वीस पंचवीसच पुस्तकें दिसलीं! यावरून हें उघड आहे कीं, पुस्तकें थोडीं वाचलीं असतां पुरेशीं होणार आहेत. परंतु तीं सावकाश आणि विचारपूर्वक वाचलीं पाहिजेत आणि जेणेंकरून त्यांतील पुष्कळ भाग आपल्या ध्यानांत राहील अशी काळजी घेतली पाहिजे.

पुस्तक वाचण्यास हातीं घेण्यापूर्वीं तें कोणत्या विषयासंबंधीं आहे, त्याचा कर्ता कोण आहे, हें पहावें, तसेंच नांवास अनुसरून पुस्तकांत विषय प्रतिपादन केलेले आहेत कीं नाहीं, हेंही पहावें. कधीं कधीं नांव भलतेंच आणि आंतील विषय भलताच, असेंही आढळून येतें.* नंतर प्रस्तावना वाचून पहावी.

---

* पूर्ण ग्रंथ पाहिल्यावीण। उगाच ठेवी जो दूषण॥
तो दुरात्मा दुरभिमानी। मत्सर करी॥ रामदास.

प्रस्तावनेंत ग्रंथकर्ता आपल्या पुस्तकाविषयीं तें लिहिण्यास काय कारण झालें, तें कशाच्या आधारानें लिहिलें इत्यादि अनेक गोष्टींविषयीं उल्लेख करीत असतो. ज्याप्रमाणें एका गृहस्थाची दुसऱ्या गृहस्थाशीं ओळख करून देतेवेळीं आपण त्या गृहस्थाविषयीं प्रथम थोडक्यांत माहिती सांगतों, त्याचप्रमाणें आपलें पुस्तक जनसमूहापुढें मांडतांना ग्रंथकर्ता प्रस्तावनेंत पुस्तकाविषयीं व विषयासंबंधानें बरीच माहिती सांगतो. एवढें पहाणें झाल्यावर त्या पुस्तकाविषयीं कोठें काय टीका झाली होती, ती वाचली असल्यास ध्यानांत आणावी किंवा पहावी. नंतर मधून मधून कांहीं पानें वाचून पहावीं, म्हणजे आपणांस ग्रंथकाराची भाषासरणी, विचारसौंदर्य व वर्णनशैली, हीं कशीं काय आहेत, तें कळून येईल. जर ग्रंथकाराची भाषा नीरस असून विचारसौंदर्य, वर्णनशैली बाताबेताचीच असेल, दुसऱ्यांचे विचार मदतीस घेऊनच पुस्तक तयार करण्यांत आलें असेल, तर तें पुस्तक वाचण्यांत वेळ न घालविणें बरें! ज्या पुस्तकाची भाषा चांग[illegible] असून ज्यांत ग्रंथकर्त्याचे स्वतःचे विचार व स्वतःचा अनुभव नमूद केला असतो, अशीं पुस्तकें वाचण्यालायक असतात. नांवाजलेल्या ग्रंथकारांचीं पुस्तकें बहुधा वाचनीय असतात. कोणताही पदार्थ खाण्यापूर्वीं प्रथम आपण तो चाखून पाहतों, चांगला लागल्यास खातों आणि वाईट लागल्यास निरुपयोगी म्हणून टाकून देतों. तेंच तत्व पुस्तकांची निवड करितांना उत्तम रीतीनें लागू पडतें. चांगलीं पुस्तकें वाचण्यांत वेळ गेल्यास त्या वेळेचा सदुपयोग होऊन त्यापासून आपणास फायदा होतो. परंतु वाईट पुस्तकें वाचण्यांत जो वेळ जातो, तो आपण व्यर्थ दवडितों इतकेंच नाहीं, तर त्या वाचनापासून आपल्या मनावर अनिष्ट परिणाम होऊन आपलें वर्तनही बिघडण्याचा संभव असतो.

वाचतेवेळीं आपलें मन क्षुब्ध किंवा क्रोधयुक्त नसावें; तसेंच विवंचना, भीति इत्यादि कसल्याही विकारांनीं मन दूषित नसतां तें शांत असून त्यास श्रम करण्याचा हुरूप असावा. अशी मनाची स्थिति असल्यावर वाचनास सुरवात करावी. सावकाश रीतीनें एक-एक वाक्य वाचावें. वाक्य संपल्यावर तें आपणास समजलें किंवा नाहीं, हें पहावें. तें खरें, विषयास अनुसरून असून महत्वाचें व ध्यानांत धरण्यासारखें असलें तर तेव्हांच चटकर लक्ष लावून ध्यानांत धरावें; अशा रीतीनें एक कलम वाचल्यानंतर पुस्तक मिटून जें वाचलें असेल तें ध्यानांत आणावें. प्रत्येक कलमांतील सारांश ध्यानांत आणिल्याशिवाय पुढें वाचूं नये. अशा रीतीनें भाग वाचून झाल्यावर त्या भागांत ग्रंथकर्त्यानें काय सांगितलें आहे, काय सांगण्याचा प्रयत्न होता व तो त्यास कितपत साधला, यांविषयीं नीट विचार करावा. आपणास पूर्वीं किती माहिती होती, नवीन किती मिळाली, हें लक्षांत आणावें. वाचतेवेळीं पेन्सिल व टिपणवही अवश्य जवळ असावी व पेन्सिलीनें महत्वाच्या वाक्याच्या बाजूस ( समासावर ) रेघ मारून ठेवावी. तसेंच प्रत्येक कलमांत जें काय सांगितलें असेल तें बाजूस दोन चार शब्दांत टिपून ठेवावें. वाचकानें आपल्याकरितां नवीन खुणा शोधून काढाव्या किंवा खालीं दिलेल्या खुणा समजून घेऊन वाचतेवेळीं तशा खुणा पुस्तकावर करीत जाव्यात; ह्मणजे वाचलेल्या मजकुराची छानणी किंवा विल्हेवाट उत्तम रीतीनें सहज करितां येईल आणि पुस्तकांतील चांगला भाग सहज आपल्या लक्षांत राहील.

॥ मुख्य विधान केलें असेल तेथें असें चिन्ह करावें. मुख्य विधान करून तें सिद्ध करण्याकरितां पुढें पुष्कळ प्रमाणें दिलेलीं असतात. मुख्य विधानें

फार महत्वाचीं असल्यामुळें तीं ध्यानांत ठेवणें अवश्य असतें.

: : जेथें एकादा उत्तम विचार नमूद केला असून त्या विचारापासून अनेक विचार निघण्याचा संभव

: : असेल अथवा ते विचार वाचून आपणास दुसरे कांहीं विचार सुचले असतील, तेथें अशी खूण

: : करावी. अशावेळीं ते विचार आपल्या वहींत टिपून ठेवून आपणास जे विचार सुचले असतील तेही लागलेच टिपून ठेविले पाहिजेत. नवीन विचार ज्या वेळचे त्या वेळीं टिपून न ठेविले तर त्यांची आपणास विस्मृति पडते व ते पुनः ध्यानांत येण्याचा फारच थोडा संभव असतो. जेथें

× खोटीं विधानें आढळून येतील तेथें अशी

× खूण करावी.

? ज्या ठिकाणीं आपणास संशय आला असेल तेथ प्रश्नचिन्ह घालावें.

V—— एखादा पारिग्राफ विशेष महत्त्वाचा व ध्यानांत धरण्यास योग्य असा आढळून आल्यास आरंभीं असें चिन्ह करावें; म्हणजे तो शोधून काढून पुनः वाचण्यास ठीक पडतें. जेथें **सुरस शब्द किंवा वाक्यें** आढळून येतील त्या शब्दांखालीं किंवा वाक्यांखालीं आडवी रेघ ओढून ठेवावी. हा क्रम ठेविल्यास ग्रंथाचें उत्तम रीतीनें वाचन होऊन शिवाय आपणास भाषापारिज्ञानही उत्तम होईल.

याशिवायही आणखी कांहीं खुणा कोणास करणें असतील तर कराव्यात. परंतु पहिल्यानें खुणा बरोबर ठरवून नंतर त्या करीत जाव्यात. नाहीं तर आपण कशाकरितां खूण केली तें पुढें आपणासच समजणार नाहीं ! वर लिहिलेल्या खुणा करण्याचा लेखकाचा क्रम असून तो त्याला फार समाधानकारक वाटतो. त्या योगानें पुस्तकाचा बहुतेक महत्वाचा भाग कोणत्याना कोणत्या तरी खुणांनीं व्याप्त असतो. अशा रीतीनें पुस्तक वाचून झाल्यावर त्यांतील खुणा केलेल्या ओळी पुनः लक्ष लावून वाचाव्यात. वेळींच जेवढें आपल्या ध्यानांत राहील तेवढें चांगलें. नंतर आपल्या वहींत पुस्तकाचें नांव, ग्रंथकर्त्याचें नांव व तें कधीं आणलें असेल ती तारीख, इतकें प्रथम टिपून ठेवून नंतर पुस्तकांतील जेवढा मजकूर लिहून ठेवण्यास योग्य असेल तेवढा मजकूर टिपून ठेवावा. कोणत्या पृष्ठावर तो असेल तें पृष्ठ त्या मजकुराच्या बाजूस लिहून ठेवावें व ती स्मरणवही फावल्या वेळीं पाहत जावी ह्मणजे पुस्तकांतील बराच भाग आपल्या अगदीं सहज लक्षांत राहील. नवीन व उत्तम विचारांचा समागम होऊन आपलें मन सुसंस्कृत होईल.

सर्वच पुस्तकें लक्ष लावून वाचण्यासारखीं असतात, असें नाहीं. कित्येक साधारण रीतीनें वाचून टाकलीं असतां भागतें. कित्येक मधून मधून वाचून पाहण्यासारखीं असतात. पुस्तक म्हटलें कीं, तें ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत वाचून टाकिलेंच पाहिजे असें नाहीं. यासंबंधानें लिहित असतां **लॉर्ड बेकन** यानें ह्मटलें आहे, “कित्येक पुस्तकें फक्त चव घेऊन सोडून देण्याच्या लायकीचीं असतात; कित्येक गिळून ठेवण्यासारखीं असतात व कित्येक ( अशांची संख्या थोडी असते ) चावून चावून खाण्यासारखीं व जिरविण्यासारखीं असतात. ह्मणजे कित्येक पुस्तकें अशीं असतात कीं, तीं अंशतः वाचावीं, कित्येक

समग्र साधारण लक्षपूर्वक वाचावीं, व कित्येक ( अशीं थोडीं ) लक्षपूर्वक समग्र वाचावीं." याशिवाय कित्येक पुस्तकें अशीं चांगलीं असतात कीं, तीं वारंवार वाचलीं असतांही अधिक बोधप्रद व आनंददायक होतात.

वर सांगितल्याप्रमाणें वाचनाचा क्रम ठेविल्यास जरी तुह्मीं थोडीं पुस्तकें वाचलीं, तरी त्यांपासून तुम्हांस फार फायदा होणार आहे. तुह्मीं जें वाचलें असेल तें बहुतेक तुमच्या ध्यानांत राहील आणि त्यावर तुह्मीं पुष्कळ विचार केला असल्याकारणानें तें ज्ञान अगदीं तुमचें होईल. लिहिण्याचा किंवा बोलण्याचा प्रसंग आल्यास तुह्मांस त्या पुस्तकांतून बरोबर उतारे देतां येतील. पुनः कदाचित् तें पुस्तक पाहण्याचें कारण पडल्यास तें कोठें आहे, व त्यांत कोणत्या पानावर काय काय लिहिलें आहे, तेंही तुह्मांस टिपणवहीवरून तेव्हांच कळून येईल.

वाचतेवेळीं दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, वाचनापासून लोकांचे जे विचार आपणास कळतात, ते नीटपणें समजाऊन घेऊन त्यांची योग्य व्यवस्था लाविली पाहिजे; आपले पूर्वींचे विचार व नवीन विचार यांची परस्परांशीं विचारपूर्वक सांगड घालून त्यांचा एकजीव करून टाकला पाहिजे. असें केल्यानेंच पूर्वींच्या विचारांत नवीन विचार अगदीं एकजीव होतात. बाजारांतून अनेक प्रकारच्या जिनसा खरेदी करून आणल्यावर आपण घरीं त्या पृथक् पृथक् व व्यवस्थेशीर ठेवितों, यामुळें आपणास पाहिजे त्या वेळीं पाहिजे ती वस्तु सहज मिळते. जर आपण जिनसा व्यवस्थेशीर न ठेविल्या, तर काय बरें स्थिति होईल ? वेळेवर आपणास एकही वस्तु मिळणार नाहीं, हें उघड आहे. त्याचप्रमाणें विचारांचें आहे. ते नीटपणें समजून

घेऊन ध्यानांत ठेविले तर ते वेळेवर आठवत असतात; नाहीं तर, एकच गोंधळ होऊन कांहींच समजेनासें होतें. मग वाचलें काय आणि न वाचलें काय सारखेंच होतें.

अशा रीतीनें लक्षपूर्वक वाचणें सोडून देऊन कित्येक लोक भाराभर पुस्तकें वाचीत सुटतात. प्रत्येक दिवसास ते चारचारशें पानें वाचतात. टिपणवही अथवा सिसपेन्सिल त्यांना कधींही लागत नाहीं. ग्रंथकार जें लिहितो, त्यांत सत्य किती, ध्यानांत धरण्यास योग्य असा भाग कोणता व टाकाऊ कोणता, याकडे ते मुळींच लक्ष देत नाहींत. पुस्तकापासून मनरंजन होऊन कसा तरी कालक्षेप व्हावा, येवढीच त्यांची इच्छा असते. त्यांच्या नजरे-खालून जरी हजारों उत्तम विचार गेलेले असतात, तरी ऐन बाणीच्या प्रसंगीं त्यांना त्यांपैकीं एकही विचार आठवत नाहीं. यामुळें लिहिण्यांत किंवा बोलण्यांत त्यांच्या अंगीं विद्वत्तेचें तेज मुळींच दिसून येत नाहीं. येवढें भाराभर वाचून ते आपल्या डोळ्यांना आणि मेंदूस मात्र व्यर्थ शिणवितात, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें !

वाईट पुस्तकें हातींसुद्धां धरूं नका. सर्वच पुस्तकें चांगलीं असतात, असें नाहीं. छापण्याची कला निघाल्यापासून हजारों पुस्तकें छापून निघतात. त्यांत टाकाऊ व घाणेरडीं अशीं किती तरी पुस्तकें असतात. अशीं पुस्तकें वाचून आपल्या मनास डाग लावून घेण्यापेक्षां तीं हातीं न धरलेलीं बरीं ! वाचकांस कांहींतरी सद्बोध व्हावा, त्यांची नीतिमत्ता, परोपकारबुद्धि, धैर्य, साहस इत्यादि सद्गुण वृद्धिंगत व्हावे, अशा हेतूनें तीं मुळींच लिहिलेलीं नसतात. मनोरंजनाकरितांच केवळ तीं असतात. खून, मारामाऱ्या, दरोडे, व्यभिचार, लुच्चेगिऱ्या इत्यादि अनेक निंद्य कृत्यांचें चटकदार वर्णन

करून तीं वाचकांचीं मनें खराब गोष्टींकडे लावितात. असलीं घाणेरडीं पुस्तकें वाचण्याची गोडी लागली म्हणजे, मग उदात्त व प्रासादिक काव्येंसुद्धां त्यांपुढें तुच्छ वाटतात! त्यामुळें ज्ञानार्जनाची इच्छा व तशीच विचार करण्याची संवय नाहींशी होऊन क्षणिक मनरंजन होण्यांतच मोठी गोडी वाटते. अशा रीतीनें घाणेरडीं पुस्तकें वाचण्याकडे वाचकांची प्रवृत्ति होऊन त्या पुस्तकांचा फार जारीनें खप होतो. ज्या पुस्तकांत अशीं चटकदार व स्वकपोलकल्पित वर्णनें नसतात, तीं पुस्तकें फारशीं कोणी हातीं धरीत नाहींत; त्यामुळें चांगल्या पुस्तकांचा खप होत नाहीं; आणि तीं छापण्यासही कोणी फारसे धजत नाहींत! याकरितां वाईट पुस्तकें वाचण्याची प्रवृत्ति लोकांत जेवढी ह्मणून कमी होईल तेवढी बरी.

## भाग ६ वा.

### प्रसिद्ध ग्रंथकार आणि त्यांचें वाचन.

ज्ञानार्जनाच्या कामीं वाचनासारखें दुसरें सुलभ व उत्तम साधन नाहीं, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. वाचन हें खऱ्या विद्वत्तेचें एक मुख्य अंग होय. जन्मतः मनुष्य विद्वान् नसून विद्वत्ता ही त्यास स्वकष्टानें मिळवावी लागते. अशी विद्वत्ता ज्यांनीं संपादन करून आपणांस धन्य ह्मणवून घेतलें, जनसमूहास सन्मार्गास लाविलें, ग्रंथ लिहून पुढील लोकांस ऋणी करून ठेविलें, अशा थोर पुरुषांच्या चरित्र-मालिकेचें अवलोकन केल्यास असें आढळून येईल कीं, दिवसांतून त्यांचे तीन चार तास तरी निदान पुस्तकें वाचण्यांत जात असत. पाठशाळेंतील शिक्षण-

क्रम चालू असतांनाच ते सुरस व उत्तम ग्रंथ वाचीत व शिक्षण-क्रम आटोपल्यावर निदान चारपांच वर्षेंपर्यंत तरी वाचनांत काळ घालवीत असत. कोणत्या विषयावर प्राधान्यत्वेंकरून लिहावयाचें तें ठरवून नंतर त्या विषयावरील उत्तमोत्तम ग्रंथ वाचून व त्याची सांगोपांग माहिती मिळवून प्रथम ते आपली भूमिका उत्तम बनवीत असत, आणि नंतर ग्रंथ लिहिण्यास लागत असत. पुढें लेखन-व्यवसायांतही त्यांचें वाचन चालू असेच. कित्येकांस तर वाचनाची एवढी गोडी लागली होती कीं, जिवंत जीव असे तोंपर्यंत त्यांनीं आपला वाचनाचा हव्यास कधींही सोडिला नाहीं. ऐहिक लाभाची इच्छा धरून ते ग्रंथ वाचीत नसत, तर आपणास ज्ञान मिळावें किंवा, सत्य कळावें आणि आपल्या हातून उत्तम लोकसेवा व्हावी, हीच त्यांची मोठी इच्छा असे.

सुप्रसिद्ध वक्ता **एडमंड बर्क** हा दररोज अजमासें तीन तास वाचनांत घालवीत असे. त्यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, “ पुष्कळ वाचन चांगलें. परंतु त्या वाचनाचें मनांत चांगलें रूपांतर करून योग्य प्रसंगीं त्याचा उपयोग करणें हें अधिक चांगलें. ” **ड्रायडनचे** गद्य ग्रंथ त्याला फार आवडत असत.

**गिबन** नामक प्रसिद्ध इतिहासकाराच्या चरित्रावरून समजतें कीं, तो सोळा वर्षांच्या वयाचा होण्यापूर्वींच त्यानें आरबी, इराणी तार्तर, तुर्क वगैरे लोकांविषयीं इंग्रजी भाषेंतील सर्व पुस्तकें वाचून टाकिलीं होतीं. इतिहासाची त्याला फार गोडी असे. युनिव्हर्सल हिस्टरी ( जगाचा इतिहास ) **झेनोफन, हेरोडोटस,** यांच्या ग्रंथांच्या वाचनापासून त्याच्या मनास आनंद होऊन त्याचें सर्व लक्ष इतिहासाकडे लागलें व पुढें तो मोठा इतिहासकार झाला. वाङ्मयात्मक ग्रंथही तो मोठ्या आवडीनें वाचीत असे. आपल्या

वयाच्या पंचविसाव्या वर्षीं त्यानें ग्रीक भाषा शिकण्यास सुरवात केली. यावरून त्यास विद्येची केवढी अभिरुचि होती, हें चांगलें व्यक्त होतें. लहानपणीं व पाठशाळेंत असतांना **गिबन** याच्या धार्मिक शिक्षणाची फार हेळसांड झाल्यामुळें त्याच्या मनावर जो अनिष्ट परिणाम झाला, तो सर्व आयुष्यभर टिकला. आपल्या वाचनाविषयीं **गिबन** यानें एके ठिकाणीं लिहिलें आहे; " पुस्तक हातांत घेऊन त्याचें नांव, विषय, अनुक्रमणिका पाहून टाकिली ह्मणजे कांहीं वेळ मी पुस्तक एकीकडे ठेवीत असें आणि त्या विषयावर आपल्यास किती माहिती आहे, हें पहात असें. हें स्वपरीक्षण आटोपलें ह्मणजे मग तें पुस्तक वाचावयास आरंभ करावयाचा. एकीकडे फिरावयाला जाऊन त्या पुस्तकांतील किंवा त्यांतील एखाद्या भागांतील विषयासंबंधानें मला किती माहिती आहे किंवा माझी काय समजूत आहे, मला काय वाटत आहे, हें एकदां पाहिलें ह्मणजे मग त्या पुस्तकानें माझ्या ज्ञानांत किती भर घातली आहे, हें ओळखण्याची मला पात्रता येत असे. पुस्तककर्त्याचा व माझा अभिप्राय जुळल्यावर मला फार संतोष होत असे. विरोध पडला तरी त्याच्यामुळें माझ्या मनास बळकटी येत असे. "

**पोप**—बारा वर्षांचा असतांना पोप यानें वरींच वाचनास सुरुवात केली. काव्य वाचण्याचा त्याला विशेष नाद असे. **वॉलर, स्पेन्सर, ड्रायडन** यांचीं काव्यें वाचून त्याला फार आनंद होई. त्यानें तत्वज्ञान व आत्मज्ञान या विषयांवरील ग्रंथ वाचले होते. इतकेंच नाहीं तर, यांशिवायही अनेक प्रकारचे ग्रंथ त्याच्या अवलोकनांतून गेले होते. त्याला वाचनाचा इतका नाद होता कीं, त्यापासून त्याची शरीरप्रकृति बिघडेल कीं काय, अशी त्याच्या आप्त मंडळीस भीति पडली होती.

**मिल्टन**—या ऑंग्ल कवीनें पाठशाळेंत सात वर्षें अभ्यास केल्यावर तो **हार्टन** नामक गांवीं जाऊन राहिला. तेथें त्यानें पांच वर्षें वाचनांत घालविलीं. तो काळजीपूर्वक पुस्तकांची निवड करी व उपयुक्त अशींच पुस्तकें वाची. त्यास जी माहिती लागे किंवा ज्या उद्देशानें तो पुस्तक हातीं घेई, ती माहिती मिळेपर्यंत किंवा तो उद्देश साध्य होईपर्यंत तो सहसा पुस्तक खालीं ठेवीत नसे. त्याची एक टिपणवही सांपडली आहे. तींत ग्रीक, लॅटिन, फ्रेंच, इटालियन, इंग्लिश इत्यादि ८० ग्रंथकारांच्या ग्रंथांतील टिपणें आढळून येतात, तसेंच त्यानें वाचलेलें **आराटस, लायकोफ्रन, युरिपिडीस** आणि **पिंडार** हे ग्रंथ हल्लीं उपलब्ध असून त्या ग्रंथांवर त्यानें ठिकठिकाणीं केलेलीं जीं विपुल टिपणें आहेत, त्यांवरून तो किती लक्षपूर्वक वाचणारा होता, याची पूर्ण साक्ष पटत आहे.

**सर वॉल्टर स्कॉट**—ह्या सुप्रसिद्ध कादंबरीकाराची कादंबरी लिहिण्याकडे जी प्रथम प्रवृत्ति झाली, तिला कारणीभूत सरव्हांटिस नामक एका स्प्यानिश कादंबरीकाराचे ग्रंथ झाले. सरव्हांटिसच्या कादंबऱ्या तो मोठ्या आवडीनें वाची व त्यांची फार प्रशंसा करी. घरींदारीं किंवा कोठेंही तो असला तरी त्याचें अवलोकन फार लक्षपूर्वक असे. त्याला फिरण्याचा व सृष्टिशोभा पाहण्याचा विशेष नाद असे, इटालिअन आणि स्प्यानिश या भाषा त्यास चांगल्या अवगत होत्या. कादंबऱ्या, योद्ध्यांचे पराक्रम, मध्ययुगांतील दंतकथा आणि देशांतील प्रचलित गाणीं (पोवाडे) इत्यादि वाचण्याकडे त्याचें विशेष लक्ष असे. त्याची कल्पनाशक्ति विलक्षण होती आणि तीमुळें त्याला एकांतवास मुळींच दुःखद होत नसे.

**लॉर्ड मेकॉले.**—हा प्रसिद्ध निबंधकार व इतिहासकार फार जबर वाचणारा असून कादंबऱ्या वाचण्याचा त्याला विशेष नाद असे. त्याची वाचनाची रीत अशी असे कीं, प्रत्येक पान वाचून झाल्यावर तो पुस्तक मिटी आणि काय वाचलें तें सर्व पुनः ध्यानांत आणी. प्रथम प्रथम त्याच्या ध्यानांत कांहींच राहत नसे, परंतु पुढें त्याची स्मरणशक्ति इतकी वाढली कीं, पुस्तक मिटतांच सर्व मजकूर त्याच्या एकदम ध्यानांत येई, इतकेंच नाहीं तर, वाचलेल्या पुस्तकांतील निवडक वाक्यें तो शब्दशः ह्मणून दाखवी. त्याच्या ग्रंथांत शब्दसौष्ठव, अर्थगांभीर्य व हृदयंगम वर्णनशैली हीं जीं पदोपदीं आढळून येतात, त्या सर्वांस कारण त्याचें विशेष व मनःपूर्वक वाचन होय. **थ्यॅकरे** यानें त्याच्याविषयीं लिहिलें आहे कीं, "एक वाक्य लिहिण्यास तो वीस पुस्तकें वाचतो आणि सृष्टिवर्णनाची एक ओळ लिहिण्यास तो शंभर मैल प्रवास करतो." ज्या विषयावर लिहावयाचें त्या विषयावरील सर्व ग्रंथ वाचून स्वतः मनाची खात्री झाल्याशिवाय तो आपला ग्रंथ सहसा प्रसिद्ध करीत नसे.

**सर विलियम हॅमिल्टन.**—नामक इंग्लिश तत्त्ववेत्ता होऊन गेला. त्याचें ह्मणणें असे कीं, वाचतांना महत्वाच्या भागांवर खुणा करून ठेवाव्या. एकाद्या महत्वाच्या ग्रंथाचा अभ्यास करतांना महत्त्वाच्या शब्दांखालीं किंवा वाक्यांखालीं पेन्सिलीच्या रेवा मारण्याचें काम जर चांगलें शहाणपणानें केलें तर त्या ग्रंथाचा थोडक्यांत गोषवारा काढल्यासारखें होतें. निरनिराळ्या रंगांच्या पेन्सिलींनीं याहीपेक्षां चांगलें काम होतें. ऐतिहासिक, दृष्टांतात्मक किंवा इतर तऱ्हेचा मजकूर यांतील भेद दाखविण्यास निरनिराळ्या रंगांच्या पेन्सिली चांगल्या. त्याच्यायोगानें गोषवारा मिळतो व शिवाय त्या ग्रंथाची मीमांसाही उत्तम होते.

**जॉन मोर्ले.**—या ग्रंथकारानें एका निराळ्या वाचनपद्धतीची प्रशंसा केली आहे. तो ह्मणतो कीं, उत्तम पुस्तकाचा अभ्यास एकाच वेळीं होत नाहीं. तीं पुस्तकें वारंवार वाचावीं. वारंवार वाचण्यांत वेळेचा दुरुपयोग होत नाहीं. एक वेळां जीं पुस्तकें वाचण्यासारखीं असतात, तींच शंभर वेळां वाचलीं असतां वेळेचा दुरुपयोग होत नाहीं.

**ग्रे** नामक आँग्लकवि वाचनाचा मोठा भक्त होता. तो नेहमीं मेजावर पडून वाचीत असलेला दिसे. **लेहंट** याचे ग्रंथ वाचणें त्याला आवडत असे. शाळेंत असतांनाच त्याला विशेष वाचनाभिरुचि लागलेली होती. एकदां तुरुंगांत असतांनाही त्यानें वाचण्याकरितां काव्यग्रंथ विकत घेतले. तो जरी गरीब स्थितींत होता, तरी पुस्तकें विकत घेण्याकडे तो बराच पैसा खर्च करीत असे. **बायरन कवि** हा खातेवेळीं, अंथरुणांतसुद्धां वाची. त्याचें वाचन पुष्कळ असून तें सर्व तऱ्हेचें असल्यामुळें त्याला विविध माहिती असे.

**चार्लस डिकन्स**—या कादंबरीकारावर लहानपणापासून सरस्वतीचा वरदहस्त होता. त्याची कल्पनाशक्ति विलक्षण होती. प्रवास वर्णनें, कादंबऱ्या व गोष्टी वाचण्याची त्याला विशेष आवड असे. ज्याप्रमाणें शरीराला अन्नवस्त्राची अत्यंत आवश्यकता असते, त्याप्रमाणें तरुण मंडळीच्या कल्पनाशक्तीचा यथायोग्य परिपोष झाला पाहिजे, असें त्याचें मत आहे.

**ह्यूम, स्विफ्ट** इत्यादि ग्रंथकारांसही वाचनाची विशेष अभिरुचि असे. आपल्या इकडील **कालिदास, भवभूति, दण्डी, बाण**, या संस्कृत कवींच्या—तसेंच **मुकुंदराज, श्रीधर, वामन, मोरोपंत, तुकाराम, एकनाथ,** ह्या महाराष्ट्रकवींच्या—श्रवण,

मनन आणि अवलोकनांतून पूर्वींचे बरेच ग्रंथ गेले होते. ज्ञानार्जनाच्या व ज्ञानप्रसाराच्या कामीं त्यांनीं आपलें सर्व आयुष्य वेंचिलें! पैसा जोडावयास ज्याप्रमाणें सतत उद्योग लागतो, त्याप्रमाणें ज्ञानार्जनाच्या कामींही सतत परिश्रम करावे लागतात. '**थेंबें थेंबें तळें साचे**' या ह्मणीप्रमाणें ज्ञान हें अल्प अल्प अंशानें प्राप्त होऊन सतत परिश्रमानें त्याचा समुद्र बनतो.

लोकांत मान्यता किंवा प्रसिद्धी होण्यास कित्येक ग्रंथकारांस पुष्कळ वर्षें लागलीं. बहुतेक ग्रंथकार मध्यवयांत किंवा उत्तरवयांत प्रसिद्धीस आले. **टेनिसन** आपल्या वयाच्या पन्नासाव्या वर्षीं उत्तम कवि ह्मणून ठाऊक झाला. **ब्राउनिंग** हा साठ वर्षांचा होईपर्यंत तो उत्तम कवि आहे, हें लोकांस मुळींच माहीत नव्हतें. **गोल्डस्मिथ** यानें 'डेझर्टेड व्हिलेज' (ओसाडगांव) हें सुरस काव्य आपल्या वयाच्या ४६ व्या वर्षीं प्रसिद्ध केलें, तेव्हांपासून त्याची ख्याति झाली. **मिल्टन** कवीनें 'प्याराडाईस लॉस्ट' (स्वर्गपतन) व 'प्याराडाईस रिगेंड' (पुनः स्वर्गारोहण) हीं उत्तम काव्यें आपल्या ह्मातारपणीं लिहिलीं. यावरून आमच्या वाचकांनीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, नुसती बुद्धि असून तिचा फारसा उपयोग होत नसतो, तर त्या बुद्धीस वाचनरूपी जीवन घालून ती वृद्धिंगत केली पाहिजे, व सतत परिश्रम करून आपल्या अंगीं विशेष विद्वत्ता आहे, असें जगाच्या प्रचीतीस आणून दिलें पाहिजे.

# भाग ७ वा.

## स्मरणशक्ति व ती वाढवावी कशी.

स्मरणशक्तीचा वाचनाशीं अति निकट संबंध आहे. पुस्तकें वाचून मिळविलेलें ज्ञान ध्यानांत राहण्यास स्मरण-शक्ति चांगली असली पाहिजे. ध्यानांतच जर कांहीं रहात नसेल, तर वाचनाचे व्यर्थ श्रम कशाला ? अवलोकन, संभाषण, वाचन, मनन इत्यादि साधनांच्या योगानें महत्प्रयासानें ज्ञान मिळवावयाचें, तें विसरून जाण्याकरितां नव्हे; तर त्या ज्ञानाचा आपणास नेहमीं उपयोग व्हावा अशी प्रत्येक मनुष्याची मनापासून इच्छा असते. दहावीसदां ग्रंथ वाचून जी गोष्ट एकाच्या ध्यानांत रहात नाहीं, तीच एकदां वाचण्यानें दुसऱ्याच्या ध्यानांत राहते. एकादा वाटसरू मार्गांत तृषेनें विव्हळ झाला असतांना त्यास उत्कृष्ट विहीर लागावी, परंतु त्याच्या जवळचें भांडें इतकें फुटलेलें असावें कीं, त्यांतून थेंबभरसुद्धां पाणी त्याच्या हातीं पडूं नये; अशी स्थिति झाली असतां तो वाटसरू किती निराश होईल बरें ! तेंच त्याचें भांडें धड असतें, तर तेथें त्यानें आपली तहान भागविली असती आणि प्रवासांत पिण्याकरितां आपणाबरोबर आणखी पाणी घेतलें असतें. तद्वत् स्मरणशक्ति हें एक भांडें असून या भांड्यांत मनुष्यास आलेलें सर्व ज्ञान, सर्व अनुभव, सांठवून ठेवितां येतो. ज्ञानाचा किंवा अनुभवाचा पाया बहुतेक स्मरणशक्तीवर अवलंबून आहे. याकरितां स्मरणशक्ति ह्मणजे काय व ती वाढवावी कशी, याविषयीं प्रत्येकानें अवश्य माहिती करून घेतली पाहिजे.

आपण जी गोष्ट एकदां पाहिली असेल किंवा ऐकिली असेल, ती आपणास पुढें पाहिजे त्या वेळीं ज्या शक्तीच्या योगानें पुनः ध्यानांत आणितां येते, त्या शक्तीस स्मरणशक्ति असें ह्मणतात. पशुपक्षी इत्यादि प्राण्यांस स्मरणशक्ति अत्यल्प आहे. ती मनुष्याच्याच ठिकाणीं परमेश्वरानें अधिक ठेविली आहे. सृष्टिक्रमांत मनुष्यप्राणी ईश्वराच्या खालोखाल असून तो जगांतील सर्व वस्तूंवर व प्राणिमात्रांवर आपला पूर्ण अंमल गाजवीत आहे; याचें कारण हें कीं, जगन्नियंत्यानें त्यास बुद्धि व स्मरणशक्ति या दोन अमोल देणग्या दिल्या आहेत. जेवढी बुद्धीची उपयुक्तता आहे, तेवढीच स्मरणशक्तीचीही आहे. बुद्धीच्या योगानें मनुष्यास ज्ञान प्राप्त होतें, आणि स्मरणशक्तीच्यायोगानें तें त्यास सुरक्षित सांठवून ठेवितां येतें. स्मरणशक्तीस कोठाराची उपमा देण्यांत येते, ती वास्तविक पाहतां बरोबर नाहीं. कोठारास कसला तरी आकार असून अमुक एक मण किंवा खंडी इतकाच माल त्यांत राहील, जास्त राहणार नाहीं. तसें स्मरणशक्तीचें नाहीं. विचार हे जड पदार्थ नसल्यामुळें ते सांठविण्याचें कोठार जी स्मरणशक्ति तीस आकार नाहीं आणि जडत्वही नाहीं. मेंदूसारख्या लहानशा जागेंत जरी तिचा समावेश आहे, तरी तिची व्यापकता इतकी आहे कीं, मनुष्यानें आजन्म किती जरी ज्ञानाच्या राशीच्याराशी मिळविल्या तरी त्या सगळ्यांचा तींत समावेश होऊन आणखी जागा नेहमीं रिकामी असावयाचीच. ज्ञान सांठविण्यास स्मरणशक्तींत जागा शिल्लक नाहीं, अशी गोष्ट कधीं घडून आली असेल, असें मुळींच संभवत नाहीं.

स्मरणशक्ति सर्वांस सारखी असते असें नाहीं. कोणाच्या ठिकाणीं ती जास्त असते व कोणाच्या ठिकाणीं ती कमी असते.

तरी पण मनुष्यानें प्रयत्न केल्यास त्यास आपली स्मरणशक्ति बरीच वाढवितां येते. अष्टावधानी, शतावधानी या लोकांची स्मरणशक्ति जरी जन्मतः अधिक असली, तरी स्वप्रयत्नानें ते ती पुढें वाढवितात आणि त्यामुळें साधारण लोकांस ते आपल्या अलौकिक स्मरणशक्तीच्या योगानें अगदीं थक्क करून सोडितात. स्मरणशक्ति वाढविणें हें काम फार कठीण व महत् प्रयासाचें आहे. तें एकदोन दिवसांत किंवा महिन्या दोन महिन्यांत साध्य होण्यासारखें नसून त्याकरितां वर्षानुवर्षे खपलें पाहिजे. आपणास ज्या संवयीं लागल्या असतील, त्या समूळ नाहींशा करून त्या जागीं नवीन संवयी लाविल्या पाहिजेत. जुन्या संवयींना फाटा देऊन नवीन लावणें हें काम किती कठीण आहे, हें आमच्या वाचकांच्या पूर्ण अनुभवास आलेंच असेल. याविषयीं येथें जास्त लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

स्मरणशक्ति हें विचाराचें कोठार आहे ह्मणून पूर्वी सांगितलेंच आहे. कोठारांत तऱ्हतऱ्हेच्या लहान मोठ्या अनेक वस्तु ठेवणें असल्यास त्यांचें वर्गीकरण करून त्या शिस्तवार ठेविल्या पाहिजेत व त्या वारंवार पाहिल्या पाहिजेत. ह्मणजे कोणती वस्तु कोठें आहे, हें वेळेवर सहज चटकन् सांगतां येईल. त्याचप्रमाणें विचारांचें आहे. जें जें आपण ऐकतों किंवा पाहतों, तें प्रथम लक्षपूर्वक मनन करून ध्यानांत ठेविलें पाहिजे. कोणतीही गोष्ट लक्षपूर्वक व शांतपणें समजून घेणें ह्मणजे अर्धेअधिक काम झाल्यासारखें आहे. पुष्कळ लोकांची चूक होते ती या ठिकाणींच. ते कोणतीही गोष्ट बरोबर पाहात नाहींत, ऐकत नाहींत अथवा तीविषयीं फारसा विचारही करीत नाहींत. यामुळें ती त्यांना बरोबर समजत नाहीं किंवा ती त्यांच्या ध्यानांतही बरोबर राहत नाहीं. जें

जें तुह्मी पहाल किंवा ऐकाल, त्याविषयीं प्रथम नीट लक्षपूर्वक विचार करा. आपले पूर्वींचे विचार व नवीन विचार यांची वेळींच योग्य सांगड घाला. असें केल्यानें बऱ्याच गोष्टी तुमच्या सहज ध्यानांत राहतील. जीं कामें तुह्मांस करावयाचीं असतील, तीं चांगल्या रीतीनें व लक्षपूर्वक करण्याची संवय अवश्य लाविली पाहिजे. तरच तीं तुमच्या ध्यानांत राहतील. लक्ष न देतां कोणतेंही काम अर्धवट करण्यापेक्षां तें न करणें बरें.

प्रथमतः मनुष्याचा स्वभाव स्थिर व शांत असला पाहिजे. जे लोक धांदल्या व गडबड्या स्वभावाचे असतात, लक्षपूर्वक पहाण्याची, ऐकण्याची किंवा वाचण्याची ज्यांना मुळींच संवय नसते, अशा लोकांच्या ध्यानांत कोणतीही गोष्ट क्वचित्च बरोबर राहते. याचें कारण असें कीं, लक्षपूर्वक अवलोकन करण्याची जेव्हां संधि असते, तेव्हां त्यांनीं दुर्लक्ष्य केल्यामुळें त्यांच्या मनावर ठसा बरोबर उमटत नाहीं आणि त्यामुळें त्यांच्या ध्यानांत ती गोष्ट राहत नाहीं. कदाचित् जरी राहिली, तरी वेळेवर ती त्यांना बरोबर आठवत नाहीं. गडबड्या स्वभावाच्या मनुष्यांच्या ठिकाणीं तर्कशक्ति, समर्पकपणा आणि धोरण हीं फारच थोडीं असतात. त्यांची विचारशक्ति कोती असते. त्यांनीं जरी पुष्कळ प्रवास केला किंवा पुष्कळ ग्रंथ वाचले, तरी त्यांच्या ज्ञानभांडारांत फारशी भर पडत नाहीं.

कांहीं लोक शून्यवृत्तीचे असतात. सृष्टींतील अनेक वस्तु ते पाहतात; तसेंच संवाद, वाचन, मनन इत्यादिकांच्यायोगानें त्यांना पुष्कळ नवीन गोष्टी कळतात. परंतु त्या त्यांचे ध्यानांत राहात नाहींत. याचें कारण असें कीं, जो विषय ते हातीं घेतात, त्याकडे त्यांचें मुळींच लक्ष नसतां तें त्यावेळीं एखाद्या भलत्याच विषयाकडे असतें. त्यामुळें ते दोन्हीही विषयांस अंतरतात. जो विषय

त्यांनीं हातीं घेतलेला असतो, तो त्यांना समजत नाहीं आणि ज्या विषयाची त्यांना तंद्री लागलेली असते, तोही त्यांना पुरता कळत नाहीं. सारांश, ‘ इदंच नास्ति परंच न लभ्यते ’ अशी त्यांची स्थिति होते. शून्यवृत्ति ही एक मानसिक महाव्याधि आहे. ती जडली असतां मनुष्य डोळे असून आंधळा होतो, कान असून बहिरा होतो, त्याची विचारशक्ति, स्मरणशक्ति वगैरे सर्व शक्ति नाहींशा होतात ! सारांश, शून्यवृत्ति हें एक प्रकारचें वेडच आहे, असें ह्मटलें असतां फारसें गैरवाजवी होणार नाहीं. याकरितां ही व्याधि जडूं न देण्याविषयीं प्रत्येकानें फार खबरदारी घेतली पाहिजे. एकदां जडली कीं, ती हळूहळू वाढत जाते आणि पुढें मनुष्य अगदीं कुचकामाचा होतो !

कोणतीही गोष्ट ध्यानांत राहण्यास तिजकडे चांगलें लक्ष दिलें पाहिजे. लक्ष न दिलें तर ती ध्यानांत बरोबर राहत नाहीं. एखाद्या भिंतीवर असंख्य चित्रें काढलेलीं असून तीं आपण पाहूं लागलों, तर त्यांच्यापैकीं ज्या चित्रांकडे आपलें लक्ष विशेष वेधलें जाईल, तींच आपल्या ध्यानांत राहतील. इतर आपल्या ध्यानांत राहणार नाहींत. इतकेंच नाहीं तर, तीं आपण पाहिलीं कीं नाहीं याची आपणास आठवणसुद्धां राहणार नाहीं. लक्ष नसलें ह्मणजे आपल्याशीं कोण बोलत आहे, आपण कोणीकडे पाहत आहों, आपल्या सभोंवतीं काय चाललें आहे, हें मनुष्यास कांहींच कळत नाहीं. कोणतीही गोष्ट लक्षपूर्वक पाहण्याचा निश्चय केला असतां प्रथम अंमळसे श्रम पडतात; परंतु पुढें तशीच संवय होते. एकाग्र मनानें कोणत्याही विषयाचें परिशीलन झालें असतां, तो थोडक्या काळांत चांगला समजतो व ध्यानांत सहज राहतो. आंधळ्यास स्मरणशक्ति विशेष असते, याचें कारण हें कीं, त्याच्या मनाची एकाग्रता विशेष असते. **ब्रूटस**विषयीं असें

सांगतात कीं, ज्या लढाईवर सर्व ज्ञात पृथ्वीचें स्वामित्व अवलंबून होतें, अशा फारसेलिया येथील लढाईच्या आदल्या रात्रीं तो आपल्या तंबूंत पुस्तक वाचीत व लेखणीनें त्यावर खुणा करीत स्वस्थ बसला होता ! यावरून त्याच्या मनाची एकाग्रता केवढी होती, याचा वाचकांनींच विचार करावा ! सारांश, एकाग्र मनानें जें कांहीं तुह्मी कराल, तें तुमच्या चांगलें ध्यानांत राहील.

विचारानें विचार वाढतात. ज्या गोष्टींत प्रथम आपली मति चालत नाहीं, त्याच गोष्टींविषयीं आपण विचार करूं लागलों कीं, त्या आपणास सहज कळतात. त्यांचा कार्यकारणभाव समजतो. विचारशक्तीस घर्षण होत गेल्यानें ती तीव्र होते व मग लहानसहान गोष्टीसुद्धां बिनचूक आपल्या ध्यानांत राहतात. मन हें लोखंडासारखें असून विचारांच्या योगानें तें चकचकित किंवा तरतरित राहतें. विचार कमी पडले कीं, तें तेव्हांच गंजून जातें. दुसऱ्यांच्या विचारावर किंवा सल्लामसलतीवर अवलंबून राहणें, हें दुर्बलतेचें चिन्ह होय. प्रत्येक मनुष्यानें स्वतः विचार करून बरेंवाईट हुडकून काढून आपलें मत ठाम ठरविलें पाहिजे. आपले पूर्वज श्रुतिस्मृतीसारखे मोठमोठाले ग्रंथ पाठ करीत असत. होमर कवीचे समग्र ग्रंथ पाठ ह्मणून दाखविणारे लोक ग्रीस देशांत होते. संवयीच्या योगानें पाठ करण्याची शक्ति वाढते. जे श्लोक पाठ करण्यास प्रथम तासाचे तास लागतात, तेच, पुढें पुढें सहज पाठ होतात. लहान वयांत थोडें पाठांतर करणें बरें. परंतु पाठ करण्याचा बोजा मनावर फार पडतां कामा नये. त्यामुळें मेंदूवर अति श्रम पडून तो बिघडतो. एकाच वेळीं एका दमांत पाठ करून मेंदूस श्रमविण्या- पेक्षां पुनः पुनः लक्षपूर्वक एकाग्र चित्तानें वाचून पाठ करणें

अधिक चांगलें.* या तत्वास अनुसरून पूर्वीची पाठांतर करण्याची पद्धति प्राथमिक शाळांतून बंद करण्यांत आली असून तिच्या जागीं बालोद्यानशिक्षणपद्धतीचा दिवसेंदिवस अधिक प्रसार होत आहे. बालोद्यानशिक्षणपद्धतीपासून विचारशक्ति वाढत जाऊन स्मरणशक्तीसही चांगली मदत होते.

ऐकलेल्या किंवा वाचलेल्या विषयांवर वादविवाद केला असतां किंवा ते लिहून काढले असतां अधिक ध्यानांत राहतात. **थ्युसीडायडीस** याची भाषासरणी आपणास यावी ह्मणून **डिमॉस्थेनिस** यानें त्याचा इतिहास आठ वेळां लिहून काढला होता. **ऑडिसनच्या** स्पेक्टेटर नामक ग्रंथाचा एक भाग **बेंजामिन फ्रांक्लीन** याच्या हातीं पडला, तेव्हां त्या पुस्तकांतील भाषासरणी व विषयमांडणी पाहून आपणांसही तसें लिहितां यावें, असें **बेंजामिन** यास वाटलें. त्याकरितां तो त्या पुस्तकांतील एक एक कलम लक्षपूर्वक वाची व पुस्तक मिटून ठेवून तशाच रीतीनें व त्याच शब्दांनीं तो लिहून काढण्याचा प्रयत्न करी. प्रथम प्रथम त्यास चांगलें लिहितां येईना; परंतु पुढें स्पेक्टेटरसारखे लेख तो भराभर लिहून काढूं लागला. इंग्लंडांतील सुप्रसिद्ध मुत्सद्दी **सर राबर्ट पील** हा त्याच्या काळचा मोठा जबरदस्त वादविवाद करणारा असून त्याची स्मरणशक्ति कशी वाढली, ती गोष्ट येथें अवश्य सांगितली पाहिजे. तो प्रार्थनामंदिरांतून घरीं आला ह्मणजे 'तूं आज काय ऐकिलेंस,' असें त्याचा बाप त्यास नित्य विचारी.

---

* **टीप**—जें कांहीं पाठ करावयाचें असेल त्याचा अर्थ समजून घेऊन नंतर पाठ करावें.

अर्थाविण पाठांतर कासया करावें ।
व्यर्थचि मरावें घोकोनियां । तुकाराम.

प्रारंभीं त्यास ठळक ठळक गोष्टीसुद्धां ध्यानांत ठेवून सांगतां येत नसत. परंतु पुढें देवळांतील भाषणें मोठ्या काळजीनें ध्यानांत ठेवून बापानें विचारल्यावर तो तीं त्यास सांगूं लागला. अशा रीतीनें त्यास लक्षपूर्वक ऐकण्याची संवय लागून त्याची स्मरणशक्ति इतकी वाढली कीं, मंदिरांत ऐकिलेलीं व्याख्यानें तो जणूं काय पाठ ह्मणून दाखवूं लागला ! सारांश, वाचलेल्या किंवा ऐकिलेल्या गोष्टी लिहून काढल्या असतां किंवा त्याविषयीं वादविवाद केला असतां, त्या बऱ्याच ध्यानांत राहतात, असा अनुभव आहे.

स्मरणशक्ति ही मनुष्याच्या स्वराप्रमाणें आहे. स्वभावतःच जसा कित्येक मनुष्यांचा स्वर मधुर असतो व पुढें अभ्यास केल्यानें 'अधिकस्य अधिकं फलम्' या उक्तीप्रमाणें तो उत्तम होतो, तद्वत् कित्येकांची स्मरणशक्ति लहानपणापासूनच अधिक असते; अशा लोकांनीं प्रयत्न केल्यास ते एकपाठी निघतील किंवा शतावधानी होतील यांत नवल तें काय ? विक्रम राजाच्या पदरीं एकपाठी कवि असून त्यांच्यासमोर कोणीं कविता ह्मणून दाखविली कीं, ते ती कविता जुनीच आहे असें ह्मणत व प्रत्यंतराकरितां बिनचूक पाठ ह्मणून दाखवीत. **सिनेकानें** एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, अथेन्स शहरांत पूर्वीं एक सेनापति असे. त्याची स्मरणशक्ति फार विलक्षण असे. त्याच्या हाताखालीं असलेल्या अडीच तीन हजार शिपायांचीं नांवें त्याच्या अगदीं मुखोद्गत असत. अशी विलक्षण स्मरणशक्ति फारच थोड्या लोकांस असते. परंतु स्मरणशक्ति कशी वाढवावी याविषयीं थोडक्यांत जें वर सांगितलें आहे; तें वाचकांनीं ध्यानांत बाळगून त्याप्रमाणें वाचण्याचा प्रयत्न केला असतां, त्यांना विशेष फायदा होईल व अल्प प्रयासानें बऱ्याच गोष्टी त्यांच्या चांगल्या ध्यानांत राहात जातील.

# भाग ८ वा.

## वाङ्मय.

वाङ्मय हा शब्द जरी लहान आहे, तथापि या शब्दाची व्यापकता अति मोठी आहे. वाङ्मय ही संज्ञा काव्य, कादंबऱ्या, नाटकें, सुरस व मार्मिक निबंध, इतिहास, चरित्रें, टीकात्मक लेख, इत्यादि विषयांसच साधारणतः लावण्यांत येत असतें. कित्येक लोक वाङ्मयांत शास्त्रांचाही समावेश करितात. परंतु शास्त्रें अनेक असून त्यांचा विस्तारही प्रचंड असल्यामुळें शास्त्र आणि वाङ्मय हीं निरनिराळीं समजणें बरें. प्रत्येक राष्ट्राच्या वाङ्मयावरून त्या लोकांची प्रगति, अवनति, त्यांच्या रीतिभाती, त्यांचे आचारविचार वगैरे अनेक गोष्टी आपणास सहज कळून येतात. आरशांत पडलेलें प्रतिबिंब पाहून तें ज्या पदार्थाचें असेल त्या पदार्थाविषयीं दृश्य तेवढ्या गोष्टी आपणास सांगतां येतात, तद्वत् वाङ्मय हा एक आरसा असून ह्या आरशांत ती भाषा बोलणाऱ्या लोकांचें अंतरंग व बहिरंग हीं स्पष्ट दिसून येतात. दोनहजार वर्षांपूर्वी सुधारणेच्या शिखरीं पोहोंचलेलीं ग्रीक व रोमन राष्ट्रें नामशेष झाल्यास आज किती तरी शतकें झालीं असूनही त्यांचें जें वाङ्मय हल्लीं उपलब्ध आहे, त्यावरून ते लोक कसे होते, त्यांचे आचारविचार कसे होते, याची आपणांस सहज कल्पना करितां येते.

फार लांब कशाला ? आर्य लोक हे जगांत अत्यंत प्राचीन लोक असून प्राचीन कालापासून त्यांच्या आचारविचारांत जो फरक होत गेला आहे, वेळोवेळीं त्यांनीं जें ज्ञान संपादन केलें आहे, तें सर्व आज कायम आहे; याचें कारण त्यांचें वाङ्मय होय.

राष्ट्राच्या उन्नतीस वाङ्मय हें जितकें कारणीभूत असतें, तितकी इतर कोणतीही दुसरी गोष्ट असूं शकत नाहीं. आज विसावें शतक लागलें असून आपल्या देशांतील भिल्ल, कोळी, वारली, गोंड इत्यादि लोक अद्यापि अज्ञानांधकारांत कां रहावे ? सुधारणेचा त्यांना गंधही कां नसावा ? याचें कारण हेंच कीं, वाङ्मयाशीं त्यांचा मुळींच परिचय नाहीं. जोंपर्यंत ते लिहिणें वाचणें शिकणार नाहींत, तोंपर्यंत त्यांची स्थिति हल्लीं आहे अशीच राहील ! इतकेंच नाहीं तर, ती उत्तरोत्तर वाईट होत जाईल ! वाङ्मय हें नदाप्रमाणें आहे. नदाचा उगम एखाद्या झऱ्यापासून असून पुढें त्यास अनेक ओढे व नद्या मिळाल्यामुळें तो प्रचंड होतो. तद्वत् वाङ्मयांतील ग्रंथसंख्या हळूहळू वाढत जाऊन पुढें प्रचंड ग्रंथभांडार होतें. वाङ्मयाची जी येवढी थोरवी वर्णिलेली आहे, याचें कारण हें कीं, त्यापासून मनुष्यांतील आडदांडपणा कमी होऊन त्यांच्यांतील प्रेमाचा झरा वाढतो आणि समाजांत त्यांची उपयुक्तता अधिकाधिक वाढत जाते. लिहिणें वाचणें आलें आणि स्वतंत्रपणें कार्यकारण, खरें खोटें, बरें वाईट, यांचा विचार करतां येऊं लागला, म्हणजे वाङ्मयरूपी सरस्वतीमंदिराची किल्ली आपल्या हातीं आली असें समजावें. मग या मंदिरांत प्रवेश करून तेथें सांठविलेल्या ज्ञानामृताचें सेवन करण्यास आपणांस मुळींच अडचण पडणार नाहीं. तेथील ज्ञानभांडार अमित असून त्यां मानानें मनुष्यजीवित जरी अल्प आहे, तरी मनुष्यानें निराश न होतां वामनपंडितांची खालीं लिहिलेली उक्ति ध्यानांत ठेवावी.

आकाश अंत न कळोनिहि अंतरिक्षीं ।
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ॥

१२५

आणि साध्य होईल तेवढें ज्ञान मिळविण्याची मुळींच हयगय करूं नये.

**शास्त्रीय** ग्रंथांविषयीं येथें फारसें लिहिण्याचें कारण नाहीं. कारण त्यांत विवक्षित शास्त्रांविषयींच विचार केलेला असतो. त्या ग्रंथांतील विचार कठीण असल्यामुळें त्यांची भाषा व विषयप्रतिपादनपद्धति हीं जितकीं सुलभ असतील तितकीं चांगलीं. त्यामुळें ते ग्रंथ समजण्यास फारशी अडचण पडत नाहीं. अगोदरच ते विषय दुर्बोध, आणि तशांत भाषासरणी व प्रतिपादनपद्धति दुर्बोध असली कीं, मग ते ग्रंथ अधिकच कठिण होतात. अलिकडे अनेक उपयुक्त धंदे, कलाकौशल्यें या विषयांवर ग्रंथ तयार होऊं लागल्यामुळें या प्रकारची ग्रंथसंख्या पुष्कळच वाढत चालली आहे.

वाङ्मयाचे मुख्य भाग ह्मटले ह्मणजे काव्यें, कादंबऱ्या, नाटकें चरित्रें, निबंध, टीकात्मक व तुलनात्मक ग्रंथ इत्यादि होत. साधारणतः वाङ्मयाचे तीन विभाग करितां येतील;—( १ ) कल्पनात्मकग्रंथ, ( २ ) वर्णनात्मकग्रंथ व ( ३ ) टीकात्मक ग्रंथ. कल्पनात्मक ग्रंथांचे मुख्य दोन भाग—काव्य आणि कादंबरी. काव्याचे दोन प्रकार असतात—श्राव्य आणि दृश्य. दृश्य साधनांची मदत घेऊन स्वभाव, कृति व काव्य यांच्या द्वारें जनमनरंजनाचा जो प्रकार आहे, त्यास **नाटक** असें ह्मणतात. या कल्पनात्मक वाङ्मयाचा मुख्य उद्देश ह्मटला ह्मणजे वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या मनांतील भिन्न वृत्ति प्रक्षुब्ध करून त्यांच्याद्वारें मनावर इच्छित परिणाम करण्याचा असतो. व तो ज्यास उत्तम साधतो त्यासच कवींत किंवा कादंबरीकारांत प्रमुखस्थान मिळतें.

१. **काव्य**—कोणत्याही राष्ट्राच्या वाङ्मयाचा लक्ष्यपूर्वक शोध केल्यास असें आढळून येईल कीं, वाङ्मयास प्रारंभ प्रथम काव्या-

पासून होऊन नंतर त्यांत गद्यग्रंथ निर्माण होतात. वाङ्मयांत कवितेस प्रथम स्थळ देण्यांत येतें. याचें कारण असें कीं, काव्याचा परिणाम लोकांवर फार होत असून त्यांत सुरस व थोडक्या शब्दांत उत्तमोत्तम विचार गोंविलेले असतात. 'कवित्वं दुर्लभं लोके शक्तिस्तत्र सुदुर्लभा' असें एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे. अशाच अर्थाची इंग्रजींतही एक ह्मण आहे, ती अशी, 'कवि निपजतात; ते शिकवून तयार होत नसतात.' कवींना अंतर्दृष्टि विशेष असून ते सर्वज्ञ असतात. * त्यांचें अंतः-करण अत्यंत कोमल व दयार्द्र असून इच्छित विषयांत ते अगदीं तल्लीन असल्यामुळें त्यांचे लेख हृद्यंगम होतात, आणि याचमुळें त्यांचे ग्रंथ चिरकाल आदरास पात्र होतात. **व्यास, वाल्मिकी,** या कवींचीं नांवें संस्कृत ग्रंथांत चिरायु झालीं आहेत. तसेंच **ग्रीस** देशाचें नांव निघालें कीं, **होमरची** आठवण होते. इटलीचें नांव निघालें कीं, **ड्यांटे** कवीची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. **रोम** ह्मटलें कीं, **व्हर्जिल** पुढें येतो. **इंग्लंडचें** नांव निघतांच **शेक्सपियरचें** स्मरण झाल्याशिवाय राहत नाहीं. हिंदुस्थान ह्मटलें कीं, **कालिदासाची** सोज्वळ कीर्ति नजरे-समोर फडकूं लागते. महाराष्ट्र हा शब्द उच्चारतांच **रामदास,**

---

* कवींचें वर्णन करितांना रामदास स्वामींनीं लिहिलें आहे:—

कीं हे सरस्वतीचें निजस्थान । कीं हे नाना कळांचें जीवन ।
नाना सद्विद्यांचें भुवन । यथार्थ होय ॥ १ ॥
कवि प्रेमळाची प्रेमळ स्थिती । कवि ध्यानस्थांची ध्यानमूर्ती ।
कवि उपासकांची वाड कीर्ती । विस्तारिली ॥ २ ॥
कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसांचे ओघ लोटले ।
नाना सुखांचें उचंबळलें । सरोवर हे ॥ ३ ॥

**तुकाराम** व **मोरोपंत** ह्या कवींच्या काव्यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. सूर्यकिरणांच्या तापामुळें विव्हल झालेल्या प्रवाशास ज्याप्रमाणें भव्य व गर्द छायेचा आम्रवृक्ष आपल्या छायेनें आनंद देतो, आपल्या मुळांच्या योगानें आजूबाजूची जमीन घट्ट धोपून धरतो व छायेच्या खालच्या जमिनीवर फारशीं झुडुपें किंवा गवत वाढूं देत नाहीं, तद्वत् उत्तम कवि आपल्या वाणीनें वाचकांचीं मनें रिझवून त्यांना ज्ञानामृत पाजतात, सन्मार्गास लावितात. शोकाकुल किंवा संतप्त झालेल्या मनुष्यास शांतिसुख देतात. समाजास स्थिरता आणितात. त्यांच्यापुढें तुटपुंज्या ग्रंथकारांची लोकांत फारशी प्रतिष्ठा वाढत नाहीं. अशा श्रेष्ठ कवींचीं सुश्राव्य व रसाळ काव्यें वाचून मन उदात्त होतें ! परंतु अलीकडे काव्य वाचण्याची प्रवृत्ति दिवसेंदिवस कमी होत असून नीरस कादंबऱ्या व नाटकें वाचण्याकडे लोक बहुतकरून आपला काळ खर्च करूं लागले आहेत. सारांश, दूध सोडून ताकावरच ते आपली तृप्ति करून घेत आहेत, असें ह्मटलें पाहिजे.

गद्यापेक्षां पद्य पाठ करण्यास सुलभ असून, त्यांत थोड्या शब्दांत अर्थ-गांभीर्य व रस-माधुर्य विशेष असतें. तसेंच तें मनोरंजक असून एकदां पाठ असलें ह्मणजे वाटेल त्या वेळीं ह्मणून आपणांस त्यापासून करमणूक होते. सुरस व बोधपर कविता पाठ असल्या, ह्मणजे त्यांचा वर्तनावर इष्ट परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं.

येथवर काव्याची जी स्तुति केली आहे, ती उत्तम काव्यासच अनुलक्षून होय. काव्यांतही लावण्यांप्रमाणें कांहीं टाकाऊ व अश्लील काव्यें असतात, तीं न वाचणें चांगलें. **प्लेटोनें** एके

ठिकाणीं जो इशारा दिला आहे, तो ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. तो ह्मणतो, " ज्यांच्याकडे स्वदेशहिताची जबाबदारी आहे, त्यांनीं संगीतावर सक्त नजर ठेविली पाहिजे; कारण मर्यादेचें अथवा कायद्याचें उल्लंघन, कोणाच्याही लक्षांत न येतां, प्रथमतः करमणुकीच्या रूपानें या संगीताचे द्वारा होऊं लागतें. अमर्यादपणा अथवा उच्छृंखलपणा यांचा या द्वारानें मनांत प्रथम शिरकाव होतो आणि मग हळूहळू रीतभात व वागणूक यांवर त्याचे अनिष्ट परिणाम दृष्टीस पडूं लागतात. " संगीत नाटकांतील अश्लील पदें आणि शृंगारविषयक लावण्या व पदें यांचा आमच्या समाजांत बराच प्रसार झालेला आढळून येत आहे, ही मोठी दुःखाची गोष्ट होय, व त्यापासून होणारे अनिष्ट परिणाम जरी स्पष्ट कळून आले नाहींत, तरी ते झाल्याशिवाय कधींही राहणार नाहींत!

**२. कादंबऱ्या**—ज्यांना लिहिणें, वाचणें येतें, अशा साधारण लोकांचीं करमणुकीचीं पुस्तकें ह्मटलीं ह्मणजे कादंबऱ्या होत. कवीची जेवढी योग्यता आहे, तेवढीच कादंबरीकाराची आहे. काव्यापेक्षां कादंबऱ्या लोकांस विशेष प्रिय होतात, याचें कारण असें कीं, कादंबरींत संसाराचीं व मनुष्यस्वभावाचीं चित्रें रेखाटलेलीं असतात. काव्यांत तीं नसतात असें नाहीं, परंतु त्यांत अज्ञात ज्ञानाचा किंवा तत्त्वज्ञानाचा भाग विशेष असतो. मनुष्यस्वभावास तत्वज्ञान विशेष आवडत नसून ज्या गोष्टींत मानवी प्राण्यांची हकीगत, त्यांचा इतिहास, त्यांचीं सुखदुःखें, त्यांच्यावरील घोरप्रसंग इत्यादि गोष्टी असतात, अशा गोष्टी वाचतें वेळीं किंवा ऐकते वेळीं त्यांच्या मनोवृत्ति तल्लीन होतात; त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहतात; किंवा त्यांस आनंदाच्या उकळ्या फुटत असतात. कादंबरी लिहिणें फारसें कठीण नसल्यामुळें कोणासही

त्या विषयावर साधारणतः थोडेंफार लिहितां येतें आणि त्यामुळें नीरस आणि हलक्या प्रतीच्या कादंबऱ्या पुष्कळ अस्तित्वांत येतात ! परंतु ज्याप्रमाणें श्रेष्ठ प्रतीचे कवि थोडे, त्याप्रमाणें श्रेष्ठ प्रतीचे कादंबरीकारही थोडेच निपजतात.

कादंबऱ्या वाचणें चांगलें किंवा वाईट, याविषयीं बराच मतभेद आहे आणि तो असण्यास सबळ कारणेंही आहेत. त्यां-विषयीं आह्मांस येथें थोडेंसें दिग्दर्शन केलें पाहिजे. रूपकें, दृष्टांतरूप कथा किंवा कल्पित गोष्टी सांगून श्रोत्यांचीं मनें वळविण्याचा प्रकार फार प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. महाभारतासारख्या प्राचीन ग्रंथांतही रूपकें किंवा दृष्टांतरूप कथा आढळून येतात. **गौतम बुद्ध, साक्रेटीस, येशू ख्रिस्त** वगैरे महात्मे दृष्टांतरूप गोष्टी सांगून लोकांचीं मनें वळवीत व त्यांच्या हृदयांत ज्ञानाचा प्रकाश पाडीत असत. कोणतींही तत्वें दृष्टान्तरूपानें जितकीं मनांत बिंबतात, तितकीं तीं केवळ तात्विक विवेचनानें मनांत उतरत नाहींत, हा अनुभव सर्वांना आहेच. कादंबऱ्या या दृष्टांतरूप कथा किंवा गोष्टी होत. शौर्य, साहस, प्रेम, व्यावहारिक व सामाजिक गोष्टी, या विषयांवर बहुधा कादंबऱ्या लिहिण्याचा प्रघात आहे. परंतु अलीकडे विविध विषयांचाही कादंबऱ्यांत संग्रह होऊं लागला आहे. दृष्टांतरूप कथांपासून जसें पुष्कळ शिकण्यासारखें असतें, तसें कादंबऱ्यांपासूनही असतें. ऐतिहासिक गोष्टी, नीति-सिद्धांत, धर्माच-रण, व्यवहारज्ञान, स्वभाव-वैचित्र्य, दूरदर्शीपणा, उद्योग, वगैरे अनेक अत्यंत उपयुक्त गोष्टी ज्या कादंबऱ्यांपासून शिकतां येण्यासारख्या असतात, अशा कादंबऱ्यांची जेवढी प्रशंसा करावी, तेवढी थोडीच होणार आहे. सत्याविषयीं प्रीति, सत्याचरणाकरितां सोसलेलीं संकटें,

असत्याविषयीं तिरस्कार इत्यादि गोष्टी कादंबऱ्यांत सांगितल्या असल्यास, त्यांस कोण बरें नांवें ठेवील? फार तर काय, ज्या कादंबऱ्या मनोरंजनाकरितांच लिहिलेल्या असून ज्या निरुपद्रवी असतील व ज्यांपासून वाचकांच्या मनावर अनिष्ट परिणाम होणार नाहींत, अशा कादंबऱ्यांनासुद्धां वाईट ह्मणण्यास कोणीही सहसा धजणार नाहीं.

परंतु सर्वच कादंबऱ्या अशा धोरणानें लिहिलेल्या असतात, असें नाहीं. पुष्कळ कादंबऱ्यांतून असंभाव्य, असत्य व अश्लील गोष्टी लिहिलेल्या असल्यामुळें त्यांचा वाचकांच्या मनावर वाईट परिणाम होतो. वाचकांच्या उच्च मनोवृत्ति जागृत न होतां त्यांपासून क्षुद्र मनोवृत्ति मात्र प्रक्षुब्ध होतात. विचारांपेक्षां विकारांचीच ते अधिक प्रवृत्ति करितात. खून, दरोडे, रस्तेलुटी, तसेंच व्यभिचार लुच्चेगिऱ्या, कावेबाजपणा इत्यादि निंद्य गोष्टींचें तिखटमीठ लावून वर्णन करून आपल्या कादंबऱ्या जितक्या अधिक मनोरंजक होतील, तितक्या त्या करण्याचा प्रयत्न कित्येक कादंबरीकार करूं लागले आहेत व असल्या कादंबऱ्या सामान्य लोकांना विशेष प्रिय होऊन त्यांचा पुष्कळ खप होतो, असा अनुभव असल्यामुळें अशा कादंबऱ्या लिहिण्यांत त्यांना अधिक उत्तेजन मिळत आहे. असल्या कादंबऱ्या मुळींच प्रसिद्ध न होतील तर बऱ्या. ज्या गोष्टी पाहून किंवा ऐकून अंगावर रोमांच उभे राहतात, अश्लील लांबलचक वर्णनें वाचून आपलें मन तल्लीन होतें व वाईट वाटण्याचें एकीकडेच राहून असे ग्रंथ वाचण्याची चटक लागते, असे ग्रंथ नेहमीं आपल्या वाचनांत आले ह्मणजे त्यांपासून आपल्या वर्तनावर अनिष्ट परिणाम होतो. मेवामिठाई किंवा मसाला घातलेले पदार्थ जसें दररोज खाणें चांगलें नाहीं, त्यांपासून शरीरास अपाय होतो, तसें

दुर्वृत्ति प्रक्षुब्ध करणाऱ्या कादंबऱ्याही नेहमीं वाचणें इष्ट नाहीं. त्यांपासून मनावर अनिष्ट परिणाम झाल्याखेरीज राहत नाहीं.

मनुष्यास करमणूक पाहिजे व करमणुकीकरितां चांगल्या कादंबऱ्या वाचण्यास हरकत नाहीं. परंतु निरंतर त्या वाचून जे आपला अमोल वेळ व्यर्थ दवडितात, ते अधिक अनुभविक व अत्युपयुक्त ग्रंथांकडे दुर्लक्ष्य करितात, व त्याबद्दल त्यांची जेवढी कींव करावी तेवढी थोडीच होणार आहे ! असल्या वाचनांत ते जो वेळ घालवितात व श्रम घेतात, त्या मानानें त्यांना मोबदला मुळींच मिळत नाहीं. क्षणभर मनरंजन होतें, यापलीकडे त्यांना फारच थोडा फायदा होतो. इतर ग्रंथांच्या वाचनापासून जशी मनाची मशागत होते, बुद्धि वाढते, पुष्कळ माहिती मिळते, तशी अशा ग्रंथांपासून मुळींच होत नाहीं. विद्यार्थ्यांनीं लहानपणीं कादंबऱ्या वाचण्याच्या नादीं न लागतां काव्यें, चरित्रें, निबंध व बोधपर गोष्टी वाचाव्यात. सत्यासत्य निर्णय करण्याची शक्ति अंगीं येऊन मतें ठाम झालीं ह्मणजे मग कादंबऱ्या वाचण्यापासून त्यांच्या मनावर अनिष्ट परिणाम होण्याची भीति राहणार नाहीं.

३. **नाटकें.**—यो यो स्वभावो लोकस्य सुखदुःखसमन्वितः ।
सोऽङ्गाद्भिनयोपेतो नाट्यमित्यभिधीयते ॥ भरतमुनि.

नाटकें करण्याची चाल आपल्या देशांत फार प्राचीनकाळापासून आहे. कालिदासाचीं नाटकें राजदरबारीं होत असत. भवभूति यास राजाश्रय नसल्यामुळें त्याचीं नाटकें यात्रेंत होत असत. मोठ्या सणांत किंवा महोत्सवांत नाटकें करण्याचा प्रघात असे. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांस नाट्यकला पूर्ण अवगत असून

तिचा लोकशिक्षणाच्या कामीं फार उपयोग आहे, अशी त्यांची खात्री होती. कवि किंवा कादंबरीकार आपल्या लेखणीनें जो ठसा वाचकांच्या मनांवर वठवितात, तोच नाटककार आपल्या कृतीस (नाटकास) रंगभूमि, नट, पोषाख, पडदे इत्यादि अनेक साधनांचें साहाय्य घेऊन प्रेक्षकांच्या मनावर वठविण्याचा प्रयत्न करतात. दृश्य वस्तूंचें भरपूर साहाय्य मिळाल्यामुळें 'अधिकस्य अधिकं फलम्' या उक्तीप्रमाणें त्यांची कृति अज्ञ व मूढ जनांपासून तों विद्वन्मुकुटमणी पंडितापर्यंत सर्वांना प्रिय होते. नाटकाची भाषा तुटक असल्यामुळें साधारण लोकांस समजण्यास ती अंमळ कठीण पडते. नाटकें अगोदर वाचून नंतर तीं पाहिलीं असतां चांगलीं समजतात. जीं उत्तम व सर्वमान्य नांटकें असतील, तींच वाचावींत. नीरस व अश्लील नाटकें वाचून काळाचा अपव्यय करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

**४. इतिहास.**—ह्मणजे घडलेल्या गोष्टींचें टिप्पण; मग त्या गोष्टी एखाद्या राष्ट्रासंबंधीं, क्रांतिमूलक महागोष्टीसंबंधीं, एखाद्या संस्थेसंबंधीं, किंवा शास्त्रासंबंधीं असोत. इतिहासांत कार्यकारण-भावाचेंही विवेचन केलेलें असतें. मनुष्याच्या सर्व उन्नतीचा पाया अनुभवावर अवलंबून असून, तो अनुभव इतिहास-शास्त्रांत नमूद केलेला असतो; ह्मणूनच इतिहासाची किंमत जगांत विशेष समजली जात आहे. मागील लोकांस कशा अडचणी आल्या, त्यांजवर कोणकोणतीं संकटें आलीं, त्यांतून त्यांचा कसा बचाव झाला, हलींची स्थिति कशी आहे, पुढें स्थिति कशी होईल, इत्यादि सर्व गोष्टी इतिहासावरून कळतात. इतिहास वाचण्यांत बहुतेक लोकांचा फार घोंटाळा होऊन तो बरोबर न समजल्यामुळें विशेष कंटाळवाणा होतो. सन, तारखा, नांवें, स्थळें हीं बरोबर सांगतां आलीं ह्मणजे इतिहास आला, असा

कित्येकांचा समज असतो. परंतु तो समज साफ चुकीचा आहे ! इतिहासाचें खरें मर्म ह्मटलें ह्मणजे घडलेल्या गोष्टींचा कार्यकारणभाव समजणें आणि त्यापासून सद्यःस्थितीवर काय परिणाम झाले आहेत किंवा पुढें होणार आहेत, याविषयीं बरोबर अनुमान करतां येणें, हें होय. इतिहासापासून दुसरा एक फायदा होतो तो हा कीं, त्यापासून आपणांस मनुष्यस्वभावाचें ज्ञान होतें. पूर्वीं आपली स्थिति कशी होती, हल्लीं कशी आहे, आपली उन्नति होण्यास कोणते प्रयत्न अवश्य आहेत, इत्यादि गोष्टी इतिहासापासून कळतात. प्रथम आपणांस आपला इतिहास पूर्ण अवगत असला पाहिजे. नंतर ज्या लोकांशीं आपला रात्रंदिवस संबंध जडला आहे, त्यांचाही इतिहास माहीत असणें अवश्य आहे. याशिवाय प्राचीन राष्ट्रें व जगांतील इतर अर्वाचीन राष्ट्रें यांचाही इतिहास वाचला असतां त्यापासून फायदा होणार आहे. समजा, आपणास एखाद्या राष्ट्राचा इतिहास वाचावयाचा आहे, तर प्रथम त्या राष्ट्राच्या इतिहासास जेथून आरंभ होतो, तेथून वाचावयास सुरुवात करावी व नंतर पुढें क्रमशः वाचीत जावा. जरी त्यांत आपण एखाद्या पुरुषाचें चरित्र किंवा एखाद्या लढाईचें वर्णन वाचीत असलों, तरी त्या वेळची पूर्ण परिस्थिति नेहमीं लक्षांत असूं द्यावी. ह्मणजे त्यापासून इतिहासवाचनावर बराच प्रकाश पडून आपल्याही ध्यानांत तो भाग बराच राहतो आणि आपलीं मतेंही बरोबर बनतात.

इतिहासापासून मनोरंजन होऊन सद्बोध होतो; " इतिहास हा प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून केलेला तत्वबोध होय ! " असें एका प्रसिद्ध ग्रंथकारानें ह्मटलें आहे. तसेंच त्यापासून सत्कृत्या-बद्दल आवड आणि दुष्कृत्याबद्दल तिरस्कार मनांत उत्पन्न होतो. अंगीं धैर्य येतें. प्रसंग आला असतां मनुष्य डगमगत नाहीं.

मनुष्यस्वभावाचें ज्ञान होतें. आपली योग्यता काय, परिस्थिति काय, हें चांगलें समजल्यामुळें काळास अनुसरून असें वर्तन आपणास करण्यास ठीक पडतें. इतिहासांतील गोष्टी खऱ्या असल्यामुळें त्यांत सत्याचा भाग जेवढा असतो तेवढा, कादंबरींत असत नाहीं. कारण कादंबऱ्या काल्पनिक असतात.

५. **चरित्रें.**—उन्नत जीवित यात्रा, पदचिन्हें कालरूप सिकतेंत।
मरतांना आह्मांला मागें येतील ठेवितां खचित ॥ *
काव्यरत्नावलि.

जगांत कोट्यवधि मनुष्यें जन्मतात आणि कालानुसार मृत्यु पावतात. त्या सर्वांचींच चरित्रें लिहिण्यासारखीं असतात असें नाहीं. आपल्या अंगच्या विशेष विद्वत्तेनें किंवा सद्गुणांनीं जगांतील साधारण मनुष्यांपेक्षां अलौकिक कृत्यें करून ज्यांनीं आपलीं चरित्रें संस्मरणीय केलीं आहेत, असें जे जगाच्या प्रत्ययास आणून दाखवितात, अशांचींच चरित्रें बहुधा लिहिलीं जातात. संस्कृतांत ह्मटलें आहे कीं, ‘ स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ’ राजे जे आहेत त्यांना त्यांच्या छत्राखालीं असलेली प्रजा विशेष मान देते, परंतु जे विद्वान् आहेत ते सर्वत्र ठिकाणीं पूज्य व वंदनीय होतात. आपण एखादें चरित्र वाचूं लागलों ह्मणजे चरित्रनायकावरील प्रसंग, त्यानें भोगिलेला त्रास किंवा छळ, त्याचें धैर्य, त्याची धर्मश्रद्धा, त्याचा निश्चय, त्याची विद्वत्ता, त्याची कळकळ वगैरे अनेक गुण वाचून आपल्या मनावर फारच चांगला ठसा उमटतो. आपणही तसें व्हावें व

---

* Lives of great men all remind us
We can make our lives sublime,
And departing leave behind us
Foot-prints, on the sands of time.
*Longfellow.*

आपलें चरित्र संस्मरणीय करावें, असें वाटतें. तो मनुष्य प्रथम आपल्यासारखाच असून पुढें तो उदयास आला, तसें आपणही प्रयत्न केला असतां उदयास येऊं, अशी क्षणभर मनाला खात्री वाटते. चरित्रें वाचावयास फार चांगलीं. तीं लहानथोरांनीं, स्त्रियांनीं, पुरुषांनीं, सर्वांनीं वाचावीं. **लँगहॉर्न** यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, ' चरित्रें हीं लागवड करण्यास जितकीं योग्य आहेत, तितके इतर कोणतेही ग्रंथ योग्य नाहींत. ' तसेंच **टॉमस कार्लाइल** यानें ह्मटलें आहे कीं, ' वाचनांत सर्वतोपरी उपयुक्त व अति चांगलें वाचन ह्मटलें ह्मणजे चरित्रग्रंथांचें होय ' चरित्रें आपणांस उत्तम मंडळींची ओळख करून देतात, आपल्या अंगीं वीरश्री व उत्साह उत्पन्न करितात व जे महात्मे स्वप्रयत्नानें श्रेष्ठ पद पावले आहेत, अशांच्या अगदीं जवळ आणून सोडितात.

६. **प्रवासवर्णनें व स्थलवर्णनें**.—यांच्या वाचनापासून मनोरंजन होऊन अन्य ठिकाणची माहिती मिळते. विविध देशांच्या लोकांच्या चालीरीति, त्यांचे व्यवहार व सत्यासत्य समजण्याची जिज्ञासा उत्पन्न होते. मन उदात्त होऊन आपल्या राष्ट्राचे, आपल्या समाजाचे गुणावगुण व हितानहित हीं कळूं लागतात. पूर्वीं अध्ययन संपल्यावर एक दोन वर्षें तीर्थयात्रा करण्यांत ( प्रवासांत ) घालवून नंतर आपले लोक जगांतील व्यवहारास लागत असत. धर्मश्रद्धेनें केवळ नव्हे तर ज्ञानार्जनाकरितां ह्मणून प्रवास करणें आवश्यक होय. इंग्लिश, अमेरिकन, जर्मन वगैरे पाश्चात्य देशांतील लोकांत प्रवास करण्याची जशी प्रवृत्ति दिसून येते, तशी आपणांत नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय! आणि यामुळेंच प्रवास वर्णनात्मक व स्थलवर्णनात्मक ग्रंथ आपल्या मराठी भाषेंत फारच थोडे आहेत.

ज्यांना प्रवास करण्याची ऐपत आहे, त्यांनीं अवश्य प्रवास करावे; परंतु ज्यांना तशीं साधनें नाहींत, त्यांनीं प्रवास व स्थल-वर्णनात्मक जे सर्वमान्य ग्रंथ आहेत ते अवश्य वाचावेत, चरित्र-ग्रंथांप्रमाणेंच हे ग्रंथही सर्वांना वाचण्यास अति योग्य आहेत.

**७. निबंध.**—वाचण्यास अगोदर भूमिका बरीच तयार असावी लागते व शिवाय विविध विषयांसंबंधीं प्रथम थोडी फार माहितीही असावी लागते. कोणत्याही विषयाच्या समर्थनार्थ, निरसनार्थ किंवा प्रस्थापनार्थ निबंध लिहिलेले असतात. हें तत्व ध्यानांत ठेवून निबंध वाचले तरच ते समजतात व त्यांपासून ज्ञानप्राप्ति होते. ते वाचतांना सत्यासत्य गोष्टींचा आपण अवश्य विचार केला पाहिजे व ज्या योग्य असतील त्या ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. निबंधांतही सरस आणि नीरस प्रकार असून वाचण्याकरितां त्यांची निवड फार विचारपूर्वक केली पाहिजे. निबंध वाचण्यापासून विशेष ज्ञान प्राप्त होतें व आपल्या विचारांना वळण लागून ते योग्य, सुदृढ व व्यापक बनतात.

**८. कथापुराणें.**—प्रत्येक धर्मांत तीन प्रकारचे ग्रंथ असतात.—(१) तत्त्वज्ञान, (२) कथापुराणें, (३) विधि. धर्मांतील तत्त्वज्ञान व अनुज्ञा जडमूढ लोकांना कळाव्या, त्यांच्या नजरेसमोर उदात्त उदाहरणें रहावीं ह्मणून कथापुराणांची योजना केलेली असते. अशा कथापुराणांपासून बोधामृत मिळत असल्यास तीं वाचणें अत्यंत श्रेयस्कर होय. परंतु पुराणांतील रहस्याकडे मुळींच लक्ष न देतां अंधश्रद्धेनें त्यांना नसतें महत्व देऊन त्यांचें स्तोम माजविण्याची चाल अनेक धर्मपंथांत आढळून येते. कथापुराणांतील रहस्य कळो वा न कळो, तीं बोधपर असोत वा नसोत, तीं श्रद्धेनें वाचण्यांत अमित पुण्य आहे, असा पुष्कळ लोकांचा भ्रामक समज असतो! अशा अंधश्रद्धेनें ते ग्रंथ वाचले असतां

त्यांपासून मनावर मुळींच सुसंस्कार होत नाहीं व ते वाचण्यांत झालेला कालक्षेपही व्यर्थ होतो. ते ग्रंथ योग्य श्रद्धेनें व एकाग्र मनानें वाचावेत व त्यांवर स्वतंत्रपणें विचार करावा. त्यांतील जो बोधपर भाग असेल तो ध्यानांत ठेवून त्याप्रमाणें वागावें.

**९. तत्त्वज्ञान.**—धर्मान्तर्गत तत्त्वज्ञानाचा जो भाग असतो, तो काळजीपूर्वक वाचणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. तसेंच त्यावर मनन करीत गेल्यास धर्माचें रहस्य समजण्यास त्यापासून विशेष मदत होते, यांत संशय नाहीं. तत्त्वज्ञानावर जे आधुनिक कालीं अनेक प्रकारचे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत, त्यांचेंही मननपूर्वक अवलोकन करावें. हे ग्रंथ समजण्यास कठीण असल्यामुळें गुरूचें साहाय्य मिळाल्यास ते सुलभ होतात आणि लवकर समजतात. जिना चढतेवेळीं आपण सावकाश एक एक पाऊल चढतों, त्याप्रमाणें तत्त्वज्ञान ग्रंथ वाचतेवेळीं एक एक तत्त्व किंवा प्रमेय चांगलें समजून घेऊन नंतर दुसरें प्रमेय वाचण्यास सुरवात करावी. अशा रीतीनें अत्यंत काळजीपूर्वक वाचण्याचा क्रम ठेविल्यास हे दुर्बोध ग्रंथ चांगले मनांत ठसतात.

तत्वज्ञानविषयक ग्रंथ समजण्यास कठिण असल्यामुळें ते लोकांस फार कंटाळवाणे वाटतात. परंतु तत्वज्ञान हें मनुष्याच्या विचारसंग्रहाचें सार असल्यामुळें त्याचा अभ्यास करणें, तें समजावून घेणें, हें अत्यंत श्रेयस्कर होय. तत्वज्ञान हें मनुष्याचें जीवन असून त्याचा गुप्त प्रवाह राष्ट्रांतील लोकांच्या अंगीं खेळत असतो. वेद, गीता व उपनिषदें यांतील तत्त्वज्ञानाचा ठसा हिंदुलोकांवर स्पष्ट उमटलेला दिसतो. बायबलांतील तत्वज्ञानास अनुसरून ख्रिस्ती राष्ट्राचे आचार विचार बनले आहेत. तत्वज्ञानांतील तत्वें मनांत पूर्ण बिंबलीं ह्मणजे अंगीं विलक्षण जोम अथवा धैर्य येतें.

**१०. टीकात्मक ग्रंथ.**—ईश्वरानें मनुष्याच्याठायीं जी सद्सद्विवेक बुद्धि ठेविली आहे, तींतच टीकात्मक प्रवृत्तीचा उगम ठेविला आहे. या चिकित्सात्मक प्रवृत्तीनेंच मनुष्यास सत्य व विविध प्रकारचें ज्ञान प्राप्त झालें आहे. प्रत्येक मनुष्य टीकाकार आहे. परंतु स्वतंत्र विचार करून टीका करणारे फारच थोडे असून दुसऱ्यांचे विचार घेऊन त्यांचा अनुवाद करणारेच लोक जगांत फार असतात ! कोणत्याही गोष्टीवर योग्य टीका करतां येणें हें काम फार कठिण आहे. असो. वाङ्मयास शुद्ध व व्यापक स्वरूप आणण्यास, उत्तम ग्रंथांचा गौरव वाढविण्यास, नीरस ग्रंथांचा प्रसार कमी करण्यास, हे टीकात्मक ग्रंथच विशेष कारणीभूत झाले आहेत. टीका ही कसोटी असून या कसोटीच्या कसास जे ग्रंथ उतरतात, त्यांचीच किंमत वाढते. जे बुद्धिमान आहेत, ज्यांचें वाचन दांडगें आहे, अशा अधिकारी लोकांनीं टीकात्मक ग्रंथ लिहावे आणि अशांच्याच ग्रंथांना विशेष मान द्यावा. परंतु टीकात्मक ग्रंथ किंवा लेख लिहिणारे सर्वच अधिकारी असतात असें नाहीं, आणि यामुळेंच कोणत्याही गोष्टीचें किंवा ग्रंथाचें पूर्ण विवेचन होण्यास अनेक टीकात्मक ग्रंथ व्हावे लागतात. अगोदर मूळ ग्रंथ किंवा मूळ गोष्ट समजून घेऊन मग टीकात्मक ग्रंथ वाचण्याची परिपाठ ठेवावा. जे नांवाजलेले ग्रंथ असतील ते अवश्य वाचावे. ते फार लक्ष्यपूर्वक वाचावे, नाहींतर ग्रंथकारांच्या स्वाधीन होऊन आपण विकारवश होऊं व आपलीं मतें भलत्याच मार्गाकडे वाहवलीं जातील !

**११. सर्व विद्यांचे कोश.** (Encyclopaedias) बृहत्कोश विश्वकोश, इत्यादि संपूर्ण माहितीचे कोश आपल्या मराठी भाषेंत जरी फारसे झाले नाहींत, तरी पाश्चात्य भाषांत झाले आहेत. एक एका विषयावर संपूर्ण माहितीचे असे विविध

विषयांवर कोश इंग्रजी भाषेंत झाले आहेत. वाचतेवेळीं लिहितेवेळीं किंवा भाषण करण्यापूर्वीं, आपणास कोणत्याही विषयाची लवकर माहिती पाहिजे असल्यास ती अशा ग्रंथांत पहावी, म्हणजे आपल्या कामास त्या माहितीपासून बरीच मदत होते. जेव्हां कोणत्याही गोष्टीसंबंधानें आपणास माहिती पाहिजे असते, तेव्हां ती अशा ग्रंथांपासून थोडीफार तरी मिळतेच. फुरसदीच्या वेळीं असे ग्रंथ पाहण्याचा परिपाठ ठेविला असतां आपणास विविध विषयांची माहिती मिळून आपलें मन सुसंस्कृत होईल, व कोणत्या ग्रंथांत कोणती माहिती आहे हेंही कळेल.

**मासिक पुस्तकें.**—हीं वाङ्मयाचा एक भाग झालीं आहेत. मासिक पुस्तकांत विविधप्रकारचे लेख येतात. टीकात्मक लेखांना त्यांत स्थळ असतेंच. त्यांतील लेख विचारपूर्वक आणि काळजीनें लिहिलेले असतात. प्रचलित मतांची दिशा ठरविण्याकडे त्यांचा विशेष उपयोग होतो. करमणुकीकरितां म्हणून जीं मासिक पुस्तकें असतात, त्यांत मनोरंजक माहिती व गोष्टी यांनाच विशेषतः स्थळ मिळतें. मासिकांतही सरस, नीरस, हा प्रकार आहेच. जीं उत्तम व उपयुक्त मासिक पुस्तकें आहेत, तीं अवश्य वाचावीं.

**वर्तमानपत्रें.**—वर्तमानपत्रांचें माहात्म्य एकुणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून अति वाढलें आहे. लोकसत्तात्मक राष्ट्रांत वर्तमानपत्रांकडे लोकमताचें नायकत्व आलें आहे. विशिष्ट संस्था, चळवळी किंवा विषय यांच्या अभिवृद्धीकरितां कित्येक वर्तमानपत्रें चालविलीं जात आहेत. दररोजच्या घडामोडी, व्यापारधंदे, राष्ट्राचें हितानाहित यांचा दररोज खल चालू असल्यामुळें, वर्तमानपत्रांना विशेष महत्व येऊन त्यांना वाङ्मयांत स्थळ प्राप्त झालें आहे. वर्तमानपत्रांत प्रचलित विषयांचाच विशेषतः ऊहापोह होत असल्यामुळें कांहीं दिवसांनीं तीं शिळीं होतात. वर्तमानपत्रांतूनही कधीं कधीं विशेष मनन करण्यासारखे विषय येतात, नाहीं असें नाहीं.

व्यवहाराची व दररोजच्या घडामोडींची साधारणतः माहिती असणें अवश्य असल्यामुळें वर्तमानपत्रांचें वाचन अवश्य पाहिजेच. परंतु नुसतीं वर्तमानपत्रें वाचून मन कधींही सुसंस्कृत व्हावयाचें नाहीं. तें संस्कृत होण्यास सर्व प्रकारच्या वाङ्मय ग्रंथांचा अवश्य अभ्यास केला पाहिजे. जे विद्यार्थी आहेत, त्यांनीं वर्तमानपत्रें वाचण्यांत आपला अमोल वेळ न घालवितां आपल्या अभ्यासांत निमग्न राहून वाङ्मयांतील उत्तमोत्तम ग्रंथांचा अभ्यास करण्यांत वेळ खर्च केल्यास त्यापासून त्यांना पुढें विशेष फायदा होईल, ह्यांत संशय नाहीं.

**भाषाशास्त्र.**—भाषेचें मार्मिक व सोपपत्तिक ज्ञान होण्यास भाषेचा इतिहास, व्याकरण, शब्दव्युत्पत्ति, वाक्यरचना, भाषासांप्रदाय, ह्मणी, अलंकार, वगैरे विषयांचें सांगोपांग ज्ञान झालें पाहिजे. पूर्ववयांत हा अभ्यास झाल्यास पुढें मार्मिकतेनें ग्रंथ वाचतां येतात इतकेंच नाहीं तर, चांगल्या वाईट पुस्तकांची आपणास सहज निवड करतां येते. त्यामुळें लहानपणापासून भाषेचें उत्तम व मार्मिक ज्ञान होतें आणि पुढें लिहिण्यांत आणि भाषणांत त्या ज्ञानाचा आपणास विशेष उपयोग होतो. लेखनव्यवसायी मनुष्यांना भाषाशास्त्राचा अभ्यास अत्यंत आवश्यक असल्यामुळें तो त्यांनीं पूर्ववयांत अवश्य केला पाहिजे.

---

# भाग ९ वा.

## मराठी पुस्तकें.

येथवर वाचन ह्या विषयाचें सामान्य विवेचन झालें. कोणत्याही भाषेंतील पुस्तकें वाचतेवेळीं येथवर सांगितलेल्या मुद्यांचा वाचकांना पुष्कळ उपयोग होईल. वाचन ह्मटलें कीं, अगोदर ग्रंथसंग्रह कसा आहे, त्यांत उत्तम व वाचण्यालायक असे कोणते ग्रंथ आहेत, त्यांत न्यूनता काय आहे इत्यादि गोष्टींचें

विवेचन झालें, तरच तो निबंध पूर्ण होईल, एरवीं होणार नाहीं. तसेंच जे तरुण आहेत किंवा वाङ्मयाशीं ज्यांचा विशेष परिचय नाहीं, अशा वाचकांची वाङ्मयाशीं ओळख करून देणें, हें येथें आवश्यक आहे. प्रस्तुत निबंध मराठी भाषेत असल्यामुळें मराठी ग्रंथांसंबंधीं यांत विवेचन झालें पाहिजे. परंतु तो विषय स्वतंत्र असून प्रकृत निबंधाचा तिप्पट किंवा चौपट विस्तार होऊनही त्याची पूर्णता होणार नाहीं. तथापि वाचकांच्या सोईकरितां मराठी वाङ्मयविषयक ग्रंथांविषयीं जें अगदीं थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे, त्यावरून मराठी भाषेंतील बहुतेक चांगल्या पुस्तकांची वाचकांना ओळख होईल, अशी दृढतर आशा आहे.

मराठींतील वेदान्तावर सर्वमान्य असा ग्रंथ ह्मटला ह्मणजे ‘ ज्ञानेश्वरी ’ होय. सामान्य वाचकांना ज्ञानेश्वरी समजण्यास जरी कठिण आहे, तरी गुरुमुखाच्या साहाय्यानें एकदां ती समजली ह्मणजे मनास आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं. ज्ञानेश्वराचा ‘अमृतानुभव’ नामक जो वेदांतपर स्वतंत्र ग्रंथ आहे, तो वाचण्यासारखा आहे. **नामदेव** हा ज्ञानेश्वराचा समकालीन असून महान् भगवद्भक्त होता. याच्या अभंगांत भक्तिरस विशेष आहे. ज्ञानेश्वराच्या मागाहून सुमारें तीनशें वर्षांनीं **एकनाथ** झाला. एकनाथाचे भागवत, भावार्थरामायण, रुक्मिणीस्वयंवर वगैरे ग्रंथ आहेत. त्यांत भागवत हा ग्रंथ अवश्य वाचण्यासारखा आहे. एकनाथाची भाषा प्रौढ व रसभरित आहे. **मुक्तेश्वराची** भाषा रसपरिप्लुत व हृदयंगम आहे. त्याची वर्णनशैली एवढी अप्रतिम आहे कीं, त्याच्या ग्रंथांतील वर्णनें वाचीत असतां ते देखावे प्रत्यक्ष आपल्या नजरेसमोर आहेत कीं काय, असा वाचकांना भास होतो. याचें महाभारत व रामायण हे ग्रंथ सर्वमान्य असून वाचनीय आहेत. **तुकाराम** हा महान् भगवद्भक्त साधु होता. याची अभंगांची गाथा ही मराठी वाचकांना सर्वोत्कृष्ट देणगी आहे. ज्यास तुकारामाचा एखादा किंवा अर्धा अभंग येत नाहीं, असा मनुष्य महाराष्ट्रांत सांपडणें

विरळा ! **रामदास** हा तुकारामाचा समकालीन होता. यानें आमरणान्त ब्रह्मचर्य व्रत पालन केलें. यानें देशाटन पुष्कळ केलें असून ठिकठिकाणीं आपल्या (रामदासी) संप्रदायाचे मठ स्थापन केले. यानें प्रपंच व परमार्थ यांची योग्य सांगड घातलेली आढळून येते. याचे दासबोध, मनाचे श्लोक, हे मननपूर्वक वाचण्या-सारखे आहेत.

**वामनपंडित** या संस्कृतज्ञ महान् पंडितानें मराठींत अनेक ग्रंथ केले आहेत. याची कविता गंभीर व रसभरित आहे. यथार्थ-दीपिका नामक याची गीतेवर मोठी टीका आहे. यानें जे अनेक ग्रंथ केले आहेत, त्यांपैकीं कित्येक वाचकांनीं अवश्य वाचावे. भर्तृहरीनें संस्कृतांत जीं श्रृंगार, नीति व वैराग्यशतकें केलीं, त्यांचें समश्लोकांत यानें मराठींत रूपान्तर केलें आहे. **श्रीधरस्वामी**ची भाषा फारच रसाळ, हृदयस्पर्श करणारी व दृष्टान्तपूर्ण अशी आहे. कित्येक ठिकाणीं वर्णनें तर अति सुरस आहेत. रामविजय, हरि-विजय, पांडवप्रताप हे याचे ग्रंथ अगदीं वाचण्यालायक आहेत. प्राचीन भक्तांचीं व संतांचीं चरित्रें ग्रथित करून **महीपतीनें** महाराष्ट्रावर अमित उपकार केले आहेत. ऐतिहासिक व धर्म-दृष्ट्या हीं संतचरित्रें फार महत्वाचीं आहेत. याचे भक्तीविजय, भक्तलीलामृत, संतलीलामृत हे ग्रंथ पाहण्यालायक आहेत. **मोरोपंत** हा कवि मराठींत सुप्रसिद्ध आहे. यानें मराठींत जितके ग्रंथ लिहिले आहेत, तितके क्वचितच दुसऱ्या कोणीं प्राचीन कवीनें लिहिले असतील. याची भाषा प्रौढ व संस्कृतशब्दमय आहे. यानें महाभारत, रामायणें, हरिवंश, स्फुट काव्यें वगैरे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. यानें केकावली नामक ईशस्तुतिपर जें एक स्वतंत्र काव्य लिहिलें आहे, तें अवश्य वाचण्यासारखें आहे. **अमृतराय** यानें पुष्कळ कटाव व पदें केलीं आहेत. याचीं वर्णनें रसाळ व डौलदार आहेत. याची शब्दरचना विशेष चित्ताकर्षक आहे. **अनंतफंदी** व **रामजोशी** हे पूर्व वयांत

तमासगीर असून, यांनीं अनेक लावण्या केल्या. पुढें यांना विरक्ति उत्पन्न होऊन यांचें लक्ष सन्मार्गाकडे लागलें. यांचे वेदान्तपर फटके, लावण्या वगैरे आहेत. त्या काव्यदृष्ट्या सरस आहेत. मोरोपंताची आर्या कथेंत विशेष प्रचारांत आणण्याचें श्रेय जोशी-बुवांकडे आहे. मराठी सुरस काव्यांत **रघुनाथ पंडित** याच्या नलदमयंती स्वयंवराचा नंबर बराच वर लागतो. हें काव्य सर्वांच्या स्तुतीस पात्र झाल्यामुळें आमच्या वाचकांनीं तें अवश्य वाचावें. या कवीचे गजेंद्रमोक्ष व रामदास वर्णन अशीं दोन काव्यें अलिकडे उपलब्ध झालीं आहेत. मुकुंदराजापासून तों तहत जोशीबुवांपर्यंत महाराष्ट्रांत जे कवि निर्माण झाले, त्या सर्वांचे ग्रंथ धर्मपर आहेत. धर्म, वेदान्त, भक्ति, संतचरित्रें, प्राचीन पौराणिक कथा, क्वचित् व्यवहार इत्यादि विषयांवरच प्राचीन कवींनीं आपली लेखणी झिजविली आहे. त्यांनीं संस्कृत वाङ्मयाचें दोहन करून स्वतंत्र असें मराठी वाङ्मय प्रथम निर्माण केलें आणि मराठी भाषेस मोहक, उदात्त व प्रगल्भ स्वरूप आणिलें.

मराठेशाही स्थापन झाल्यापासून ज्यांना विद्येचा फारसा संस्कार नाहीं अशा शाहीर, गोंधळी वगैरे लोकांची काव्यस्फूर्ति स्फुरण पावली व त्यांनीं आपल्या जोरदार भाषेंत मराठेशाहींतील विविध प्रसंगांचीं वर्णनें गुंफून ‘ पोवाडे ’ तयार केले. पोवाडे ह्मणून दाखवून चरितार्थाचें त्यांनीं नवीन साधन तयार केलें असून कित्येकांनीं तर या पोवाड्यांवर वर्षासनें संपादन केलीं ! मराठ्यांच्या इतिहासावर ह्या पोवाड्यांनीं बराच प्रकाश पडत आहे. मे० आक्वर्थ साहेब व शाळिग्राम यांनीं महत्प्रयासानें पोवाडे मिळवून जें पुस्तक प्रसिद्ध केलें, तें वाचल्याशिवाय वाचकांनीं राहूं नये.

**आधुनिक कवि.**—वेदान्त किंवा पौराणिक कथानकांशिवाय लिहिण्यासारखे अनेक विषय आहेत, अशी आधुनिक ग्रंथकारांचीं खात्री झाल्यामुळें मनोविकारांचीं चित्रें, सृष्टिसौंदर्यवर्णन, स्थल-

वर्णन, रूपकें, हृद्यंगम प्रसंग वगैरे विविधविषयांवर अलीकडे मराठींत कविता होऊं लागल्या आहेत. रघुवंश, मेघदूत या सुप्रसिद्ध संस्कृत काव्यांचीं मराठी भाषान्तरें कै० गणेशशास्त्री लेले ह्यांनीं केलीं आहेत. बापूसाहेब कुरुंदवाडकर यांनीं भट्टवंशकाव्य आर्यवृत्तांत मराठींत केलें. परंतु त्यांत संस्कृत शब्दप्राचुर्य विशेष आहे. कै० कुंटे यांनीं ‘ राजा शिवाजी ’ नामक वीररसप्रधान काव्य ग्रीक किंवा इंग्रजी धर्तीवर लिहिण्याचा प्रयत्न केला असून त्यांत कित्येक भागांत चांगला काव्यरस उतरला आहे. रा. वासुदेवराव खरे यांचें ‘ यशवंतराव महाकाव्य ’ वाचण्यालायक आहे. कृष्णाकुमारी हिचीं काव्यात्मक सरस अशीं मराठींत एकदोन चरित्रें झालीं आहेत. कै० पाळंदे यांची ‘ रत्नमाला ’ वा. दा. ओक यांचें ‘ काव्यमाधुर्य ’, महाजनी यांची ‘ कुसुमांजलि ’, पेठकर यांचें ‘ गंगावर्णन ’, कृष्णशास्त्री यांची ‘ पद्यरत्नावलि ’, लेले यांची ‘ पद्यमंजरी ’, मोगरे यांची ‘ अभिनव कादंबरी ’ या कविता तरुण वाचकांनीं अवश्य वाचण्यासारख्या आहेत. स्कॉट नामक आंग्ल कवीच्या ‘ लेडी ऑफ धि लेक ’ नामक काव्याच्या प्रथम आणि शेवट या दोन सर्गांच्या आधारें रा. प्रधान यांनीं ‘ देवसेनी ’ काव्य लिहिलें आहे. केरकोकिळ मासिक पुस्तकाचे एडिटर आठल्ये यांच्या कवितेंत बराच प्रसाद आहे. यांचें ‘ सासरची पाठवणी ’ हें पुस्तक मुलींनीं अवश्य वाचावें. रे. टिळक, रा. आगाशे, माधवानुज, भांडारे, लोंढे इत्यादि कवींच्या कविता चांगल्या असतात. बाबा गर्दे यांनीं पंचदशी व गीता हे दोन संस्कृत ग्रंथ वाचकांच्या सोयीकरितां विविध प्रकारच्या सुस्वर पद्यांत लिहून गीतपंचदशी व गीतामृतशतपदी या नांवांनीं मराठींत प्रसिद्ध केले आहेत. काव्यदोहन, पद्यरत्नसमुच्चय, अभिनव

काव्यमाला, महाराष्ट्र वाङ्मय, काव्यरत्नावलि ह्या पुस्तकांत व कित्येक मासिकांत आधुनिककवींच्या कविता पाहण्यास मिळतील.

**नाटकें.**—मराठी नाटकांचे बहुधा पांच प्रकार करतां येतील; ( १ ) पौराणिक ( २ ) प्राचीन संस्कृत नाटक ( ३ ) ऐतिहासिक ( ४ ) सामाजिक व ( ५ ) विदेशीय नाटकांचीं भाषान्तरें. नाटकांविषयीं अभिरुचि महाराष्ट्रीयांत बरीच दिसून येत आहे. मराठींत प्रथमतः रंगभूमीवर पौराणिक नाटकें आलीं. महाभारत, रामायण या महाकाव्यांतील लहान मोठ्या कथानकांवर मराठींत अनेक नाटकें झालीं असून कित्येक अत्यंत मनोहर व बोधपर आहेत. हरिश्चंद्र, सावित्री, शाकुंतल, नलदमयंती, सौभद्र, रामराज्यवियोग, सीतास्वयंवर, सैरंध्री, रुक्मिणीहरण हीं पौराणिक नाटकें मनोरंजक व बोधप्रद नाहींत, असें कोण ह्मणेल ?

कै. परशुरामपंत गोडबोले यांनीं उत्तररामचरित्र, वेणीसंहार, मृच्छकटिक, शाकुंतल हीं नाटकें गद्यपद्यात्मक लिहिलीं असून तीं सुरस वठलीं आहेत. कादंबरी, नागानंद, मृच्छकटिक, मालतीमाधव, मुद्राराक्षस, शापसंभ्रम, वेणीसंहार, प्रसन्नराघव इत्यादि प्राचीन संस्कृत नाटकांचीं मराठींत भाषांतरें झालीं असून कित्येक नाटकें लोकादरास पात्र झालीं आहेत. सामाजिक नाटकें जरी मराठींत पुष्कळ झालीं आहेत, तरी त्यांपैकीं वाखाणण्यासारखीं अशीं फारच थोडीं आहेत. त्यांपैकीं कित्येक सुधारणेविरुद्ध व कित्येक सुधारणानुयायी आहेत. तरुणीशिक्षण नाटिका, संमतिवयाचें बिल, शीघ्रसुधारणा—दुष्परिणाम हीं नाटकें सुधारणेविरुद्ध असून, एके काळीं लोकाश्रयास विशेष पात्र झालीं होतीं. जरठोद्वाह, कन्याविक्रय—दुष्परिणाम, शारदा, हुंडा, मतिविकार, वगैरे नाटकें सुधारणेच्या समर्थनार्थ लिहिलेलीं आहेत. नाटकांत प्रणयास बहुधा प्राधान्यत्व मिळत असल्यामुळें कित्येक नाटकें शृंगारपर असावीं, यांत नवल नाहीं. मनोरंजक संविधानक 'जुळवून तद्द्वारा

प्रेक्षकांच्या उच्च मनोवृत्ति उचंबळविणारीं व प्रेक्षकांच्या मनावर वज्रलेख उमटविणारीं नाटकें जेवढीं होतील आणि तीं लोकांच्या वाचण्यांत अधिक येतील तेवढीं इष्टच होत.

मराठ्यांच्या इतिहासांतील निवडक प्रसंग निवडून त्यांवर मराठींत नाटकें झालीं आहेत. रजपूत लोकांनीं स्वातंत्र्य, स्वधर्म व स्वदेश-रक्षणार्थ मुसलमानांशीं जे घणघोर रणसंग्राम केले, त्यांपैकीं कित्येक प्रसंगांवर मराठींत नाटकें झालीं आहेत. शिवछत्रपति, बाजी देश-पांडे, बाजीराव—मस्तानी, संभाजी, पानपतचा मुकाबला, नरवीर मालुसरे, सवाई माधवरावाचा मृत्यु, कांचनगडची मोहना, गुणोत्कर्ष, पद्मिनी वगैरे ऐतिहासिक नाटकें मनोरंजक व बोधपर असल्यामुळें तीं वाचनीय आहेत. दोन रजपुत कन्या, राजाराम आणि ताराऊ, पानपतचा दुर्दैवी मोहरा, विजय-नगरचा डळमळीत राजमुकुट वगैरे नाटकें ‘ किरात ’ नामक लेख-कानें लिहिलीं असून तीं वाचण्यालायक आहेत. राणा भीमदेव हें नाटक शेरिडनच्या ‘ पिझारो ’ नामक नाटकाच्या आधारें लिहि-लेलें असून त्यावर इकडील पोशाख इतका सुंदर व बेमालूम चढ-विलेला आहे कीं, तें नाटक राजस्थानांतील एखाद्या रजपूत राजाचें असावें असा भास होतो. विदेशीय नाटकांचीं भाषान्तरें मराठींत बरींच झालीं आहेत. आंग्लनाटकाचार्य **शेक्सपियर** याच्या कित्येक नाटकांचीं मराठींत भाषांतरें झालीं असून, कित्येक नाटकें रंगभूमीवर येऊन लोकप्रिय झालीं आहेत. लटपटच्या पद्या, नवरदेवाची जोडगोळी, कृपण धनाजीराव, अतिपीड चरित्र, अनुतापशमन, त्राटिका, तारा, मानाजीराव, विकारविलसित, झुंजारराव इत्यादी नाटकें भाषान्तरें तर खरींच; परंतु तीं किती उत्तम झालीं आहेत, याची साक्ष तीं वाचल्यावर सहज पटणार आहे. कै. शंकर मोरो रानडे यांनीं ‘ नाट्यकथार्णव ’ नामक मासिक पुस्तकांतून अनेक उत्तम नाटकें छापून प्रसिद्ध केलीं आहेत. अलिकडे नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, दामाजी, पुंडलीक वगैरे महाराष्ट्र

संतांचीं नाटकें रंगभूमीवर आलीं असून तीं भाविक लोकांना विशेष प्रिय झालीं आहेत. परंतु ग्रंथदृष्ट्या या नाटकांत चरित्रांपेक्षां कांहीं विशेष असेल, असें आह्मांला वाटत नाहीं.

**कादंबऱ्या.**—कादंबऱ्या वाचण्याकडे लोकांचा विशेष कल असल्यामुळें वाङ्मयांत त्यांना प्रमुख स्थळ मिळावें, यांत नवल नाहीं. ऐतिहासिक आणि सामाजिक असे कादंबऱ्यांचे स्थूल-मानानें दोन भेद करतां येतील. नाटकाप्रमाणेंच मराठी कादंबऱ्यांना पौराणिक गोष्टी, प्राचीन कादंबऱ्या, ऐतिहासिक प्रसंग व पाश्चात्य कादंबऱ्या या ठिकाणांहून बरीच मदत झाली आहे. आर्य—चाणक्य, चंद्रगुप्त, कर्पूरमंजरी, बृहत्कथासागर, वगैरे प्राचीन कादंबऱ्या मराठींत असल्यामुळें आपली प्राचीनकाळची स्थिति अंशतः तरी समजण्यास मराठी वाचकांना सोय झाली आहे. कादंबरी, दशकुमार चरित, नागानंद, विश्वगुणादर्श वगैरे संस्कृत कादंबऱ्या मराठींत झाल्या आहेत.

ऐतिहासिक कादंबऱ्या लहानथोर, स्त्रीपुरुष या सर्वांना वाचण्या-लायक असतात. पानिपतची मोहीम, लक्ष्मी व सरस्वती, शिवछत्रपति, देवी सत्यभामा, प्रतापसिंह, हिंदुस्थानांतल्या यो-द्ध्यांच्या गोष्टी, करणवाघेला, बाजीराव, भरतपूरचा वेढा, मोचन-गड, हंबीरराव व पुतळाबाई, केवळ स्वराज्यासाठीं, रूपनगरची राजकन्या, उषःकाल, चंद्रगुप्त, शंकरदेव, गड आला पण सिंह गेला, वगैरे ऐतिहासिक कादंबऱ्या लोकप्रिय झाल्या असून वाचण्यालायक आहेत.

सामाजिक कादंबऱ्या जरी मराठींत पुष्कळ आहेत, तरी त्यांत चांगल्या अशा फारच थोड्या आहेत, आजकालच्या गोष्टींपैकीं 'मधली स्थिति,' 'पण लक्षांत कोण घेतो?' 'जग असें आहे,' 'मी' वगैरे रा. रा. हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या अवश्य वाचण्या-लायक आहेत. गोविंदराव अथवा सुशिक्षणाचें फळ, ताराबाई हिराबाई, शिरस्तेदार, ठगाची जबानी, वेणू, यशवंतराव खरे-नारायणराव आणि गोदावरी, सद्गुणी सून, धाकट्या सूनबाई,

नवयुग, सुधारणेचा मध्यकाल या कादंबऱ्या वाचण्यालायक आहेत. सौ. काशीबाई कानिटकरकृत ‘ रंगराव ’ ही कादंबरीही वाचनीय आहे. स्वतंत्र, सरस व उदात्त विचारपरिप्लुत अशा कादंबऱ्या मराठींत फारच थोड्या आहेत, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें !

अनाथपांडुरंग, प्रतापसिंह, ठगाची जबानी, मथुरा, मोनयौवना, शिलादित्य, दुःखाअंतीं सुख, माणिकबाग, वाईकर भटजी, शामभट आणि त्याचा शिष्य बटो, कुवलयपूरची राणी कुमुद्वती या सर्व कादंबऱ्या इंग्रजीवरून मराठींत झाल्या आहेत. पैकीं कित्येक कादंबऱ्यांना इकडील पेहेराव फारच सुरेख बसला आहे. सुप्रसिद्ध बंगाली कादंबरीकार बंकिमचंद्र चतर्जी याच्या कादंबऱ्यांचीं आनंदाश्रम, विषवृक्ष, दुर्गेशनंदिनी, मृणालिनी, कृष्णकांताचें मृत्युपत्र वगैरे मराठींत जीं भाषान्तरें झालीं आहेत, तीं वाचकांनीं अवश्य वाचावीं; याशिवायही कित्येक बंगाली कादंबऱ्यांचीं मराठींत भाषान्तरें झालीं आहेत. हिंद आणि ब्रिटानिया, सरस्वतीचंद्र या सुरस गुजराथी कादंबऱ्यांचीं मराठींत रूपान्तरें झालीं आहेत.

पंचतंत्र, हितोपदेश यांचीं मराठींत भाषान्तरें झालीं आहेत. मुक्तामाला ही सुरस कादंबरी वाचण्यालायक आहे. गलीव्हरचा वृत्तांत, इसापनीति, अरेबियन नाइट्स ह्या अद्भुत गोष्टी मराठींत झाल्या आहेत. कित्येक कादंबऱ्यांत कल्पनाशक्ति उच्च प्रकारची नसल्यामुळें त्या व्हाव्या तशा झाल्या नाहींत. या काळीं अद्भुत गोष्टी जरी लोकांना फारशा रुचत नाहींत, तरी लेखकाच्या कल्पनाशक्तीचा प्रवाह प्रबळ असल्यास अशा अद्भुत कादंबऱ्यांनासुद्धां इसापनीति, अरेबियन नाईट्स यांप्रमाणें अत्यंत मोहक व बोधपर स्वरूप प्राप्त होतें. निर्णयसागर छापखान्याचे मालक व वा. मो. पोतदार यांनीं पुराणें, नाटकें, काव्यें यांतील अनेक सुरस पौराणिक कथानकांचीं मराठींत सुबोध भाषांतरें करवून छापिलीं आहेत.

**इतिहास.**—इतिहासाची अभिरुचि प्राचीनकाळीं आह्मांत फारच थोडी होती, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय! आणि याचमुळें आमचा प्राचीनकाळचा इतिहास जसा उपलब्ध असावा तसा नाहीं. डा० भांडारकर यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक जो इंग्रजींत दख्खनचा इतिहास लिहिला आहे, त्याचें मराठींत रूपान्तर झालें आहे. ग्रांट डफ साहेबानें अस्सल कागदपत्र पाहून जो मराठ्यांचा मोठा इतिहास इंग्रजींत लिहिला आहे, त्याचें भाषांतर क्यापटन डी. केपन यानें मराठींत केलें आहे. एलफिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास इंग्रजींत बहुमान्य समजला जातो, त्याचा तर्जुमा कै० मंडलिक यांनीं मराठींत केला आहे. टॉड साहेबांच्या राजस्थानच्या इतिहासाची मराठी नक्कल लोकहितवादीनें केली आहे. सुराष्ट्र देशाचा इतिहास—गुजराथचा इतिहास—मध्यप्रांताचा इतिहास—(चिपळूणकरकृत) दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास—हे मोठे इतिहास सुप्रसिद्ध असल्यामुळें वाचकांनीं ते अवश्य वाचावे. कै. न्यायमूर्ति रानडे यांनीं मराठी सत्तेच्या उत्कर्षासंबंधीं जो इतिहास इंग्रजींत लिहिला आहे; त्याचें मराठी रूपान्तर रा. आगाशे यांनीं केलें आहे. फेरिस्ताकृत इतिहासाचेंही मराठींत भाषांतर झालें आहे. रा. सरदेसाई यांनीं मराठी रियासत, मुसलमानी रियासत व ब्रिटिश रियासत, या तीन रियासतींत पुष्कळ माहिती एकत्र करून ठेविलेली आहे. रोमेशचंद्र दत्त यांच्या प्राचीन भरतभूमीच्या इतिहासाचें भाषांतर मराठींत झालें आहे. ‘ युरोपचें संक्षिप्त इतिवृत्त ’ हें फ्रिमनच्या ग्रंथाचें भाषांतर रा. विजापूरकर यांनीं केलें आहे.

अयोध्येचे नबाब, मराठ्यांचे बुंदेलखंडातील पराक्रम, मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार, मराठ्यांचें आरमार, हीं रा. पारसनीस यांचीं पुस्तकें वाचकांनीं अवश्य वाचावीं. लोकहितवादीकृत ऐतिहासिक गोष्टींत पुष्कळ ऐतिहासिक माहिती दिलेली आहे. आमच्या इतिहासाचें यथार्थ ज्ञान होण्यास व त्यांतील

न्यूनाधिक्य कळण्यास पृथ्वीवरील अनेक देशांचे इतिहास पाहिले पाहिजेत. असा प्रकारचा ग्रंथसंग्रह मराठींत अझून चांगलासा झाला नाहीं. तरीपण अथेन्सचें साम्राज्य—इंग्लंडचा इतिहास—इंग्लंड देशाचा विस्तार—इराण—कार्थेज—ग्रीस—रोम आणि कार्थेज—तुर्कस्थान—ईजिप्त—आसिरिया—रशिया—रोमन साम्राज्याचा ऱ्हास व नाश—इत्यादि अनेक देशांचे इतिहास मराठींत झाले आहेत. यामुळें ज्ञानार्थी वाचकांची अंशतः तरी सोय झाली आहे. वरील ग्रंथांपैकीं पुष्कळसे ग्रंथ विद्याभिलाषी व महाराष्ट्रास ललामभूत असे श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनीं इंग्लिश ‘हिस्टरीज ऑफ नेशन्स’ नामक ग्रंथमालिकेच्या आधारें करविले आहेत. त्याबद्दल आपण त्यांचे ऋणी व्हावें तेवढें थोडेंच होणार आहे !

मराठ्यांचा इतिहास बखरींतून व कागदपत्रांतून मिळत असल्यामुळें त्यासंबंधानें येथें थोडक्यांत उल्लेख केला पाहिजे. शिवाजी, संभाजी, राजाराम व शाहू यांचीं चरित्रें मल्हारराव चिटणीसानें बखरीच्या रूपानें लिहिलीं आहेत. कृष्णाजी अनंत व चित्रगुप्तकृत शिवाजीचें चरित्र प्रसिद्ध आहे. पेशव्यांची बखर, सोहोनीकृत पानपतची बखर, भाऊसाहेबांची बखर, नारायणराव पेशव्यांची बखर वगैरे कित्येक बखरी प्रसिद्ध झाल्या आहेत. काव्येतिहाससंग्रह, भारतवर्ष, ग्रंथमाला, इतिहाससंग्रह वगैरे मासिक पुस्तकांतून बरीच ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध झाली आहे. रा. राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें नामक खंड वेळोवेळीं प्रसिद्ध करून पुष्कळ उपयुक्त माहिती प्रसिद्ध केली आहे. रा. पारसनीस व खरे यांनींही या कामीं बरेच परिश्रम केले आहेत. पेशव्यांचीं दप्तरें जीं सरकारांत आहेत, त्यांतील उपयुक्त माहिती प्रसिद्ध करण्याची परवानगी सरकारानें दिली असून डे. व्ह. ट्रा. सोसायटी पुणें व मुंबईचे इतिहासभक्त शेट पुरुषोत्तम विश्राम मावजी यांनीं कांहीं रोजनिशा, कैफियती वगैरे प्रसिद्ध केल्या आहेत. भारत इतिहाससंशोधक मंडळीनेंही प्राचीन इतिहाससंशोधनाचें काम चांगलें चालविलें आहे.

अ. क्र. ... ९१

होळकर, शिंदे, गायकवाड, नागपूरकर भोसले, आंग्रे, दाभाडे, विंचूरकर वगैरे मराठे सरदार मंडळींनीं आपापल्या घराण्यांचे इतिहास लिहवून प्रसिद्ध केले आहेत. शिवाय जीं लहानलहान विद्यमान संस्थानें आहेत, त्यांचेही इतिहास अलिकडे प्रसिद्ध झाले आहेत, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय ! रा. नारायण भवानराव पावगी यांनीं भारतीय साम्राज्य नामक ग्रंथमालिकेंतील प्राचीन आर्यलोकांची सुधारणा, त्यांचा धर्म, व्यवहार, कलाकौशल्यें, विद्या, व्यापार इत्यादि विविध विषयांची माहिती अनेक ग्रंथाधारें देऊन ती मालिका महाराष्ट्रीयांस अर्पण केली आहे. त्यांच्या ह्या कृतींचें आमच्या अभिज्ञ वाचकांनीं अवश्य परिशीलन करावें, अशी त्यांना अगत्याची सूचना आहे.

**चरित्रें.**—महीपतीनें आपल्या भक्तिविजय, संतलीलामृत, भक्त-लीलामृत या ग्रंथांत प्राचीन साधुसंतांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. जनार्दन रामचंद्र यांनीं ‘ कविचरित्र ’ नामक पुस्तकांत संस्कृत, मराठी, कानडी, तेलगु वगैरे कवींचीं चरित्रें व आख्यायिका लिहिल्या आहेत. कविचरित्र नामक ग्रंथांत रा. आजगांवकर यांनी कित्येक महाराष्ट्रीय कवींचीं चरित्रें दिलीं आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं कविपंचक नामक पुस्तकांत—कालिदास, भवभूति, बाणभट्ट, सुबंधु आणि दंडी या पांच—कवींचीं चरित्रें लिहिलीं आहेत. शास्त्रीबुवांसारख्या मार्मिक लेखकाचें हें पुस्तक अवश्य वाचण्यासारखें आहे, हें सांगणें नकोच. मराठींतील प्राचीन कवि ज्ञानेश्वर, ( पारख ) एकनाथ, ( सहस्रबुद्धे ) तुकाराम, ( केळुसकर ) मोरोपंत ( हंस व पांगारकर ) वामनपंडित ( हंस ) रामदास वगैरे संतचरित्रें अवश्य वाचण्यासारखीं आहेत.

गौतम बुद्ध—शंकराचार्य—येशू ख्रिस्त,—महंमद—मार्टिन ल्यूथर-नानक—राममोहन राय इत्यादि धर्मसंस्थापकांचीं चरित्रें मराठींत झालीं आहेत.

शिवाजीमहाराज—संभाजी—राजाराम—शाहू—बाळाजी विश्वनाथ—बाजीराव-माधवराव पेशवे—नाना फडणीस—महादजी शिंदे, बापू गोखले, मल्हारराव होळकर, जिवबा दादा बक्षी इत्यादि मराठी रियासतींतील सुप्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. अकबर व औरंगझेब या मुसलमानी बादशहांचीं स्वतंत्र चरित्रें झालीं आहेत.

जगांत इतर देशांत जे अनेक महान् पुरुष उत्पन्न झाले व ज्यांनीं इतिहासांत आपलीं नांवें संस्मरणीय करून ठेविलीं, अशा नरपुंगवांपैकीं जेम्स गार्फिल्ड,—एब्राहाम लिंकन—आलफ्रेड धी ग्रेट—पीटर धी ग्रेट—बेंजामिन फ्रांक्लीन—जॉर्ज वाशिंगटन—नेपोलियन बोनापार्ट—ड्यूक ऑफ वेलिंगटन—माझिनी ( घाणेकरकृत ) ग्यारिबाल्डी—डानियल ओकोनेल—लिव्हिंगस्टन—यांचीं चरित्रें मराठींत झालीं आहेत, तीं लहानथोर, स्त्रीपुरुष वगैरे सर्वांनीं वाचण्याजोगीं आहेत. तसेंच शेक्सपियर, पीट, कॉबडेन, बेकन, मेकॉले, न्यूटन, कार्लाइल, गिबन, हर्बर्ट स्पेनसर या लोकोत्तर आंग्ल पुरुषांचीं चरित्रें, अवश्य वाचण्यासारखीं आहेत.

अहिल्याबाई होळकरीण, झांशीची महाराणी लक्ष्मीबाई, आनंदीबाई जोशी, महाराणी व्हिक्टोरिया वगैरे सुप्रसिद्ध स्त्रियांचीं चरित्रें झालीं आहेत. स्त्रीरत्नहार, भारतवर्षीय युवतीरत्नमाला, शूर अबला, ऐतिहासिक स्त्रिया या पुस्तकांत भारतीय सुप्रसिद्ध स्त्रियांचीं चरित्रें गुंफिलीं आहेत.

इंग्रजी अमलांत विद्या संपादन करून स्वप्रयत्नानें जे नांवारूपास चढले, अशा बहुतेक प्रसिद्ध पुरुषांचीं त्रोटक चरित्रें मराठींत लिहिलीं गेलीं आहेत. कै० नाना मोरोजी, मंडलीक, सर टी. माधवराव, का. त्र्यं. तेलंग, न्यायमूर्ति रानडे, आगरकर वगैरे गृहस्थांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र जें त्यांच्या बंधूनें लिहिलें आहे, तशा प्रकारचीं माहितीनें परिप्लुत व विश्वसनीय चरित्रें मराठींत नाहींत, असें म्हटल्यास

गैरवाजवी होणार नाहीं. अशा प्रकारचीं चरित्रें जेव्हां होतील तेव्हांच तीं विशेष वाचनीय होतील. या आधुनिक मंडळींच्या चरित्रांपासून नवीन पिढीस बराच बोध घेण्याजोगा असल्यामुळें त्यांचीं चरित्रें वाचणें बोधप्रद होईल, यांत संशय नाहीं.

**प्रवासवर्णनें व स्थलवर्णनें.**—प्रवासाची आवड आमच्या लोकांत फारशी नाहीं. धार्मिक अडचणीमुळें व आप्तवर्ग सोडून परदेशांत जाण्यास कोणीहि सहसा धजत नाहीं. अशा अनेक अडचणी असल्यामुळें प्रवासवर्णनात्मक व स्थलवर्णनात्मक ग्रंथ मराठींत व्हावे तेवढे झाले नाहींत, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय! कै० करसनदास मूळजी यांच्या विलायतच्या प्रवासाचें मराठी भाषांतर झालें आहे. रा. रावजी भवानराव पावगी यांनीं आपला विलायतचा प्रवास लिहून प्रसिद्ध केला आहे. पंडिता रमाबाई यांचा विलायतचा प्रवास, युनायटेड स्टेट्स्‌ची लोकस्थिति व प्रवास-वृत्त हीं पुस्तकें वाचनीय आहेत. कै० सरदार अण्णासाहेब विंचूर-कर यांनीं उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांतील ज्या अनेक तीर्थयात्रा केल्या, त्यांची माहिती 'तीर्थयात्राप्रबंध' नामक पुस्तकांत दिली आहे. काश्मीर प्रांत ह्मणजे केवळ नंदनवन; परंतु त्या प्रांताच्या वर्णनात्मक असें मराठींत एकच पुस्तक आहे. उदासकृत धौममहा-बळेश्वरवर्णन सुरस भाषेंत लिहिलेलें असल्यामुळें अवश्य वाचनीय झालें आहे. विजापूर, काशी, दिल्ली या इतिहासप्रसिद्ध शहरांचीं वर्णनें झालीं आहेत. रा. गोगटे यांचें महाराष्ट्रांतील किल्ले, कै. शंकर बा. दीक्षित यांचें भारतवर्षीय भूवर्णन, रा. मोडक यांचें सौराष्ट्रवर्णन, हीं पुस्तकें अवलोकनार्ह आहेत. यांशिवाय क्षेत्र-माहात्म्य वर्णनात्मक लहान सहान अनेक पुस्तकें मराठींत प्रसिद्ध झालीं आहेत.

**निबंध.**—वेद, उपनिषदें, वेदान्त वगैरे विषयांवर संस्कृतांत भाष्यें आहेत. भाष्य हा एक प्रकारचा निबंधच होय. कोणत्याही विषयाचें विवेचन करणें, समर्थन करणें, प्रस्तुत मतखंडन करून नवीन मत स्थापन करणें, या हेतूनें निबंध लिहिलेले असतात. कै. स. का. छत्रे, बाळशास्त्री जांभेकर, गो. ना. माडगांवकर, कृष्ण-शास्त्री चिपळूणकर हे मराठींतील प्राचीन गद्यग्रंथकार होत. रा. छत्रे यांचे इसापनीति व बाळमित्र असे दोन भाषांतररूप ग्रंथ आहेत. बाळशास्त्री जांभेकर व कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची भाषा शुद्ध व सरळ असल्यामुळें मराठी भाषेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनीं त्यांचे निबंध अवश्य पहावे, अशी यांना सूचना आहे. मराठी भाषेंत प्रख्यात निबंधकार ह्मणजे कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे होत. इंग्रजींत ज्याप्रमाणें प्रथम ऑडिसननें निबंध लिहून अनेक विषय वाचण्याची लोकांना गोडी लाविली, त्याप्रमाणें शास्त्रीबुवांनीं मराठी भाषा, मराठ्यांचा इतिहास, जुने मराठी कवि व त्यांचीं काव्यें इत्यादि अनेक विषयांवर निबंध लिहून मराठी वाचनाची प्रथम अभिरुचि उत्पन्न केली. यांची भाषा सरळ, जोरदार, मनांत ठसणारी व अभिमानोत्तेजक अशी आहे. निबंधमाला* नामक मासिकपुस्तकाचे द्वारा जोरदार भाषेंत त्यांनीं अनेक विषयांची चर्चा केली आहे. आपल्या अद्वितीय लेखनशक्तीनें यांनीं महाराष्ट्रास हालवून सोडलें होतें, असें ह्मटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांनीं यांचे ग्रंथ अवश्य वाचावेत. लोकहितवादीनें अनेक निबंध लिहिले आहेत. याची भाषा सरळ व प्रौढ आहे. शास्त्रीबुवा हे जुन्या मताचे व लोकहितवादी हे सुधारणाप्रिय होते. कै. आगरकर यांचा निबंधसंग्रह ‘ विविध विषयसंग्रह ’ मराठीच्या विद्यार्थ्यांनीं वाचल्याशिवाय राहूं

* या मालेंतील ‘ आमच्या देशाची स्थिति ’ हा भाग आक्षेपार्ह ठरून सरकारजमा झाला आहे.

नये. यांची भाषा जोरदार असून तींत शब्दलालित्य व अर्थगांभीर्य विशेष आहे. हे कट्टे सुधारक होते व यांनीं आपल्या लेखणीनें महाराष्ट्रांत विशेष चळवळ उडवून दिली होती. धनुर्धारी यांची शब्दयोजना मनन करण्यासारखी असून, यांची भाषा आवेशयुक्त व अभिमानोत्तेजक अशी आहे. थोडक्यांत स्पष्ट व खोंचदार लिहिण्याची हातोटी रा. टिळक यांना साधली आहे. रा. राजाराम रामकृष्ण भागवत यांची भाषा जोमदार परंतु तुटक आहे. मराठ्यां-संबंधानें चार उद्गार व महाराष्ट्रधर्म हीं यांचीं पुस्तकें वाचण्या-लायक आहेत. रा. आठल्ये केरळकोकिळ मासिक पुस्तककर्ते व कै. ना. वि. बापट यांची भाषा सरळ, हृदयंगम व वर्णनशैली सुरस आहे. रा. गोळे यांची भाषा प्रौढ व मनोवेधक आहे. कुटुंबाचा अभिमान, ब्राह्मण आणि त्यांची विद्या, हिंदुधर्म आणि सुधारणा हीं यांचीं पुस्तकें अवश्य वाचण्यासारखीं आहेत. रा. वि. कों. ओक यांनींही अनेक निबंध लिहिले आहेत. विषय मांडणी थोडक्यांत व सुगम करण्याची यांना हातोटी साधली आहे.

मराठींतील निवडक निबंध म्हटले म्हणजे पं. रमाबाई कृत स्त्रीधर्मनीति–वैद्यकृत अवलोन्नातिलेखमाला,–ओककृत प्रपंच रहस्य, केसरींतील निवडक निबंध–कृष्णशास्त्री चिपळूणकरकृत अनेक विद्यामूलतत्वें–विष्णुशास्त्री चिपळूणकरकृत निबंधमाला*–हंसकृत मोरोपंत व वामनपंडित –भिडेकृत मुक्तेश्वर व वामनपंडित–बोडसकृत अद्वैतमीमांसा हीं पुस्तकें अवश्य वाचण्यासारखीं आहेत.

इंग्रजी भाषेंत जीं सुप्रसिद्ध पुस्तकें आहेत त्यांपैकीं कित्येकांचीं रूपान्तरें मराठींत झालीं आहेत. कर्तव्यसुख अथवा संसारसुख, जीवितकर्तव्य–सद्वर्तन– स्वतःचा प्रयत्न–पाश्चात्य राष्ट्रांची सामाजिक उत्क्रांति--प्राच्य व पाश्चात्य देशांतील ग्रामसंस्था

---

* पान ९६ वरील टीप पहावी.

बेकनचे निबंध—स्वातंत्र्य—स्त्रियांची परवशता—कार्लाईल वगैरे पुस्तकांत इंग्रजी ग्रंथकारांचे उत्तमोत्तम विचार असल्यामुळें तीं वाचणें अवश्य होत.

**अध्यात्म व तत्वज्ञान.**—या विषयांवर मराठींत अनेक ग्रंथ आहेत. वेदान्त विषयावर अनेक ग्रंथ असून गीता, उपनिषदें वगैरे ग्रंथांची मराठींत अनेक भाषांतरें झालीं आहेत. हर्बर्ट स्पेन्सर प्रो. म्यॉक्स मुल्लर, मिसेस आनी बेझांट यांच्या ग्रंथांचीं मराठींत रूपान्तरें झालीं आहेत. सुप्रसिद्ध स्वामी विवेकानंद यांनीं अमेरिकेंत वेदान्त विषयावर जीं सुरस व्याख्यानें दिलीं, त्यांची मराठींत राजयोग, कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग अशीं भाषांतरें झालीं आहेत. विवेकानंदाचे समग्र ग्रंथ, स्वामीरामतीर्थ यांचे ग्रंथ मराठींत झाले आहेत. कित्येक उपनिषदांचीं भाषांतरें झालीं आहेत, तीं अवश्य वाचनीय आहेत. प्रो. भानु यांनींही उपनिषद्‌माला काढून कित्येक उपनिषदें प्रसिद्ध केलीं आहेत. अनंताशीं साधर्म्य, ज्ञेय मीमांसा—अज्ञेयमीमांसा, गृहस्थाश्रम, सुलभ वेदान्त गुच्छ—अद्वैत मीमांसा—दासबोध—आत्मविद्या—कै. रानडे, मोडक व डा. भांडारकर यांचीं धर्मपर व्याख्यानें, हीं या विषयांवरील मराठी ठळक ठळक पुस्तकें होत.

**भाषा व व्याकरण.**—भाषेच्या अभ्यासांत भाषेचा इतिहास, व्याकरण, भाषाशास्त्र, यांचीं चांगली ओळख असावी लागते. वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांनीं भाषेचे इतिहास अवश्य वाचावेत, मराठी भाषेचा इतिहास अद्यापि कोणीं लिहिला नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय! दादोबा पांडुरंग, गोडबोले, कृष्ण शास्त्री चिपळूणकर, रेव्ह. नवलकर, रा. भि. जोशी, दामले यांनीं मराठी व्याकरणावर मोठे ग्रंथ लिहिले आहेत. मराठी भाषेच्या शुद्ध लेखन पद्धतीवर साने, हतवळणे, गुंजीकर यांचीं पुस्तकें आहेत. लेलेकृत साहित्यशास्त्र, अलंकार प्रकाश, गोरेकृत अलंकारचंद्रिका, आगरकरकृत वाक्यमीमांसा हीं पुस्तकें वाचण्यासारखीं नाहींत, असें कोण म्हणेल? रा. पावगीकृत भाषाशास्त्र, प्राकृतभाषेचा इतिहास हीं

पुस्तकें विद्यार्थ्यांनीं अवश्य पहावीं. ओककृत महाराष्ट्र वाङ्मय, आपटेकृत मराठी वाङ्मयाचा अभ्यास, पांगारकर यांचें 'मराठी भाषेचें स्वरूप' व भावे यांचें 'महाराष्ट्र सारस्वत' हीं पुस्तकें ज्ञानार्थी वाचकांनीं अवश्य पहावीं. गद्यरत्नसमुच्चय व वाचनपाठमाला ह्या पुस्तकांत अनेक मराठी ग्रंथकारांच्या ग्रंथांतील उतारे दिले असल्यामुळें तीं विद्यार्थ्यांना उपयुक्त नाहींत असें कोण ह्मणेल ?

---

## भाग १० वा.

## उपसंहार.

वाचन ह्या विषयाचें येथवर यथामति विवेचन झालें. आपणास सत्य ज्ञान व्हावें, पुष्कळ ज्ञान व्हावें, आपले विचार उदार व्हावे, कार्यकारणाचा संबंध कळावा व त्या ज्ञानाचा आपल्या वर्तनावर उचित सुपरिणाम व्हावा, हे हेतु मनांत धरून लीन भावानें आपणास विद्यार्थी समजून मनुष्यानें ज्ञानार्जनाचें व्रत आमरण चालविलें पाहिजे. आयुष्यांत गृहशिक्षण, शाळेंतील शिक्षण व प्रौढ वयांतील शिक्षण अशा शिक्षणाच्या तीन प्रमुखावस्था असतात. वाचनाची संवय लहानपणापासून लागली ह्मणजे पुढें ती आपोआप वृद्धिंगत होते, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तिजबरोबर अवलोकनशक्ति, धारणाशक्ति व विवेकशक्ति यांचीही अभिवृद्धि झाली पाहिजे. असें झालें ह्मणजे विद्येची गोडी उत्पन्न होऊन त्या विद्येचा मनांत उत्तम परिपाक बनतो. मोठमोठ्या विषयांचें आकलन करण्यास व त्यांतील रहस्य शोधण्यास बुद्धीच्या ठायीं पात्रता येते. वाचनाचा अंतिम हेतु नेहमीं याप्रमाणें आदर्श-

वत् पुढें ठेविल्यानें त्यापासून अंशतः तरी आपणास फलप्राप्ति झाल्याशिवाय राहणार नाहीं.

या कामीं गृहशिक्षणाची फारच आवश्यकता आहे. लहानपणीं मुलांचा बहुतेक वेळ घरींच आपल्या आईबापांच्या सांनिध्यांत जातो. त्याकाळीं त्यांची जिज्ञासा व धारणाशक्ति या अति प्रबल असतात. जें जें ह्मणून त्यांच्या अवलोकनांत येतें, त्याचा त्यांच्या मनावर दृढ संस्कार होतो. त्यांचा ज्या मोठ्या माणसांशीं सहवास घडतो, त्यांचें अनुकरण करण्याची त्यांना स्फूर्ति होत असते. अशा या अनेक कारणांमुळें गृहशिक्षण मुलांना जितकें उत्तम देतां येईल तितकें देण्याचा प्रथमतः अवश्य प्रयत्न झाला पाहिजे. मोठ्या माणसांनीं स्वतः चांगलें वागून लहान मुलांना उत्तम धडा घालून दिला पाहिजे. त्यांच्या वर्तनावर सक्त नजर ठेविली पाहिजे. व त्यांच्या सद्वृत्तींचा विकास होण्यास ज्या शिक्षणाची अपेक्षा असेल, तें त्यांना अवश्य दिलें पाहिजे. या गोष्टीकडे आपल्या लोकांचें जसें लक्ष जावें तसें जात नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय! येशू ख्रिस्त, मार्कस ऑरेलियस, गेटे, शिलर, नेपोलियन बोनापार्ट, वेलिंगट्न, शिवाजी वगैरे अलौकिक पुरुषश्रेष्ठांचा अभ्यास मोठमोठ्या पाठशाळांत झाला नव्हता; तर लहानपणीं त्यांना उत्तम प्रकारचें गृहशिक्षण मिळाल्यामुळेंच त्यांच्या सद्वृत्तींचा विकास झाला आणि त्यामुळें पुढें ते कीर्तिगिरीच्या शिखरीं पोहोंचले!

सुशिक्षित आईबापांचा सुयोग आणि त्यांतही त्यांच्यापासून शिक्षण मिळण्याचा सुयोग हे फारच थोड्या लोकांना प्राप्त होत असतात. गुरुगृहीं राहून शिक्षण संपादन करण्याची प्राचीन पद्धत आतां नामशेष झाली आहे. यामुळें पुष्कळांना सार्वजनिक शाळेंतील शिक्षणावरच अवलंबून रहावें लागतें. अगोदर वर्गांत मुलांची संख्या विशेष, शिक्षणपद्धति नियंत्रित व काल परिमित असून घालून दिलेल्या शिस्तीबरहुकूम शिक्षकांना काम करणें भाग

असतें. ठरींव अभ्यास सर्वांकडून करवून घेण्यांतच शिक्षकांचा वळ जात असल्यामुळें मुलांच्या मनोवृत्तींची योग्य वाढ होत आहे कीं नाहीं, हें पाहाण्यास त्यांना मुळींच फुरसद होत नाहीं. मग व्यक्तिशः त्यांची जिज्ञासा तृप्त करण्याची व त्यांना व्यक्तिशः कळकळीनें उपदेश करण्याची गोष्टच नको. अशी जरी स्थिति आहे, तरी मुलांची जिज्ञासा तृप्त केली पाहिजे. त्यांना योग्य उपदेश करीत गेलें पाहिजे. त्यांना वाचनाची गोडी लावून त्यांच्या ठायीं विद्येची अभिरुचि उत्पन्न केली पाहिजे. आपल्या देशांत गृह-शिक्षणाची हेळसांड होत आहे, ही गोष्ट ध्यानांत ठेवून आपणां-कडून मुलांना जितका उपदेश होईल तितका शिक्षकांनीं केला पाहिजे. शिक्षकाचें काम हें महा पवित्र व मोठ्या जबाबदारीचें आहे; ही गोष्ट निरंतर मनांत बाळगून त्यांनीं मोठ्या कळकळीनें मुलांचीं मनें सुसंस्कृत करण्याचा शक्य तेवढा प्रयत्न केला पाहिजे. याप्रमाणें मुलांच्याठायीं वाचनाभिरुचि, विद्याभिरुचि उत्पन्न झाली तर ती पुढें वृद्धिंगत होईल व त्यांनीं लाविलेल्या सुंदर रोप्यास पुढें मधुर फळें आल्यावांचून राहणार नाहींत, हें उघड आहे.

लहानपणीं उत्तम शिक्षण मिळणें व पुढें विद्वान् व सहृदय शिक्षकांचा सहवास घडणें, या गोष्टी दैवाधीन होत ! त्या सर्वां-नाच लाभतात असें नाहीं. ज्यांना त्या लाभतात व जे त्यांचा फायदा घेतात व त्या उपदेशाप्रमाणें पुढें वर्तन चालू ठेवितात, त्यांना आपल्या आयुष्यक्रमांत अनेक प्रकारचा फायदा होतो. इतकेंच नाहीं तर त्यांचें अनुकरणीय वर्तन पाहून इतर लोकांना त्यांच्याप्रमाणें वागण्याची प्रेरणा होते. परंतु दुर्दैवानें ज्यांना पूर्ववयांत गृहशिक्षणाचा लाभ मिळाला नाहीं किंवा सहृदय शिक्षकांचा सहवास घडला नाहीं, अशा लोकांनीही निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं. त्यांनीं स्वतःच विद्यार्जनाच्या प्रयत्नास लागावें व निश्चयानें प्रयत्न चालवून आपली योग्यता

वाढवावी स्वतःच्या प्रयत्नानें विद्या संपादन करून नांवारूपास चढलेले असे अनेक लोक आपण जगांत पाहतों. साक्रेटिस, प्लेटो, तुकाराम, अकबर, आब्राहाम लिंकन वगैरे लोकोत्तर पुरुषांचें लहानपणचें शिक्षण ह्मणण्यासारखें जरी नव्हतें, तरीपण पुढें स्वप्रयत्नानें ज्ञान संपादन करून त्यांनीं आपणांस विद्वान् ह्मणवून घेतलें. ‘ स्वतः कळकळीनें मनुष्य जें ज्ञान संपादन करतो तें त्यास उत्तम साध्य होतें, असें एका आंग्ल ग्रंथकारानें ह्मटलें आहे. शिक्षणक्रम संपवून मनुष्य व्यवहारांत पडल्यावरही त्यानें वाचनाची संवय ठेविली असतां त्यापासून त्याला ज्ञान व करमणूक हीं दोन्हींही होतील व त्याच्या वर्तनावर त्या वाचनाचा इष्ट परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं.

शिक्षणाचा प्रसार आपल्या देशांत अझून व्हावा तसा झाला नसल्यामुळें आपल्या लोकांना ज्ञानाचें फारसें महत्व कळत नाहीं. तें कळण्यास राष्ट्रांत शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे व वाचनाची अभिरुचि सर्व दर्जाच्या लोकांत उत्पन्न झाली पाहिजे. पाश्चात्य देशांत राजे, मुत्सद्दी, जमीनदार, शेतकरी, व्यापारी, उद्मी, मजूर वगैरे सर्व लोकांस लिहिणें, वाचणें येत असल्यामुळें आपला व्यवसाय आटोपल्यावर विश्रांतीचा वेळ ते आळसांत किंवा नसते उपद्व्याप करण्यांत न घालवितां, वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, कादंबऱ्या, निबंध, धर्मपर व्याख्यानें वगैरे वाचण्यांत घालवितात. आपल्या मंडळींत त्यांविषयीं चर्चा वगैरे करितात. यामुळें त्यांना सामान्य व्यावहारिक ज्ञान बरेंच होतें. गोरगरिबांकरितां वाचनाच्या अनेक सोयी करण्यांत आल्या असून त्यांना वरिष्ठ शिक्षणाचा लाभ व्हावा ह्मणून उच्च शिक्षणाचे वर्ग ( University extension classes ) काढण्यांत आले आहेत. त्यामुळें गरीब लोकांपैकीं ज्यांना ज्यांना ज्ञानार्जनाची उत्कंठा असते, त्यांना अशा संस्थांपासून बराच लाभ होतो. अशा प्रकारची स्थिति आपल्या देशांत जेव्हां होईल तेव्हांच आपला उत्कर्ष होईल.

एपिक्टिटस यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, "तुह्मी आपल्या घराचीं छपरें उंच न करितां स्वजनांचीं मनें उदात्त कराल तर राष्ट्राची सर्वांत मोठी कामगिरी केल्यासारखें होईल." स्त्रीपुरुष, आबालवृद्ध इत्यादि सर्वांना ज्ञानामृताचा लाभ देणें व त्यांना सन्मार्गास लावणें, यासारखें श्रेयस्कर अन्य कृत्य असेल, असें आह्मांला वाटत नाहीं. आपल्या देशांत स्त्रियांच्या शिक्षणाची फारच हेळसांड होत आहे व ती जोंपर्यंत अशींच चालू राहील, तोंपर्यंत आपलें नष्टचर्य कधींही संपावयाचें नाहीं. स्त्री पुरुष हीं संसारांतील दोन मुख्य अंगें असून तीं दोन्हींही बरोबर व एकमेकांस शोभतील अशींच असलीं पाहिजेत. परंतु हल्लीं आमच्या समाजाचें एक अंग अगदीं बधिर अतएव निरुपयोगी झालें आहे. स्त्रीस 'घरांतील लक्ष्मी' असें ह्मणण्याचा आमच्यांत प्रघात आहे. परंतु विद्येचें भूषण असल्याशिवाय तिला लक्ष्मीपण कधींही येणार नाहीं. आई सुशिक्षित असली ह्मणजे तिच्या शिक्षणाचा प्रभाव मुलांवर पडून तीं उत्तम निपजतात. जार्ज हर्बर्ट यानें ह्मटलें आहे. "सुशिक्षण देण्याच्या कामीं एक चांगली आई जितकी उपयोगी पडते, तितके शंभर चांगले शिक्षक उपयोगी पडत नाहींत." "मनुष्यकोटींत जी सुधारणा आपण पाहतों ती सुशील स्त्रियांच्या आचरणप्रभावाचें फल होय," असें एमर्सन नामक तत्ववेत्त्यानें ह्मटलें आहे. आपल्या देशांत स्त्रीशिक्षणाचा जेव्हां सर्वत्र प्रसार होईल, तेव्हांच गृहशिक्षणाची उत्तम व्यवस्था होईल व गृहशिक्षणाची उत्तम व्यवस्था झाल्याशिवाय आपल्या राष्ट्राचें पाऊल पुढें पडण्याची फारशी आशा नाहीं. गृहशिक्षणाचें महत्त्व केवढें आहे, याविषयीं वर उल्लेख आलाच आहे. असो.

वाचन ह्मटलें कीं अगोदर ग्रंथसंग्रह उत्तम पाहिजे व तो नेहमीं कालास अनुसरून पाहिजे. ज्या देशांत किंवा ज्या भाषेंत उत्तम

प्रकारचा ग्रंथसंग्रह नाहीं, तेथें वाचनासारख्या ज्ञानार्जनाच्या उत्तम साधनाचा मुळींच उपयोग होण्यासारखा नसतो. पाश्चात्य देशांत ज्ञानोत्कर्ष कालापासून ( Renaissance period ) देशी भाषेंतील ग्रंथसंग्रह झपाट्यानें वाढत आहे आणि शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळें किंवा शिक्षण सक्तीचें झाल्यामुळें वाचनाची अभिरुचि सर्वत्र अति वाढली आहे. त्यामुळें मनोरंजक, अनुभवपरिप्लुत, सन्मार्गदर्शक आणि बोधपर अशा प्रकारचा पुस्तकसंग्रह, युरोप व अमेरिका खंडांत प्रत्येक देशांत निर्माण झाला आहे. पाश्चात्य लोकांची जी विशेष प्रगति झाली आहे, तीस ह्या ज्ञानोत्कर्ष काळापासून मोठी मदत झाली आहे, यांत संशय नाहीं. मनुष्याला वस्तुस्थितीचें पूर्ण ज्ञान झाल्याशिवाय त्याचीं मतें सुनिश्चित होत नाहींत. परिस्थितीचें यथार्थ ज्ञान झाल्याशिवाय परस्परांत ऐक्य होत नाहीं आणि प्रगतिही होत नाहीं. पाश्चात्य देशांप्रमाणें आपल्या देशांत ज्ञानाचा प्रसार व्हावा, अशी जर आपली मनःपूर्वक इच्छा असेल तर शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें वाढला पाहिजे व देशी भाषेंत उत्तम प्रकारचा ग्रंथसंग्रह झाला पाहिजे. याकडे आमच्या दयाळु सरकारचें व तसेंच सुशिक्षित मंडळीचें अवश्य लक्ष्य जाईल अशी दृढतर आशा आहे.

समाप्त.

# परिशिष्ट

पूर्वी ठळक ठळक मराठी पुस्तकांचें दिग्दर्शन झालेंच आहे, तथापि वाचकांच्या सोयीकरितां येथें निवडक पुस्तकांची यादी दिली आहे. या यादींत बहुतेक चांगल्या पुस्तकांचा होतां होईल तों समावेश केला आहे; इतकेंच नाहीं तर, मुलेमुली, स्त्रियापुरुष इत्यादि सामान्य वाचकांना ती उपयुक्त व पूर्ण मार्गदर्शक व्हावी म्हणून, विशेष काळजी घेतली आहे.

## कविता.

* अमृतानुभव—मुकुंदराज.
* ज्ञानेश्वरी—ज्ञानदेव.
* भागवत—एकनाथ.
* महाभारत—मुक्तेश्वर.
* यथार्थदीपिका—वामन.
* अभंगांची गाथा—तुकाराम.
* दासबोध. } रामदास.
* मनाचे श्लोक. } रामदास.
* रामविजय. } श्रीधर.
* हरिविजय. } श्रीधर.
* केकावली. } मोरोपंत.
* महाभारत. } मोरोपंत.

संतलीलामृत } महिपति.
भक्तीविजय } महिपति.

* नलोपाख्यान—रघुनाथपंडित.
* लावण्या—रामजोशी.
* राजा शिवाजी—कुंटे.
* गंगावर्णन—पेठकर.

कृष्णाकुमारी—लेले.
कुसुमांजलि—महाजनी.
काव्यमाधुर्य—वा. दा. ओक
मेघदुत, रघुवंश—लेले.
अभिनव कादंबरी—मोगरे.

* ऐतिहासिक पोवाडे—ऑक्वर्थ व शाळिग्राम.

सासरची पाठवणी—आठल्ये.
मोरोपंती वेंचे—पांगारकर.

## चरित्रें.

गौतमबुद्ध—केळुसकर.

* पृथ्वीराज चव्हाण—लोकहितवादी.

तुकारामचरित्र—केळुसकर.
रामदासचरित्र—चौबळ.

* एकनाथ—सहस्रबुद्धे.

छत्रपति शिवाजी महाराज—केळुसकर.
* संभाजी आणि राजाराम—भागवत.
* नाना फडनवीस—खरे.
परशुरामभाऊ पटवर्धन—निगुडकर.
* महादजी शिंदे—नातु.
अहिल्याबाई होळकरीण.
* राणी लक्ष्मीबाई—पारसनीस.
* जॉर्ज वाशिंग्टन—व्ही. पी. रानडे.
एब्राहाम लिंकन—वि. कों. ओक.
अकबर—लेले.
रिचर्ड कावडेन—भानु.
ज्ञानेश्वर—पारख.
विक्टोरिया राणीचें चरित्र—गुंजीकर.
ग्लॅडस्टन-वि. कों. ओक.
* आनंदीबाई जोशी-काशीबाई कानिटकर.
* विष्णुशास्त्री चिपळुणकर-ल० कृ० चिपळुणकर.

## इतिहास.

हिंदुस्थानचा इतिहास—(मंडलिक).
राजस्थानचा इतिहास—(लोकहितवादी).
* मराठ्यांचा इतिहास-(ग्रँट-डफच्या इ० भाषांतर.)
* पेशव्यांची बखर-सोहोनी.
महाराष्ट्राचा इतिहास-लक्ष्मणराव चिपळूणकर.
गुजराथचा इतिहास—लोकहितवादी.
* भारतीय साम्राज्य—पावगी.
यूरोपचें संक्षिप्त इतिवृत्त—विजापुरकर.
* भोंऊसाहेबांची बखर-रघुनाथ यादव.
मराठी रियासत, मुसलमानी रियासत, ब्रिटिश रियासत } सरदेसाई.
अयोध्येचे नबाब—पारसनीस.
विद्यमान एतद्देशीय संस्थानें व जहागिरी यांचा इतिहास—गोडबोले.
ऐतिहासिक गोष्टी-लोकहितवादी.
राणीच्या राज्याचा इतिहास-फडके.
मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष-(कै० न्या० रानडे यांच्या इतिहासाचें भाषांतर).
रामायण—चिपळुणकर.
महाभारत— ,,

## कादंबऱ्या.

* मुक्तामाला–हळबे.
* अनाथपांडुरंग–गोडबोले.
* मोचनगड–गुंजीकर.
* प्रेमबंधन ( योगी ).
* ठगाची जबानी–बर्वे.
ताराबाई आणि हिराबाई.
नारायणराव आणि गोदावरी.
पानपतची मोहीम } नागेशराव
* बाजीराव बल्लाळ } बापट.
आनंदाश्रम.
दुर्गेशनंदिनी.
विषवृक्ष.
दुःखाअंतीं सुख.
* आजकालच्या गोष्टी.
* पण लक्षांत कोण घेतो ?
* मी.
वांईकर भटजी.
आरबी भाषेंतील सुरस गोष्टी.
इसापनीति.
जग हें असें आहे. } ह. ना. आपटे.
गड आला, पण सिंह गेला. } ह. ना. आपटे.
उषःकाल. } ह. ना. आपटे.
चंद्रगुप्त. } ह. ना. आपटे.

## नाटकें.

* विक्रमोर्वशीय—गोडबोले.
* वेणीसंहार— ,,
* उत्तररामचरित्र— ,,
* शाकुंतल—किर्लोस्कर.
* मृच्छकटिक—देवल.
* कादंबरी—देवल.
सावित्री—त्रिलोकेकर.
हरिश्चंद्र— ,,
राणा भीमदेव—
मुद्राराक्षस—राजवाडे.
सटवाजीराव ढमाले–प्र. वि.
गुणोत्कर्ष—खरे [ -ज्ञा. वि.
* जयपाळ—कीर्तने.
* थोरले माधवराव—कीर्तने.
* विकारविलसित–आगरकर.
* त्राटिका—केळकर.
पानपतचा मुकाबला—शिरवळकर.
शापसंभ्रम, शारदा–देवल.
कांचनगडची मोहना—खाडिलकर.

## प्रवास व स्थलवर्णनें.

इंग्लंदांतील प्रवास॰कर्सनदास मूळजी यांचा.
* विलायतचा प्रवास-पावगी रा.भ.
* धौममहाबळेश्वर वर्णन–उदास.

* विजापूरवर्णन—गायकवाड.
महाराष्ट्रांतील किल्ले—गोगटे.
मुंबईचें वर्णन—माडगांवकर.
इंग्लंडचा प्रवास—पावगी.
* युनायटेडस्टेटची लोकस्थिति व प्रवासवृत्त पं. रमाबाई.

## निबंध.

* केसरींतील निबंध—आगरकर.
* निबंधमाला—चिपळुणकर ‡
* बेकनचे निबंध—वागळे.
सिसरोचे निबंध—देव.
अबलोन्नति लेखमाला—चि. वि. वैद्य.
उद्योग आणि नशीब.
सुभाषित अथवा सुबोधवचनें—लोकहितवादी.
हर्बर्ट स्पेन्सर यांचे निबंध.
हिंदुधर्म आणि सुधारणा. } ब्राह्मण आणि त्यांची विद्या } प्रि० गोळे.
सद्बोधमंदिर.
कविपंचक—वि० चिपळुणकर.
निबंधसंग्रह- विविधविषयसंग्रह —आगरकर.
संसारसुख—गाडगीळ.
धर्मपर व्याख्यानें—न्या. रानडे
मोरोपंत—पांगारकर.
वामन पंडित—हंस.
मुक्तेश्वर, वामन पंडित—वा. अ. भिडे.
स्वतःचा प्रयत्न—महाजनी.
ग्रामसंस्था—बोडस.
स्वातंत्र्य—फडके.
स्त्रियांची परवशता-कानिटकर.
सद्वर्तन—गो० शं० बापट.
नीतिमुक्ताहार—पित्रे.
प्रपंचरहस्य—ओक.
शिक्षणमीमांसा.
सौभाग्यरत्नमाला.
स्त्रीधर्मनीति—रमाबाई.

‡ पान ९६ वरील टीप पहावी.

* हीं पुस्तकें के० न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांनीं आपल्या मराठी निवडक पुस्तकांच्या यादींत नमूद केलीं आहेत.

IRBK 0100048

IRBK-0100048